# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. २८/०८/२०१२



**प्रकरण क्र. ०१ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक ऑगस्ट २०१२ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे ''महापौर'' पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण चार उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. त्या उमेदवारांची नांवे पुढीलप्रमाणे :-

१) प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे
२) भोईर राजु यशवंत
३) मेहता नरेंद्र लालचंद
४) कॅटलीन एन्थोनी परेरा

महापौर पद हे एकच पद असल्याने, या पदासाठी ४ उमेदवार आहेत. म्हणून सभागृहात पिठासिन अधिकारी यांनी ज्या कोणी उमेदवारांस आपली उमेदवारी मागे घ्यायची असल्यास त्यांच्या करिता नियमानुसार नामनिर्देशन पत्र मागे घेण्याकरिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता **१) श्री. भोईर राजु यशवंत** व **२) श्री. मेहता नरेंद्र लालचंद** यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा अर्ज पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द केला. **''महापौर''** पदाच्या निवडणुकीसाठी दोनच उमेदवार शिल्लक राहिले. त्यानंतर उमेदवारांच्या बाजूने **''हात वर''** करुन मतदान घेतले असता **१) श्रीम. कॅटलीन एन्थोनी परेरा** यांना ५० इतकी मते व **२) श्री. प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे** यांना **४३** इतकी मते मिळाली. तसेच ० सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते **श्रीम. कॅटलीन एन्थोनी परेरा** यांना **जास्त मते** मिळाल्याने **श्रीम. कॅटलीन एन्थोनी परेरा** ह्या **''महापौर''** पदी बहुमताने निवडून आल्याचे मी जाहीर करीत आहे. महापौर पदाचा कालावधी निवडून आल्याचे तारखेपासून अडीच वर्षापर्यंत राहील.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

२

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २८/०८/२०१२

**प्रकरण क्र. ०२ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक माहे ऑगस्ट २०१२ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे ''उपमहापौर'' पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे.

**ठराव क्र. ०२ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण चार उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. त्या उमेदवारांची नांवे पुढीलप्रमाणे :-

१) प्रविण मोरेश्वर पाटील

२) जाधव मोहन महादेव

३) शरद केशव पाटील

४) सय्यद नुरजहॉं नझर हुसेन

उपमहापौर पद हे एकच पद असल्याने, या पदासाठी ४ उमेदवार आहेत. म्हणून सभागृहात पिठासिन अधिकारी यांनी ज्या कोणी उमेदवारांस आपली उमेदवारी मागे घ्यायची असल्यास त्यांच्या करिता नियमानुसार नामनिर्देशन पत्र मागे घेण्याकरिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता **१) श्री. जाधव मोहन महादेव** व **२) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील** यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा अर्ज पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द केला. **''उपमहापौर''** पदाच्या निवडणुकीसाठी दोनच उमेदवार शिल्लक राहिले. त्यानंतर उमेदवारांच्या बाजूने **''हात वर''** करुन मतदान घेतले असता **१) श्रीम. सय्यद नुरजहॉं नझर हुसेन** यांना **५०** इतकी मते व **२) श्री. शरद केशव पाटील** यांना **४३** इतकी मते मिळाली. तसेच **०** सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते यांना **जास्त मते** मिळाल्याने **श्रीम. सय्यद नुरजहॉं नझर हुसेन** ह्या **''उपमहापौर''** पदी बहुमतांने निवडून आल्याचे मी जाहीर करीत आहे. उपमहापौर पदाचा कालावधी निवडून आल्याचे तारखेपासून अडीच वर्षापर्यंत राहील.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका



## मा. महासभा दि. २५/१०/२०१२

**प्रकरण क्र. ३, ४ व ५ :-**

**ठराव क्र.03:-**

मुंबई प्रांतिक महानगरपाकि अधिनियम कलम २०, ३०(१) व महाराष्ट्र नागरीक क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन सुधारणा अधिनियम १९७५ अन्वये तीनही समित्यांवर सदस्य नामनिर्देशन करण्याकरीता प्रशासनाने दि. २५/१०/२०१२ रोजीच्या मा. महासभेमध्ये विषय सभागृहामध्ये दिले आहे. मात्र मुंबई प्रांतिक महानगरपाकि अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ)/२ प्रमाणे सामितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना महापालिका मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटांचे तौलानिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचार विनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील.

तरी प्रशासनाने दिलेला गोषवारा सदोष आहे. मुंबई प्रांतिक महानगरपाकि अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ)/२ प्रमाणे आधी सभागृह नेता व विरोधी पक्षनेता ह्यांची नेमणूक झाल्यावरच समितींवर सदस्य नामनिर्देशन करण्याचा विषय मा. महासभेपुढे आणावा म्हणून आजची सभा तहकुब करण्यांत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | निरंक |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | वंदना मंगेश पाटील | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ८ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ९ | मेहता डिंपल विनोद | |
| १० | डॉ. आसिफ गुलाब शेख | १० | केळुसकर प्रशांत नारायण | |
| ११ | गोविंद हेलन जॉर्जी | ११ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १२ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | लियाकत ग. शेख | १३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १४ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १४ | शरद केशव पाटील | |
| १५ | खण्डेलवाल सुरेश | १५ | मेघना दिपक रावल | |
| १६ | नरेश तुकाराम पाटील | १६ | जैन गिता भरत | |
| १७ | शबनम लियाकत शेख | १७ | जैन रमेश धरमचंद | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १९ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १९ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | २० | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | |
| २१ | भावसार शिल्पा कमलेश | २१ | सुजाता रविकांत शिंदे | |
| २२ | वंदना रामदास चक्रे | २२ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | जैन सिमा महेंद्र | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | २४ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २५ | रविंद्र भिमदेव माळी | २५ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २६ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २६ | जैन दिनेश तेजराज | |
| २७ | पिसाळ मनिषा नामदेव | २७ | अरोरा दिपिका पंकज | |
| २८ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २८ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २९ | पाटील सुनिता कैलास | २९ | अनिल बाबुराव भोसले | |
| ३० | वेतोसकर राजेश शंकर | ३० | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| ३१ | प्रभात प्रकाश पाटील | ३१ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३२ | बगाजी शर्मिला विल्सन | ३२ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३३ | रकवी सुहास माधवराव | ३३ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३४ | झिनत रऊफ कुरेशी | ३४ | तारा विनायक घरत | |
| ३५ | सिंद्धीक मोहम्मद फरिद कुरेशी | ३५ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३६ | पुजारी कांचना शेखर | ३६ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३७ | काझी रशीदा जमील | ३७ | जयमाला किशोर पाटील | |
| ३८ | इनामदार जुबेर | ३८ | संदिप मोहन पाटील | |
| ३९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३९ | परमार अनिता भरत | |
| ४० | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | ४० | पाटील प्रणाली संदिप | |
| ४१ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ४१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४२ | डिसा मर्लिन मर्विन | ४२ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४३ | भट दिप्ती शेखर | ४३ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४४ | विराणी रेखा अनिल | ४४ | ठाकुर अरविंद दत्ताराम | |
| ४५ | सामंत प्रमोद जयराम | | | |
| ४६ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४७ | भोईर भावना राजू | | | |
| ४८ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४९ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

8 1

# मिराभाईदर महानगरपालिका

मा. तहकुब महासभा दि. २९.११.२०१२
(दि. २५/१०/१२ रोजीची तहकुब सभा)

**ठराव**

ठराव क्र. ०४

आदरणीय **हिन्दुह्दयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे** यांचे दिनांक १७.११.२०१२ रोजी ~~झालेल्या~~ दुःखद निधन झाले. आदरणीय श्री. बाळासाहेब ठाकरे हे सर्व पक्षीय व सर्व धर्मीय यांचे चाहते होते. म्हणून मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आमदार श्री. प्रताप सरनाईक यांनी सुचविलेल्या सुविधा मुखंडावर बांधण्यात येणाऱ्या नाट्यगृहास **हिन्दुह्दयसम्राट स्वर्गीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे** यांचे नाव देण्यात यावे व त्यांचा झालेल्या दुःखद निधनामुळे त्यांना श्रध्दांजली वाहुन आजची हि सभा तहकुब करण्यात येत आहे व तहकुब सभा दि. ३०.११.२०१२ च्या विशेष महासभेच्या समाप्तीनंतर त्याच दिवसी घेण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

| सूचक : | अनुमोदक : |
|---|---|
| (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) |
| सौ. निलम ह. ढवण. | शरद केशव पाटील |
| गटनेता (शिवसेना) | गटनेता (भा.ज.प.) |

(6)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ३०/११/२०१२

**"बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९"** या विषयाची माहिती सन्मा. सदस्यांना होणे संबंधीच्या विषयावर चर्चा झाली.

8

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३०/११/२०१२

## (दि. २५/१०/२०१२ व दि. २९/११/२०१२ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ०४ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व. निवडणूक २०१२ मध्ये एकुण ९३ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले आहेत. महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर ०९ सदस्यांची नियुक्ती मान्यताप्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक पक्षबळ विचारात घेउन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळावर महिला व बालकल्याण समितीमध्ये नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय महिला व बालकल्याण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. भारतीय जनता पार्टी - ०३

२. राष्ट्रवादी कॉंग्रेस - ०३

३. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस - ०२

४. शिवसेना - ०१

५. बहुजन विकास आघाडी - ००

यापमाणे महिला व बालकल्याण समितीवर खालील ०९ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| २. | श्रीम. वंदना विकास पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ३. | श्रीम. असेन्ला मेंडोन्सा (परेरा) | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४. | श्रीम. झीनत रऊफ कुरेशी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ५. | श्रीम. पाटील सुनिता कैलास | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६. | सौ. सुमन कोठारी | भारतीय जनता पार्टी |
| ७. | सौ. दिपिका अरोरा | भारतीय जनता पार्टी |
| ८. | सौ. प्रतिभा पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ९. | सौ. जयमाला पाटील | शिवसेना |

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३०/११/२०१२

## (दि. २५/१०/२०१२ व दि. २९/११/२०१२ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ०५ :-** महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र.०७ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर ९ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. भारतीय जनता पार्टी - ०३

२. राष्ट्रवादी काँग्रेस - ०३

३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - ०२

४. शिवसेना - ०१

५. बहुजन विकास आघाडी - ००

याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील ०९ सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्रीम. वंदना चक्रे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| २. | श्रीम. दक्षता ठाकूर | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ३. | श्रीम. सुंभड मेहरुनीसा हारुन रशीद | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४. | श्रीम. भट्ट दिप्ती शेखर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ५. | श्री. सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ६. | सौ. वर्षा भानुशाली | भारतीय जनता पार्टी |
| ७. | श्री. रमेश जैन | भारतीय जनता पार्टी |
| ८. | श्री. दिनेश जैन | भारतीय जनता पार्टी |
| ९. | सौ. तारा घरत | शिवसेना |

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ३०/११/२०१२

## (दि. २५/१०/२०१२ व दि. २९/११/२०१२ ची तहकुब सभा)

7

**प्रकरण क्र. ०३ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.

**ठराव क्र.** ०५ **:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व. निवडणूक २०१२ मध्ये एकूण ९३ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले आहेत. महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती मान्यताप्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक पक्षबळ विचारात घेउन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळावर स्थायी समितीमध्ये नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय स्थायी समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. भारतीय जनता पार्टी - ०५

२. राष्ट्रवादी काँग्रेस - ०५

३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - ०३

४. शिवसेना - ०३

५. बहुजन विकास आघाडी - ००

याप्रमाणे स्थायी समितीवर खालील १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| २. | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ३. | श्रीम. अनिता पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ५. | श्री. राजु भोईर | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ६. | श्री. प्रमोद जयराम सामंत | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ७. | श्री. राजेश शंकर वेतोस्कर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ८. | श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ९. | श्री. रोहदास शंकर पाटील | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्री. शरद केशव पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ११. | श्रीम. मिरादेवी यादव | भारतीय जनता पार्टी |
| १२. | डॉ. राजेंद्र जैन | भारतीय जनता पार्टी |
| १३. | सौ. सिमा जैन | भारतीय जनता पार्टी |
| १४. | श्री. संदिप पाटील | शिवसेना |
| १५. | श्री. प्रविण पाटील | शिवसेना |
| १६. | श्री. प्रशांत दळवी | शिवसेना |

महापौर

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा
## दि.०१/१२/२०१२

**ठराव क्र.०८ :-**

माजी पंतप्रधान श्री. इंदर कुमार गुजराल यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी काल दि. ३०/११/२०१२ रोजी दुखःद निधन झाले असल्याने आज दि.०१/१२/२०१२ रोजी आयोजित करण्यात आलेली मा. महासभा तहकुब करण्याचा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डीमेलो** **अनुमोदक :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

११

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. ०१/१२/२०१२ मा. महासभा सुचना क्र. ०३ यानुसार

## तहकूब मा. महासभा शुक्रवार दि. १४/१२/२०१२

ठराव क्र. ०९ ॥ अभिनंदन ठराव ॥

मा. नगरसेवक डॉ. संजीव नाईक

दि. १६/०३/२०१२ रोजी प्रथमतः मा. ना. श्री. सुनिल तटकरे साहेब जलसंपदा व पाटबंधारे मंत्री, मा. ना. श्री. गणेश नाईक पालकमंत्री, ठाणे जिल्हा, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंन्सा तसेच महापालिकेच्या प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्त व महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाचे अधिकारी ह्यांच्या समवेत संयुक्त बैठक मिरा-भाईंदर शहराला भासणारी पाणी टंचाईचा प्रश्न सोडविणेस घेण्यात आली होती, त्याच धर्तीवर दि. ०४/१२/२०१२ रोजी मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहॉ नज़र हुसेन, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या नेतृत्वाखाली शिष्ठमंडळाने मा. ना. श्री. नारायणरावजी राणे, मंत्री, उद्योग, महाराष्ट्र राज्य यांची भेट घेतली. बैठकीच्या चर्चेमध्ये दि. १९/०३/२०१२ रोजी कॉंग्रेसचे माजी आमदार मा. श्री. मुझफ्फर हुसेन व मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी महापौर मा. श्री. तुळशीदास म्हात्रे व संबंधीत कॉंग्रेस पक्षाचे शिष्ठमंडळ व अधिकारी वर्ग सह मिरा भाईंदर महानगरपालिकेला महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळातर्फे होत असलेल्या पाणी पुरवठ्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी सदर बैठकीमध्ये शिष्ठमंडळाने मा. ना. श्री. नारायणरावजी राणे, मंत्री, उद्योग, ह्यांचेकडे महामंडळाच्या माध्यमातुन १०० द.ल.लि. प्रति दिन एवढा वाढीव पाणी पुरवठा करावा, अशी मागणी केली होती. मंत्री महोदयांनी मिरा-भाईंदर शहराला अतिरिक्त ३० द.ल.लि. एवढे पाणी सद्यस्थितीत देण्याचे आश्वासन दिले. मात्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सद्यस्थितीत असलेल्या पाणी साठ्याअभावी व झालेल्या सदर बैठकीच्या अनुषंगाने शिष्ठमंडळाने किमान २० द.ल.लि. पाणी पुरवठा तातडीने उपलब्ध करुन देण्याचा आग्रह मा. मंत्री महोदय, श्री. नारायणराव राणे साहेबांकडे केला.

मागणीच्या अभावी व तांत्रिक बाबींचे अवलोकन करुन मा.ना.श्री. नारायणराव राणे साहेब मंत्री, उद्योग, बंदरे, रोजगार व स्वयंरोजगार, महाराष्ट्र राज्य ह्यांनी आदेश दिले की, मिरा-भाईंदर शहरासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातुन मागणी केलेल्या १०० द.ल.लि. पाणी पुरवठ्याच्या आधारावर तात्काळ अतिरिक्त २० द.ल.लि. प्रति दिन एवढे पाणी देण्यात यावे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाला पाणी घेण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री उभारण्याचे निर्देशही मा. मंत्री महोदय यांनी दिले.

या शहराची तहान भागविण्याकरीता अतिरिक्त २० द.ल.लि. पाणी पुरवठा तातडीने उपलब्ध करुन घेण्यास कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अथक प्रयत्नांना यश आले. मा. मंत्री महोदय श्री. नारायणराव राणे साहेब, ह्यांनी मिरा-भाईंदर शहरासाठी अतिरिक्त पाणी मंजूर केले म्हणून सर्व मिरा-भाईंदर रहिवाशांच्या वतीने मनःपुर्वक आभार व्यक्त करीत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सूचक : श्री. जुबेर इनामदार

अनुमोदक : ध्रुवकिशोर पाटील

श्री. जुबेर इनामदार

ठराव ~~सर्वानुमते~~ बहुमताने मंजूर

ठराव वाचून कायम करण्यांत आला

महापौर

सौ. कॅटलीन परेरा

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १४/१२/२०१२

## (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ०६ :-** **दि. ३०/१२/२०११ व दि. ३१/०३/२०१२ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. १०** :-

दि. ३०/१२/२०११ व दि. ३१/०३/२०१२ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

13

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१४/१२/२०१२**

(दि. ०७/१२/२०१२ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ०७ :- मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या विविध वस्तुचे मालमत्तांचे संरक्षणार्थ "सुरक्षा रक्षक पुरवठा" करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत...**

**ठराव :- ११**

मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकेच्या मालकीच्या ज्या ज्या मालमत्ता आहेत यामध्ये उद्याने, पाण्याच्या टाक्या, स्मशानभुमी, वॉर्ड ऑफीसेस, अग्नीशमन, हॉस्पीटलर्स, मुख्यकार्यालय तसेच आरक्षित जागा व इतर मालमत्ता यांचे संरक्षण करणे, या व्यतिरिक्त प्रासंगिक अल्पकालवधीसाठी किंवा मर्यादित कालावधीसाठी आवश्यकते प्रमाणे विविध विभागात उपक्रम तथा कार्यक्रमासाठी सुरक्षा रक्षक नेमले जातात.

सद्या महापालिकेमध्ये मे. सैनिक इंटेलिजीन्स ॲन्ड सेक्युरिटी प्रा.लि. यांची सुरक्षा व्यवस्था असून ह्या कंपनीने महापालिकेस पुरविलेली सेवा विचारात घेता आजतागायत कुठेही अनुचित प्रकार घडलेला नसून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही. वेळोवेळी महापालिकेने मागणी केल्याप्रमाणे सुरक्षा रक्षकांचा पुरवठा केलेला आहे. यामुळे मा. स्थायी समितीने मे. सैनिक इंटेलिजीन्स ॲन्ड सेक्युरिटी प्रा.लि.यांना तत्पर सेवा पुरवठा करणे तसेच आहे त्याच दरांने किमान वेतन कायद्यानुसार पुढे सेवा पुरविण्यांबाबत एक वर्षाची मुदत वाढ ठराव क्र. ४१ दि. १६/०७/२०११ नुसार दिलेली होती.

सदरची एजन्सी "किमान वेतन कायद्यानुसार" यापुढेही सेवा पुरविण्यास तयार असून गोषवाऱ्याप्रमाणे गार्ड बोर्डकडून आवश्यक त्या प्रकारे पुरेसे सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन देत नसल्याचा पूर्वानुभव पहाता तसेच गार्ड बोर्डकडील सुरक्षा रक्षकांचे वेतनही जास्त असल्याने मे. सैनिक इंटेलिजीन्स ॲन्ड सेक्युरिटी प्रा.लि. यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार मे.सैनिक इंटेलिजीन्स ॲन्ड सेक्युरिटी प्रा.लि.यांना पुढील तीन वर्षासाठी किमान वेतन कायद्यानुसार मुदतवाढ देणेस व त्यानुसार देयकांचे प्रदान करणेस आजची सभा मंजूरी देत आहे.

तसेच सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील अंदाजपत्रकातील पृष्ठ क्र. ३१ "आरोग्य व सोयी" या प्रधान लेखा शिर्षाखालील उपशीर्ष " साफ-सफाई व सोयी" मधून अ.क्र.१ मधील "स्थायी आस्थापना या लेखा शिर्षातील उर्वरित तरतूदीमधून पूर्णविनियोजन करुन सुरक्षा रक्षकांची देयके प्रदानास देखील आजची सभा मंजूरी देत आहे.

सूचक : (ध्रुवकिशोर पाटील)

अनुमोदक : (जुबेर इनामदार)

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा-भाईदर महानगरपालिका.

15

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १४/१२/२०१२
## (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ०८ :-** **भाईंदर (प.) नियोजित टेंभा हॉस्पीटल खाजगी कंपनी अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास मंजुरी मिळणेकामी मा. उच्च न्यायालयात Civil Application दाखल करण्यास मान्यता देणे.**

**ठराव क्र. १२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे टेंभा हॉस्पीटल इमारत बांधकाम मा. उच्च न्यायालय जनहीत याचिका क्र. ३८/२००६ मधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. महासभा दि. १६/०४/२००७ ठराव क्र. ०३ अन्वये हाती घेण्यात आलेले आहे. सदर इमारतीचे काम सद्यस्थितीत प्रशासनामार्फत थांबविण्यात आलेले आहे.

सदर हॉस्पीटल इमारत बांधकाम पूर्ण होऊन सर्व सोयीने कर्मचारी वर्ग नेमून हॉस्पीटल सुरु करण्यास होणारा खर्च पाहता व सद्याची महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक स्थिती पाहता व सदर हॉस्पीटल महानगरपालिकेने चालविण्यास महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार आहे.

सदर हॉस्पीटल राज्य शासनाकडे हस्तांतर केल्यास अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास सोयी पुरविणे शक्य होईल. सदर धोरण निश्चित करण्यात येत असून याबाबत Civil Application मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. लियाकत शेख व अनुमोदक श्री. हंसुकुमार पांडे ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

सर्वप्रथम राज्य शासनाला हॉस्पीटल चालविणेसाठी आग्रह धरणेत यावा आणि यदा कदाचित शासनाने अंग काढले तर गोरगरिब यांना सेवा पुरविणाऱ्या सेवाभावी संस्था, धर्मदाय संस्था यांना हॉस्पीटल चालविणेसाठी प्राधान्य देणेत यावे अशी माझी सुचना आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | निरंक |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ८ | मेंडोन्सा स्टिवन जॉन | ८ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ९ | मेहता डिंपल विनोद | |
| १० | डॉ. आसिफ गुलाब शेख | १० | केळुसकर प्रशांत नारायण | |
| ११ | गोविंद हेलन जॉर्जी | ११ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १२ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | लियाकत ग. शेख | १३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १४ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १४ | शरद केशव पाटील | |
| १५ | खण्डेलवाल सुरेश | १५ | मेघना दिपक रावल | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | नरेश तुकाराम पाटील | १६ | जैन गिता भरत | |
| १७ | शबनम लियाकत शेख | १७ | जैन रमेश धरमचंद | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १९ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १९ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | भावसार शिल्पा कमलेश | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | वंदना रामदास चक्रे | २२ | जैन सिमा महेंद्र | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २४ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | २४ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २५ | जैन दिनेश तेजराज | |
| २६ | पिसाळ मनिषा नामदेव | २६ | अरोरा दिपिका पंकज | |
| २७ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २७ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २८ | पाटील सुनिता कैलास | २८ | अनिल बाबुराव भोसले | |
| २९ | वेतोसकर राजेश शंकर | २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| ३० | प्रभात प्रकाश पाटील | ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३१ | बगाजी शर्मिला विल्सन | ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३२ | झिनत रऊफ कुरेशी | ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३३ | सिंद्धीक मोहम्मद फरिद कुरेशी | ३३ | तारा विनायक घरत | |
| ३४ | पुजारी कांचना शेखर | ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३५ | काझी रशीदा जमील | ३५ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३६ | इनामदार जुबेर | ३६ | जयमाला किशोर पाटील | |
| ३७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३७ | संदिप मोहन पाटील | |
| ३८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३८ | परमार अनिता भरत | |
| ३९ | डिसा मर्लिन मर्विन | ३९ | पाटील प्रणाली संदिप | |
| ४० | भट दिप्ती शेखर | ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४१ | विराणी रेखा अनिल | ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४२ | सामंत प्रमोद जयराम | ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४६ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

16

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१४/१२/२०१२
(दि. ७/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र.:** (९ ) "मिरा-भाईंदर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनियमन २०११" मसुद्यास अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत.

**ठराव क्र :-** (९३)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने मा. निवृत्त उपसचिव श्री. फ. ब. खान यांचेकडुन प्रारुप "मिरा-भाईंदर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनियमन २०११" तयार करुन घेण्यात आले आहेत. सदरचे प्रारुप नियमन दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या सुचनांच्या अनुषंगाने सदर विनियमन मध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत. तरी सदरच्या प्रारुप विनियमन मसुद्यास हि सभा अंतिम मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील    अनुमोदक:- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर.**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १४/१२/२०१२

प्रकरण क्र. १० :- पी.पी.पी. तत्वावरील चालविण्यांत येणाऱ्या परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरात वाढ करणेबाबत,

(सदरचा विषय मागे घेण्यात आला.)

(18)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## परिवहन उपक्रम
परिवहन कार्यालय, पहिला माळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन), मांडली तलावाजवळ, भाईंदर (पश्चिम), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

# MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION
## TRANSPORT UNDERTAKING
Transport Office : First Floor, Dr. Ambedkar Bhavan (Nagar Bhavan), Nr. Mandli Talao,
Dr. Hedgewar Marg, Bhayandar (W), Tal. & Dist. Thane - 401 101
Tel. : 2818 8600 / 2819 2828 / 3028 / 2818 1183 / 1353 / 2814 5985 Fax : 2819 7636

जावक क्र. : मनपा/परिवहन /१५०/ २०१२-१३ दिनांक २८/११/२०१२

प्रति,
मा. महापौर सो.
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- मा. महासभेत परिवहन तिकीट दरवाढ बाबत सादर केलेला विषय मागे घेणे बाबत.
संदर्भ :- मा. महासभा दि. ०१/१२/२०१२ विषय क्र. १०.

महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणांस सादर करीत आहे की, परिवहन उपक्रम अंतर्गत बसेस तिकीट दरवाढ करणे करीता मा. महासभेची मंजूरी मिळणेस दि. ०१/१२/२०११ रोजी परिवहन विभागातर्फे गोषवारा सादर करण्यांत आला होता. तथापि सदरचा विषय मा. महासभेत होउ शकला नाही. तथापि माहे मे २०१२ व माहे सप्टेंबर २०१२ मध्ये सदर तिकीट दरवाढीस मा. शासनाने मंजूरी दिलेली असून त्याअनुषंगाने परिवहन उपक्रमाने कार्यवाही केलेली आहे.

तरी महोदया यांना नम्र विनंती आहे की, कृपया मा. महासभा दि. ०१/१२/२०१२ रोजी होणाऱ्या मा. महासभेत विषय क्र. १० अन्वये ठेवण्यांत आलेला विषय उपक्रमामार्फत मागे घेण्यांत येत आहे. त्यामुळे तो ठराव रद्द करावा.

परिवहन उप-व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- माहितीकरीता
मा. नगरसचिव
सचिव विभाग

प्रा/प दि. २२/११/१२

२२/११/१२

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि.१४/१२/२०१२

(दि. १/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा)

## ।। ठराव ।।

**प्रकरण क्र ( ११ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.ली. योजने अंतर्गत On line Booster पंप बसविण्याच्या कामास मान्यता मिळणे बाबत.

**ठराव क्र. ( १४ ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.ली. योजने अंतर्गत सर्वे नं. ७७७, सुदाम नगर, कमला पार्क व गोडदेव येथील संप व पंप हाऊस अद्याप पूर्ण झालेली नाही. सदर काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत होते. सदरचे संप व पंप हाऊस पूर्ण न झाल्यामुळे वरील जलकुंभ गुरुत्ववाहिनीने भरण्यात येत आहे. सदर पाणी पुरवठा ४५ ते ४७ तासांवर सद्यस्थितीत होत आहे. पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा On line Boosting पंप बसवून करणे शक्य आहे.

सदर काम भाईंदर (पुर्व) रेल्वे फाटक येथे On line Boosting पंप बसवून Latest Technology नुसार व सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा विचारात घेता वरील चार संपच्या ठिकाणी असलेल्या जलकुभांना रेल्वे फाटक येथून On line Boosting पंपीग मशिनरीद्वारे पाणी पुरवठा करता येईल. सदरचे बुस्टींग पंपाद्वारे पाणी पुरवटा केल्यास वरील चारही ठिकाणी पंपीग मशिनरी बसविण्याची आवश्यकता नाही. केवळ एकाच ठिकाणी On line Booster पंप लावून पंपीग करून रेल्वे फाटक येथे मिळत असलेल्या पाण्याच्या दाब वाढवून वरील ठिकाणच्या इलेक्ट्रीक बिल तसेच निगा

देखभाल व दुरुस्तीच्या खर्चात बचत होणार आहे. सदर पंप बसविल्यामुळे वरील भागातील पाणी पुरवठयात सुधारणा होणार असून पाणी पुरवठ्याचे तास कमी होणार आहेत.

सदर कामाकरिता <u>रु.४७०.०३</u> लक्ष एवढया रक्कमेचे अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. तसेच याबाबत निविदा मागविण्यास व पुढील कार्यवाहीसाठी ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करित आहे.

सुचक :- श्री. युवकिशोर पाटील

अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सार्वनूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**पिठासन अधिकारी**

JNNURM/PJP/WS/T2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/१२/२०१२

**प्रकरण क्र. १२ :- कामांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या कामांची खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | मिरारोड (पूर्व) येथील प्लिझंट पार्क ते एम.आय.डी.सी. उर्वरीत डीपी रस्ता तयार करणे व गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.३,९१,९६,८००/- |
| २. | भाईंदर (पू.) आकाश क्लासिक ते रामदेव पार्क ते राम नगर पर्यंत रस्ता तयार करणे व एका बाजुर गटार बांधणे. व आकाशनिधी रामदेव पार्क गटार बांधणे | रू.२,८४,००,६५०/- |
| ३. | भाईंदर (पू.) इंद्रलोक येथील मनसा अपार्ट. ते श्रीराम टॉवर पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ५६,७२,४००/- |
| ४. | भाईंदर (पू.) दिपक हॉस्पीटल येथील हर्ष प्लाझा ते ऑरेंज हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता तयार करणे. | रू. ९६,२६,०५०/- |
| ५. | भाईंदर (पू.) दिपक हॉस्पीटल रस्त्यावरील हर्ष प्लाझा ते पूजा गार्डन पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ५२,४२,४५०/- |
| ६. | भाईंदर (पू.) कनकिया रोड येथील लक्ष्मी पार्क ते शालोम गार्डन इमारती पर्यंत जाणारा रस्ता तयार करणे. | रू. ६२,१७,९००/- |
| ७. | भाईंदर (पू.) राज इनक्लेव्ह इमारत ते साईस्नेहा इमारती पर्यंत (ओल्ड अेज होम) येथील रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रू. ६३,२६,९५०/- |
| ८. | उत्तन येथे नाला बांधणे (मार्केट शिफ्ट करण्यासाठी ) | रू.१,००,००,०००/- |
| ९. | भाईंदर (पू.) राज इनक्लेव्ह इमारत ते साईस्नेहा इमारती पर्यंत (ओल्ड अेज होम) रस्ता तयार करणे. | रू. ९२,९४,७५०/- |
| १०. | प्लेझंट पार्क डॉन बॉस्को शाळा ते काशिमिरा रस्त्यास जोडणारा १८ मी. रूंदीचा डि.पी. रस्ता तयार करणे. | रू.१,७५,७१,०००/- |
| ११. | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता ते वासुदेव कॉम्प्लेक्स कडे जाणारा रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे, गटारे बांधणे. | रु.१,०६,५४,८५०/- |
| १२. | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता न्यू शुभम कॉम्प्लेक्स ते रामदेव पार्क पर्यंत क्रॉस रस्ता तयार करुन गटारे बांधणे. | रुं.२,१२,४६,८५०/- |
| १३. | मिरारोड (पूर्व) सिध्दार्थ नगर ते एस.के.स्टोन कंपनी पर्यत सी.सी. नाला बांधून स्लॅब टाकणे. | रू.१,१२,३०,२००/- |

वरील अंदाजपत्रकांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- सौ. वंदना चक्रे**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. सुहास रकवी ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर (पश्चिम) पोलीस स्टेशन ते एम.टी.एन.एल. पर्यंत ग्रामपंचायतच्या काळापासून तिकडे रस्ता झालेला नाही तर तो रस्ता आणि बाजूला फुटपाथ तयार करणे ह्या कामासाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास मी विनंती करतो. त्याचप्रमाणे आपल्या महापालिकेमार्फत बांधकाम विभागामार्फत जे टेंडर काढले जातात तर जे टेंडर आहेत ते शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन/निर्णय/सी.एस.टी.-०७०६/९४/इमारत २१६/११/२००६ नुसार काढले जात नाही. कारण मजूर सोसायट्या, सुशिक्षित बेरोजगार यांची कामे गेल्या

वर्षीपासून बंद झाले आहेत. तर ती काढावी त्याचप्रमाणे आपण जे टेडर मागवतो त्या टेंडरमध्ये ज्या कंपन्या असतात त्यांना निर्देश दिलेल्या एक बजेट असते की, ३ ते १० कोटी पर्यंत काम करु शकतात. त्यांनासुध्दा ह्यांनी असा क्रायटेरीया लावला आहे की त्यांनी १००% काम केले पाहिजे. तर ते शक्य नाही तर त्या नियमानुसार टेंडर सॅक्शन करावी अशी मी सुचना करतो.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन डिसा ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

नंबर ६, भाईंदर (पूर्व) कनकिया रोड येथील लक्ष्मी पार्क, शालोम गार्डन इमारतीपर्यंत जाणारा रस्ता तयार करणे हा रस्ता पुढे पण करण्याची रिक्वेस्ट आहे. कारण तिकडे एक शाळा आहे. आणि त्याच्यासमोर एक कॉलेज पण आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. प्रमोद सामंत ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरारोडमध्ये शितल नर्सरी ते बालाजी नाल्यापर्यंत मोठ्या प्रवाहाचे गटार बांधण्यात यावे अशी माझी सुचना आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १४/१२/२०१२
## (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा)

प्रकरण क्र. १३ :- निविदांना मान्यता देणे

ठराव क्र. १६ :-

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **मिरारोड (पूर्व) एस.के.स्टोन मेरी गोल्ड नं. २ ते बस स्टॉप नं. १५ पर्यंत नाला बांधणे.**<br>१. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि.<br>२. मे. जेकिन इंटरप्रायझेस<br>३. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन<br>**५. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स**<br>६. मे. श्रीजी कंन्स्ट्रक्शन<br>७. मे. यश इंटरप्रायझेस | रु.४,२७,६६,२००/-<br>१७.१ % जास्त दराने<br>९.१८ % कमी दराने<br>१०.०० % जास्त दराने<br>१५.९ % जास्त दराने<br>**१६.२ % कमी दराने**<br>१४.५ % जास्त दराने<br>११.११ % जास्त दराने |
| २ | **मिरारोड महेश इंडस्ट्रीयल इस्टेंट येथे नाला बांधणे.**<br>१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>**२. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>३. मे. जिनाग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | रु.२,४७,९०,३००/-<br>९.१ % जास्त दराने<br>**५.०० % कमी दराने**<br>१८.०० % जास्त दराने |
| ३ | **काशीगाव पेट्रोल पंप (राष्ट्रीय महामार्ग) ते सिल्व्हर सरीता पाठीमागील आर.एन.ए. पर्यंतचा नाला बांधणे.**<br>१. मे. जेकिन इंटरप्रायझेस<br>**२. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स**<br>३. मे. शयोना कॉर्पोरेशन | रु. ६,७२,७५,४००/-<br>११.८% कमी दराने<br>**१५.३% कमी दराने**<br>१२.९६% जास्त दराने |
| ४ | **मिराधाम अमिश पार्क ते पंजाब फाऊंड्री पर्यंत नाला बांधणे.**<br>१. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि.<br>**२. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>३. मे. शयोना कॉर्पोरेशन | रु. ७,०२,९४,८००/-<br>१५.३% जास्त दराने<br>**११.६% कमी दराने**<br>१४.००% जास्त दराने |
| ५ | **काशिमीरा येथे मांडवी पाडा गोठा (माशाचा पाडा) ते पेट्रोल पंप पर्यंत नाला बांधणे.**<br>१. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि.<br>**२. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>३. मे. शयोना कॉर्पोरेशन | रु. ६,५१,३७,७००/-<br>८.२८ % जास्त दराने<br>**१२.०० % कमी दराने**<br>१४.०० % जास्त दराने |
| ६ | **मिरारोड (पूर्व) सरोगी ॲव्हेन्युर ते रोझ वुड पर्यंत (कनकिया) नाला बांधणे.**<br>१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>२. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>३. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि.<br>**४. मे. महेश्वर बिल्डर्स**<br>(दरवाटाघाटी नंतर)<br>५. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन<br>६. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन<br>७. मे. यश इंटरप्रायझेस | रु. १,७७,६३,६००/-<br>१८.०० % जास्त दराने<br>१८.०० % जास्त दराने<br>१४.०० % जास्त दराने<br>९.९५ % जास्त दराने<br>**२.०० % कमी दराने**<br>१५.५ % जास्त दराने<br>१५.०० % जास्त दराने<br>१०.११ % जास्त दराने |
| ७ | **मिरारोड (पूर्व) रश्मी प्राईम ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत नाला बांधणे.**<br>१. मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन कंपनी<br>२. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>३. मे. जगदंबा कंन्स्ट्रक्शन<br>**४. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.**<br>(दरवाटाघाटी नंतर) | रु. २,७०,९८,१००/-<br>१२.०० % जास्त दराने<br>१६.०० % जास्त दराने<br>१५.०० % जास्त दराने<br>९.०० % जास्त दराने<br>**२.०० % कमी दराने** |

| | | |
|---|---|---|
| | ५. मे. महेश्वर बिल्डर्स<br>६. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन<br>७. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन<br>८. मे. यश इंटरप्रायझेस | १६.९५ % जास्त दराने<br>१५.१ % जास्त दराने<br>१५.५ % जास्त दराने<br>११.११ % जास्त दराने |
| ८ | **मिरारोड सिनेमॅक्स ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत (कनकिया) नाला बांधणे.**<br>१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>**२. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.**<br>(दरवाटाघाटी नंतर)<br>३. मे. महेश्वर बिल्डर्स<br>४. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन<br>५. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन<br>६. मे. यश इंटरप्रायझेस | रु. २,८६,००,६००/-<br>९.८१ % जास्त दराने<br>९.०० % जास्त दराने<br>**२.०० % कमी दराने**<br>१७.९५ % जास्त दराने<br>९.८१ % जास्त दराने<br>१४.५ % जास्त दराने<br>१२.०० % जास्त दराने |
| ९ | **रा.म.क्र. ८ वरील दिल्ली दरबार पासून पंजाब फाऊंड्री कडे जाणारा आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं**<br>२. मे. एसबी इंटरप्रायजेस<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. यश इंटरप्रायझेस<br>६. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु. ४,६९,३२,३००/-<br>**१५.३९ % कमी दराने**<br>१४.८८ % कमी दराने<br>११.९९ % कमी दराने<br>०९.१ % कमी दराने<br>०७.२ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०९.९९ % जास्त दराने<br>१२.०६ % जास्त दराने |
| १० | **रा.म.क्र. ८ वरील ग्रीन व्हिलेज येथील बस्त्याव डिसुजा वाडी ते वेस्टर्न पार्क सोसायटी ते दाचकुलपाडा रस्त्यालगत साई पॅलेस हॉटेल पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. एसबी इंटरप्रायजेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. यश इंटरप्रायझेस<br>४. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>५. मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं<br>६. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>७. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>९. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>१०. मे. शयोना कॉर्पोरेशन | **रु.७,४८,६४,२००/-**<br>**१५.८८ % कमी दराने**<br>१५.०३ % कमी दराने<br>१४.११ % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०६.०३ % जास्त दराने<br>०९.०० % जास्त दराने<br>०९.०८ % जास्त दराने |
| ११ | **मिरारोड (पूर्व) झंकार कंपनी पासून श्री एव्हेन्यू इमारत, रवि ग्रुप रोड पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. आर.के.मधानी अण्ड कं.<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. चिराग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>६. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | **रु.२०,२१,७०,७००/-**<br>**२१.६० % कमी दराने**<br>१३.०६ % कमी दराने<br>११.०८ % कमी दराने<br>१०.०८ % कमी दराने<br>०५.०४ % कमी दराने<br>०.५ % कमी दराने<br>०४.९५ % जास्त दराने<br>०५.०४ % जास्त दराने |
| १२ | **मिरारोड (पूर्व) हटकेश येथिल सॅटेलाईट पार्क पासून घोडबंदर सबस्टेशन उघाडी खाडीकडे जाणारा आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. के.आर. कंस्ट्रक्शन**<br>२. मे. आर.के.मधानी अण्ड कं.<br>३. मे. चिराग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | **रु.१३,३१,४६,४५०/-**<br>**१३.५% कमी दराने**<br>१०.१९% कमी दराने<br>०७.८६% कमी दराने<br>०७.२% कमी दराने<br>०.५% कमी दराने<br>०५.०४ % जास्त दराने<br>०७.०२ % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| १३ | **भाईदर (प.) बेकरी गल्ली ते स्मशानभूमी रस्त्याकडे व ४५.०० मी. डी.पी. रस्ता ते सुभाषचंद्र बोस मैदान नाल्यापर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. यश इंटरप्रायझेस<br>५. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | **रु.८,७४,१०,७००/-**<br><br>**१८.२% कमी दराने**<br>१४.००% कमी दराने<br>०९.०१% कमी दराने<br>०७.०२% कमी दराने<br>०३.०० % जास्त दराने<br>०६.०३ % जास्त दराने<br>०७.९२ % जास्त दराने |
| १४ | **मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल सर्कल ते कार्पोरेशन बँक ते सेक्टर नं. ११ बिल्डीग नं. ३४ पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. के.आर. कंस्ट्रक्शन**<br>२. मे. महेश्वर बिल्डर्स<br>३. मे. यश इंटरप्रायझेस<br>४. एम.ई. प्रोजेक्टस्<br>५. ॲक्युट डिझाईन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>८. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | **रु. २,६६,७३,१००/-**<br><br>**१७.१० % कमी दराने**<br>१४.७७ % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०५.५८ % कमी दराने<br>०४.०५ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०७.११ % जास्त दराने |
| १५ | **मिरारोड (पूर्व) निलम पार्क ते प्रिमीयम अपार्टमेंट ते १०० फुट रेल्वे समांतर रस्ता पर्यंत आर.सी.सी नाला बांधणे.**<br>**१. मे. महेश्वर बिल्डर्स**<br>२. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि.<br>३. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | **रु. ९०,८९,६००/-**<br><br>**१६.४६ % कमी दराने**<br>०९.०१ % कमी दराने<br>०४.०५ % जास्त दराने |
| १६ | **मिरारोड (पूर्व) सेव्हेन इलेव्हन शाळेमागील राज इन्क्लेव्ह पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे**<br>**१. मे. यश इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>५. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | **रु. ४,७७,९६,४००/-**<br><br>**१८.११ % कमी दराने**<br>१६.०२ % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.३३ % कमी दराने<br>०८.०१ % जास्त दराने |
| १७ | **मिरारोड (पूर्व) गौरव इन्क्लेव्ह सर्कल ते मंगलनगर उघाडी पर्यंत दोन्ही बाजूस आर.सी.सी नाला बांधणे.**<br>**१. मे. यश इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. एसबी इंटरप्रायजेस<br>४. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि.<br>५. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>६. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | **रु. १,९३,७६,२००/-**<br><br>**१६.११ % कमी दराने**<br>१४.०४ % कमी दराने<br>१२.५१ % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.३३ % कमी दराने<br>०५.०५ % जास्त दराने |
| १८ | **भाईदर (प.) फ्लाय ओव्हर ते नाझरेथ उघाडी पर्यंत नाला बांधणे.**<br><br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. आर.के.मधानी ॲण्ड कं.<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. चिराग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. शायोना कॉर्पोरेशन<br>६. मे. आर ॲण्ड बी इंन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. | रु. २७,२१,२६,६००/-<br><br>**१८.६ % कमी दराने**<br>१६.२१ % कमी दराने<br>१४.४ % कमी दराने<br>१०.३५ % कमी दराने<br>१०.०४ % कमी दराने<br>७.०० % जास्त दराने |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदारांनी सादर केलेल्या सर्वात कमी दराचे निविदा ह्या वाजवी आहेत. तरी अ.क्र.१ च्या कामी **मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** यांची **१६.२ % कमी दराची** निविदा, अ.क्र.२ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस यांची ५.०० % कमी दराची निविदा** अ.क्र.३ च्या कामी **मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** यांची १५.३ % कमी दराची निविदा अ.क्र.४ च्या कामी मे. **जेकिन इंटरप्रायझेस यांची ११.६** % कमी दराची अ.क्र.५ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस यांची १२.०० % कमी दराची,** अ.क्र.६

च्या कामी मे महेश्वरी बिल्डर्स यांची दर वाटाघाटीनंतर २.०० % कमी दराची निविदा, अ.क्र.७ च्या कामी मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची दर वाटाघाटीनंतर २.०० % कमी दराची निविदा, अ.क्र.८ च्या कामी मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रां.लि. यांची दर वाटाघाटीनंतर २.०० % कमी दराची निविदा, अ.क्र.९ च्या कामी यांची दर वाटाघाटीनंतर मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं. १५.३९ % कमी दराची निविदा, अ.क्र.१० च्या कामी मे. एसबी इंटरप्रायजेस यांची १५.८८ % कमी दराची निविदा, अ.क्र.११ च्या कामी मे. जेकिन इंटरप्रायजेस यांची २१.६० % कमी दराची निविदा, अ.क्र.१२ च्या कामी मे. के.आर. कंस्ट्रक्शन यांची १३.५ % कमी दराची निविदा, अ.क्र.१३ च्या कामी मे. जेकिन इंटरप्रायजेस यांची १८.२ % कमी दराची निविदा, अ.क्र.१४ च्या कामी मे. के.आर. कंन्स्ट्रक्शन यांची १७.१० % कमी दराची निविदा, अ.क्र.१५ च्या कामी मे. महेश्वर बिल्डर्स यांची १६.४६ % कमी दराची निविदा, अ.क्र.१६ च्या कामी मे. यश इंटरप्रायझेस यांची १८.११ % कमी दराची निविदा, अ.क्र.१७ च्या कामी मे. यश इंटरप्रायझेस यांची १६.११ % कमी दराची निविदा, अ.क्र.१८ च्या कामी मे. जेकिन इंटरप्रायजेस यांची १८.६ % कमी दराची निविदा, या सर्व निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. राजेश वेतोसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत E-Tendering द्वारे Online निविदा स्विकारल्या जातात, परंतु Online सादर केलेल्या कागदपत्रांबाबत काही वेळेस प्रिंट मिळत नाही व वाद निर्माण होतात, त्यामुळे यापुढे निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेच्या दिवशी व वेळेत संबंधित ठेकेदारांनी हार्ड कॉपी सुध्दा महानगरपालिकेकडे सादर करण्याची अट निविदेत टाकावी.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | निरंक |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ८ | मेंडोन्सा स्टिवन जॉन | ८ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ९ | मेहता डिंपल विनोद | |
| १० | डॉ. आसिफ गुलाब शेख | १० | केळुसकर प्रशांत नारायण | |
| ११ | गोविंद हेलन जॉर्जी | ११ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १२ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | लियाकत ग. शेख | १३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १४ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १४ | शरद केशव पाटील | |
| १५ | खण्डेलवाल सुरेश | १५ | मेघना दिपक रावल | |
| १६ | नरेश तुकाराम पाटील | १६ | जैन गिता भरत | |
| १७ | शबनम लियाकत शेख | १७ | जैन रमेश धरमचंद | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १९ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १९ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | भावसार शिल्पा कमलेश | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | वंदना रामदास चक्रे | २२ | जैन सिमा महेंद्र | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २४ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | २४ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २५ | जैन दिनेश तेजराज | |
| २६ | पिसाळ मनिषा नामदेव | २६ | अरोरा दिपिका पंकज | |
| २७ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २७ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २८ | पाटील सुनिता कैलास | २८ | अनिल बाबुराव भोसले | |
| २९ | वेतोसकर राजेश शंकर | २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | प्रभात प्रकाश पाटील | ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३१ | बगाजी शर्मिला विल्सन | ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३२ | झिनत रऊफ कुरेशी | ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३३ | सिंद्धीक मोहम्मद फरिद कुरेशी | ३३ | तारा विनायक घरत | |
| ३४ | पुजारी कांचना शेखर | ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३५ | काझी रशीदा जमील | ३५ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३६ | इनामदार जुबेर | ३६ | जयमाला किशोर पाटील | |
| ३७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३७ | संदिप मोहन पाटील | |
| ३८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३८ | परमार अनिता भरत | |
| ३९ | डिसा मर्लिन मर्विन | ३९ | पाटील प्रणाली संदिप | |
| ४० | भट दिप्ती शेखर | ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४१ | विराणी रेखा अनिल | ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४२ | सामंत प्रमोद जयराम | ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४६ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

२८

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १४/१२/२०१२.

(दि. ७/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा)

## ।। ठराव ।।

**प्रकरण क्र.)४ :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) कनाकिया जलकुंभ पासून रामदेव पार्क ते आयडीयल पार्क ते इंद्रलोक पर्यंत नविन जलवाहिनी अंथरणेबाबत...

**ठराव क्र** ७७

वरील संदर्भिय विषयानुसार मिरा-भाईंदर शहराची वाढ ही प्रामुख्याने भाईंदर (पुर्व) येथील मौजे गोडदेव, नवघर, गावांच्या हद्दीत झालेली आहे. सदर ठिकाणी प्रामुख्याने मोठी गृहसंकुले उभारण्यात आलेली आहेत. भाईंदर (पुर्व) येथील प्रभाग क्र ३१ हा प्रामुख्याने नव्याने विकसीत झालेला परिसर असून लोकसंख्या वाढीचे प्रमाण हे अधिकच जास्त आहे. सदर परिसरातील नागरीकांना पाणी पुरवठा हा कनाकिया जलकुंभाव्दारे होत आहे. सदर परिसरात काही ठिकाणी पाणी पुरवठा कमी दाबाने होत असल्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरीक यांचेकडील तक्रारींचे प्रमाण वाढले आहे. तसेच सदर परिसरात काही ठिकाणी महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिन्यासुद्धा अस्तित्वात नाही.

त्यानुसार सदर परिसराची प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन कनाकिया जलकुंभापासुन इंद्रलोक, रामदेव पार्क, आडीयल पार्क, श्रीराम नगर, वागड नगर, कनाकिया पार्क परिसरात विविध व्यासाच्या जलवाहिनी अंथरल्यास परिसरातील पाणी पुरवठयाची समस्या दूर होऊ शकेल. तसेच नागरिकांना उदभवलेली कमी दाबाने व कमी प्रमाणात होणाऱ्या पाणी पुरवठयाची समस्या दूर होऊ शकते. सदर कामासाठी रू.१,४०,०६,३००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

तरी मिरा-भाईदर महानगरपालिका हदिदतील भाईदर पुर्व कनाकिया जलकुंभापासुन रामदेव पार्क ते आयडीयल पार्क इंद्रलोक पर्यत नविन जलवाहिनी अंथरणे (अंदाजित खर्च रू.१,४०,०६,३००/-) कामासाठी होणाऱ्या खर्चास व निविदा मागविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- (सही)
कार्नड डिमेलो.

अनुमोदक :- (सही)
वंदना चक्रे

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

(सही)
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१४/१२/२०१२**

(दि.७/१२/२०१२ रोजीची तहकूब सभा)

## // ठराव //

**प्रकरण क्र.** ( १५ ) :- कमला पार्क येथील उंच सलोह जलकुंभाची (क्षमता १.७५ द.ल.ली.) IIT मुंबई यांनी दिलेल्या अहवालानुसार दुरुस्ती करणे बाबत.

**ठराव क्र.** ( ९८ ) :-

मिरा भाईंदर महानगरपालिके अंतर्गत डोंगरी संतुलन टाकी, चेना, वर्सोवा, गोडदेव, कमला पार्क, मोर्वा व उत्तन येथील उंच सलोह जलकुंभ १९८६ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण टप्पा-१ या योजने अंतर्गत बांधलेले आहेत. सदर जलकुंभ जुने झाले असून त्यांचे Structural Audit करुन मिळणेबाबत. IIT मुंबई यांना दि. १५/०२/२०१२ रोजी कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने IIT मुंबई यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी दि. १७/०२/२०१२ रोजी प्रत्यक्षात कार्यक्षेत्रावरती सर्व उंच सलोह जलकुंभांची व संतुलन टाकीची पाहणी केली दि. ०९/०३/२०१२ रोजी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरती RCC Structure च्या आवश्यत्या सर्व चाचण्या घेण्यात आल्या. सदर चाचणींच्या अनुषंगाने IIT मुंबई, यांनी अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवालानुसार कमला पार्क येथील ESR Structurally सुरक्षित असून उघडले पडलेले Beam, Slab, Staircase व कंटेनर इत्यादी उपागांची दुरुस्ती IIT मुंबई ने नमुद केलेल्या सुचना नुसार करणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत टाकीचे स्टील उघडे पडून गंजलेले आहे. त्यामुळे तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे अन्यथा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यानुसार सदर दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रकीय खर्च रु. ६१,४४,६६९/- एवढे येत असून सदर काम पाण्याची टाकी / इमारत बांधकाम या लेखाशिर्ष अंतर्गत रु. १५०.०० लक्ष तरतुद असून सदर तरतुदी अंतर्गत दुरुस्तीसाठी येणारा खर्च रु. ६१,४४,६६९/- ला मंजूरी मिळून दुरुस्ती करणेकामी हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :-** श्री. बर्नार्ड डिमेलो

**अनुमोदक :-** श्री. जुबेर इनामदार

**ठराव सार्वनूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**पिठासन अधिकारी**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## दि. ०१/१२/२०१२ मा. महासभा सुचना क्र. ०३ यानुसार
## तहकूब मा. महासभा शुक्रवार दि. १४/१२/२०१२

**प्रकरण क्रमांक (१६) :-** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८ क नुसार "रस्ता कर" लागू करणेस मंजूरी बाबत.**

**ठराव क्रमांक (१९) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत रु. १९०० कोटींचे प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०% शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत एम. ओ. यु. मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १४८क नुसार रस्ता कर लावण्याची तरतूद असून तरतूदी नुसार "रस्ता कर" १०% पर्यंत लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे, असे त्यांनी गोषवारामध्ये सुचवीले आहे.

०१ एप्रिल, २०१० पासून महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेला "जकात कर" रद्द करुन त्याऐवजी "स्थानिक संस्था कर" लागू करणेचे निर्देश राज्य शासनाचे महानगरपालिकेस दिलेले आहेत. त्याप्रमाणे २०१०-२०११ मध्ये ११९.४३ कोटी सन २०१२-१३ मध्ये १५१.८ कोटी आणि चालू वर्षाच्या ८ महिन्यांच्या अवधीमध्ये ८९.४१ कोटी इतके उत्पन्न महापालिकेला झलेले आहे. तसेच मा. महासभा दि. ३०/०७/२०१० प्रकरण क्रमांक. २७ ठराव क्र. ३१ प्रमाणे मा. महासभेने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ३३, परिशिष्ठ ४ मधील ६ अन्वयेच्या तरतूदीनुसार मालक किंवा पट्टाधारक यांनी सुविधा विकसीत करुन हस्तांतरीत केल्यास हस्तांतरीत केलेल्या क्षेत्रा इतके विकास हक्क प्रमाणपत्र जमीनधारक किंवा पट्टाधारक यांना देता येते. या तरतूदीनुसार रस्ता किंवा आरक्षणे ही एकाच मालकाची असल्यास, या तरतूदीचा अवलंब करता येतो. तथापि, रस्ता व बांधकाम योग्य आरक्षणे यांचा मालकी हक्क विविध धारकांकडे/विकासकाकडे/उपविकासकाकडे/अधिकारपत्राधारकाकडे असल्यास या तरतूदीचा वापर करता येत नाही. तसेच विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ९(IV) (A) नुसार नियोजित रस्ते हे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये रस्ते व बांधकाम योग्य आरक्षणे विकसीत करावयाचे असल्यास, अशा सोईसुविधांचे अंदाजपत्रक महानगरपालिकेकडून तयार करुन संभाव्य खर्चाचा आढावा घेण्यास द्यावा व सुविधेसाठी होणा-या संभाव्या किमान खर्चावर आधारीत त्या-त्या नियोजन प्रभागातील बाजारमुल्य तक्त्यातील दरानुसार विकास हक्क प्रमाणपत्र खर्चाचे प्रमाणात क्षेत्राचे स्वरुपात देण्यात येईल, या अटीवर जाहीर निविदा मागवून स्पर्धात्मक जो विकासक/कंत्राटदार कमीत कमी विकास हक्क प्रमाणपत्र घेण्याचे बोली निविदा पध्दतीनुसार सादर करेल, त्यास या सुविधा विकसीत करण्यासाठी कार्यादेश देता येवू शकेल. या पध्दतीनुसार सुविधा विकसीत केल्यास महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. तसेच सुविधा विकासासाठी कर्ज उपलब्ध करुन घेण्याची आवश्यकता भासणार नाही. सुविधा / विकास कामे ही महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार कार्यप्रणाली व संहितेप्रमाणे होवू शकतात. तसेच या विकसीत होणा-या सोईसुविधांची गुणवत्ता तपासणी व इतर बाबी ह्या महानगरपालिकेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार होणे आवश्यक राहील. या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बाब क्र. ९(IV)(A) व बाब क्र. ३३ परीशिष्ठ ४(६) मधील मिरा भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कल ३७(१) अन्वये प्रस्तावित फेरबदल आवश्यक वैद्यानिक कार्यवाही पूर्ण करुन अंतिम मंजूरी करीता पत्र क्र. मनपा/नर/३१६६/२०१०-२०११ दि. २९/११/२०१० व स्मरण पत्र. मनपा/नर/१८६०/२०११-२०१२ दि. १६/०९/२०११ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. CZMP नकाशानुसार बहुतांश क्षेत्र

सी.आर.झेड. ने बाधीत होत आहे. त्यामुळे विकासावर निर्बंध आलेले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, चौक, पाली, डोंगरी व तारोडी या पाच गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) ची नियुक्ती झालेली आहे. तसेच मिरा-भाईंदर शहरामध्ये (JNNURM) अंतर्गत भुयारी गटार योजनेचे काम राबविले जात आहे. आजमितीस सरासरी ६०% काम पूर्ण झालेले आहे व ब-याच रस्त्यांवर आजही मलःनिसःरण वाहिनी अंथरण्याचे काम सुरु आहे. तद्नंतर सदरच्या जलवाहिनीला इमारतींना जोडण्याचे कामही करावयाचे शिल्लक आहे. त्या कारणास रस्त्यांची ब-याच प्रमाणात मोडतोड होणार आहे. सन २०११-१२ या वर्षापासुन ८% भुयारी गटार योजनेकरीता कर शहरवासीयांना मालमत्ता करामध्ये लागू केलेला आहे. स्थानिक उपकर विभागामार्फत मिळणारे उत्पन्न व विकास योजनेमध्ये खाजगी माध्यमातून रस्ते विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी अंतिम टप्प्यात आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करताना प्रशासनाने दिलेला रस्ता कर लागू करण्याचा दिलेला प्रकरण क्र. १६ चा विषय फेटाळत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सूचक :** श्री० जुबेर इनामदार

**अनुमोदक :** श्री. बर्नड डिमेलो

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**महापौर**

**सौ. कॅटलीन परेरा**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १४/१२/२०१२
## (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. १७ :-** **महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. २० :-**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

**"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."**

शासनाचे दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रातील उक्त नमुद निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि. २२/१२/२०११, ठराव क्र. ६७ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रत्येकी रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु.५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु.११००/- याप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण तरतुद रु. १.१३ लाख इतकी होती. त्या तरतुदीतून रु. ९८.११ लाख सानुग्रह अनुदान मंजूरीस कार्योत्तर मंजूरी दिलेली आहे.

सन २०११-१२ या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनांनी पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. १०,०००/- - |
| २) | मिरा भाईंदर कामगार सेना | रु. १०,०००/- |
| ३) | श्रमजीवी, वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना | रु. १२,०००/- |

त्याअनुषंगाने महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणेसाठी दि. ०७/११/२०१२ रोजी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली व मा. उप-महापौर व मा. आयुक्त सो., यांचे उपस्थितीत महानगरपालिकेतील सर्व पक्षीय गटनेते व महानगरपालिकेतील अधिकारी यांची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत महानगरपालिकेतील स्थायी/अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना खालील प्रमाणे दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणेत आला आहे.

सन २०१२-१३ च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष "संकिर्ण" "फ"(१६) मध्ये रु. १२०.०० लाख आहे. व शिक्षण मंडळ (महसुली) सानुग्रह अनुदानापोटी तरतुद

रु. १५.०० लाख मिळून रक्कम रु. १३५.०० लाख तरतुदीतून महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गांची संख्या दि. ३१/०३/२०१२ रोजी सहा महिन्यांपेक्षा अधिक सेवा झालेली आहे, अशा कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना मा. महापौर यांचे मान्यतेनुसार खालील प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | प्रती कर्मचारी सानुग्रह अनुदान रक्कम | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मनपा वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील अधिकारी/कर्मचारी (स्थायी) | १४४८ | ७,८००/- | १,१२,९४,४००/- |
| २. | मनपा प्राथमिक शिक्षक कर्मचारी (स्थायी) | १९३ | ७,५००/- | १४,४७,५००/- |
| ३. | संगणक चालक/लघुलेखक (अस्थायी) | ७७ | ५,०००/- | ३,८५,०००/- |
| ४. | बालवाडी शिक्षक (अस्थायी) | ०५ | ४,०००/- | २०,०००/- |
| ५. | आर. सी. एच. कर्मचारी (अस्थायी) | २९ | ५,०००/- | १,४५,०००/- |
| ६. | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी | २७ | ४,०००/- | १,०८,०००/- |
| | | | **एकुण** | **१,३३,९९,९००/-** |

वरील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे सन २०११-१२ या वर्षात नियमीत कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानासाठी सन-२०१२-१३ च्या अंदाजपत्रकात एकूण रक्कम रु. १,३५,००,०००/- तरतुद आहे. त्या तरतुदीतून महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांसह शिक्षकास व मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना एकुण रु. १,३३,९९,९००/- (अक्षरी रुपये एक कोटी तेहतीस लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र.) एवढ्या रकमेच्या सानुग्रह अनुदान वाटपासाठी झालेल्या खर्चास मा. महासभा कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

उपरोक्त विषयामध्ये मंजूर ठरावात खालील उपसुचना घेण्यात यावी. मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत लिंक वर्कर्स यांना रु. १,३५,००,०००/- ह्या मंजूर तरतुदीतील रु. १,३३,९९,९००/- एवढी रक्कम वजा जाता उर्वरीत १ लाख रु. एवढी रक्कम लिंक वर्कर्स ह्यांना सानुग्रह रक्कम वाटून देण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. ०१/१२/२०१२ मा. महासभा सुचना क्र. ०३ यानुसार

## तहकूब मा. महासभा शुक्रवार दि. १४/१२/२०१२

**प्रकरण क्रमांक ( १८ ) :- मिरारोड(पूर्व) रामनगर व जांगीड इन्क्लेव्ह येथील ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत बांधलेल्या इमारती मधील जागा वापराबाबत विचार विनिमय निर्णय घेणे.**

**ठराव क्रमांक ( २१ ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावलीतील ॲमिनिटी ओपन स्पेस या तरतुदीन्वये मिरारोड (पूर्व) रामनगर येथे व मिरारोड (पूर्व) जांगीड इन्क्लेव्ह ह्या दोन इमारती मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेल्या आहेत. रामनगर येथील इमारत तळ अधिक दोन मजल्याची व जांगीड इन्क्लेव्ह येथील इमारत तळ अधिक चार मजल्याची आहे. सदर इमारतीची उपयोग सार्वजनिक वापरासाठी करावयाचा असून इमारतीमध्ये खालील वापर प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. <u>जांगीड इन्क्लेव्ह इमारत :</u>

तळमजला :- मुलांकरीता इनडोअर गेम
पहिला मजला :- लग्न व इतर कार्यक्रमांना भाड्याने देण्याकरीता
दुसरा मजला :- अभ्यासिका व वाचनालय
तिसरा मजला :- संगणक प्रशिक्षण केंद्र
चौथा मजला :- महानगरपालिका कामकाजासाठी राखीव
सदर इमारतीस **<u>कै. श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख</u>** हे नाव देण्यात यावे.

भुतपूर्व मुख्यमंत्री कै. श्री. विलासराव देशमुख साहेबांचा या शहराच्या विकासामध्ये सिंहाचा वाटा आहे.

१. **<u>प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन व नामकरण:-</u>** दि.०५/१०/२००० रोजी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन कै. श्री. विलासराव देशमुख साहेबांनी आपल्या शुभहस्ते करुन इमारतीचे **"स्व. इंदिरा गांधी भवन"** असे नामकरण केले.

२. **<u>शहराकरीता ५० द.ल.लि. पाणी पुरवठा कार्यान्वित:-</u>** सन-२००२ मध्ये कै. श्री. विलासराव देशमुख साहेब महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असताना मिरा-भाईंदर शहराकरीता ५० द.ल.लि. पाणी पुरवठ्याची योजना कार्यान्वित झाली.

३. **<u>शहराकरीता ३५ द.ल.लि. पाणी पुरवठ्यास मंजुरी:-</u>** सन-२००२ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन ३५ द.ल.लि. पाणी पुरवठा या शहराकरीता मंजूर केला.

४. **<u>नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत:-</u>** कै. श्री. विलासराव देशमुख साहेबांच्या शिफारशीने दि. २८ फेब्रुवारी, २००२ रोजी मिरा-भाईदर नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये करण्यांत आले.

५. **<u>शहरासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. योजना:-</u>** जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून मिरा-भाईंदर शहराकरीता १९५० कोटीच्या शहर विकास आराखड्यास मंजुरी प्राप्त केली, त्या अंतर्गत शहरामध्ये विविध ठिकाणी भुयारी गटारे बांधणेची कामे सुरु आहेत तसेच परिवहन सेवेतील ५० बसेसचा लाभही शहरातील जनतेला होत आहे व सदर योजनेच्या तिस-या टप्प्यामध्ये **मेट्रोरेल योजना**ही या शहरामध्ये कार्यरत होणार आहे.

६. **<u>एम.एम.आर.डी.ए. कडून कर्ज:-</u>** सन-२००८ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या माध्यमातुन ५० कोटीचे कर्ज शहरात भुमिगत गटार व डी.पी. रस्ते बांधणेकरीता मंजूर केले.

७. **<u>दफन भुमी हस्तांतरीत:-</u>** भाईंदर पश्चिम येथे भोरी समाजाकरीता शासनाकडून दफन भुमीकरीता भूखंड हस्तांतराला मंजुरी दिली.

८. **<u>शहरासाठी पोलीस व न्यायव्यवस्था बळकटीकरण:-</u>** मिरा-भाईंदर शहराकरीता खारीगांव, नवघर, भाईंदर पुर्व येथे त्या परिसराकरीता स्वतंत्र पोलीस ठाणेला मान्यता दिली व जिल्ह्यामध्ये कायदा व सुरक्षा राखण्याकरीता पोलीस अधिक्षक, अतिरिक्त पोलीस निरीक्षक व मिरा भाईंदर शहराकरीता सहाय्यक पोलीस अधिक्षक ही पदे निर्माण केली. तसेच शहरामध्ये पोलीस दलाचे बळकटीकरण करण्याकरीता सर्व्हे क्र. २३३ शासकीय भूखंड पोलीस ग्राऊंड, पोलीस रहिवाशी वसाहत व पोलीस विभागाच्या प्रशासकीस इमारतीसाठी पोलीस विभागाला हस्तांतरीत केले.

९. **<u>न्यायदंडाधिकारी साठी जागा व पद मंजुरी:-</u>** मिरा-भाईंदर शहराकरीता शासनाकडून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साठी जागा उपलब्ध करुन दिली. तसेच प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीची पदे शहरासाठी मंजूर केली. उत्तन-चवळी येथे राष्ट्रीय ज्युडीशियल ॲकेडेमीची स्थापना व निर्मीती करुन मिरा-भाईंदर शहराला गर्विष्ठ होण्याची संधी दिली. मिरा-भाईंदरचे उत्तन व जवळच्या गोराई-मनोरी परिसराला पर्यटक परिसर असे घोषीत केले.

१०. **<u>शैक्षणिक संस्थेला प्राधान्य:-</u>** कै. श्री. विलासराव देशमुख साहेब महसूल मंत्री असताना मिरा-भाईंदर शहराच्या साक्षरतेच्या दृष्टीकोनातुन भाईंदर पुर्व, नवघर येथिल **"शंकर नारायण शैक्षणिक संस्थेला"** शासकीय जागा उपलब्ध करुन दिली.

११. **<u>शहर विकास आराखडयाला मंजुरी:-</u>** कै. विलासराव देशमुख साहेबांनी शहराच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली. ज्यामुळे आज शहरामध्ये विविध ठिकाणी उद्याने, मैदाने, इस्पितळ, बाजार, शैक्षणिक संस्था व इतर संस्था कार्यान्वित असून आपले शहर विकसीत झाल्याचे दृश्य आम्हांस आज दिसत आहे व दैनंदिन त्याची गुणवत्ताही वाढत आहे. कै. विलासराव देशमुख साहेबांचा या शहरावरचे प्रेम आणि विकासीकरणाचा वाटा ह्याची तुलना एका इमारतीला नाव देऊन भागू शकत नाही, हे शहर त्यांचे योगदान कधीच विसरु शकणार नाही.

काँग्रेसचे नेते माजी आमदार मा. श्री. मुझफ्फर हुसेन साहेबांनी वर उल्लेखलेल्या प्रत्येक कामांची मागणी कै. विलासराव देशमुख साहेबांकडे केली व त्यांनी प्रत्येक विषयावर जातीने लक्ष देवून विलंब न करता मान्यता दिली.

अशा विकास पुरुषाला या शहरवासीयांकडून मन:पुर्वक आदरांजी व श्रध्दाजलीच्या रुपात सदरच्या इमारतीला **कै. श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख** हे नाव देण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

२. **<u>रामनगर येथील इमारत</u> :**

तळमजला :- १) वरिष्ठ नागरीकांसाठी योग व इतर कार्यक्रमाकरीता देणे (मागचा हॉल)
२) अभ्यासिका हॉल

पहिला मजला :- लग्नकार्य व इतर कार्यक्रमांसाठी भाड्याने देणेसाठी ठेवावे.

दुसरा मजला :- दुस-या मजल्यावर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारतीमध्ये जागा कमी पडत असल्याने शिक्षण, परवाना, वाहन, भांडार, आरोग्य, जाहिरात इ. विभाग स्थलांतरीत करण्यात येत आहेत. मनपाच्या कार्यालयासाठी सदर जागा ठेवण्यात यावी.

सदर इमारतीत **"राष्ट्रसंत श्री. पदमसागर सुरीजी"** हे नाव देण्यात येत आहे.

मा. नोंदणी उपमहानिरीक्षक व मुंद्रांक उपनियंत्रक, कोकण विभाग, ठाणे यांनी ॲमीनीटी ओपन स्पेस धील जांगीड इन्क्लेव्ह व रामनगर ॲमिनीटी हॉल ची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत (२०००.०० चौ. फूट ची दोन कार्यालये) कळविले आहे.

रामनगर येथील तळ मजल्यावरील २००० चौ. फूट जागा सह दुय्यम निबंधक ठाणे क्र. १० व १२ कार्यालयासाठी तसेच १००० चौ. फूट जागा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांच्या कार्यालयांना शासकीय दराने भाडे घेऊन जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.

वरीलप्रमाणे संबंधीत कार्यालयांना व वापर करण्याकरीता जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. असा ठराव मांडत आहे

**सूचक :** श्री जुबेर इनामदार

**अनुमोदक :** ध्रुवकिशोर पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

महापौर
सौ. कॅटलीन **परेरा**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १४/१२/२०१२
## (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. १९ :- मानधनावरील संगणक चालक /लघुलेखक यांच्या मुदतवाढी बाबत.....**

**ठराव क्र. २२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृतांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि. २९/०९/२००६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मानधन तत्वावर संगणक चालक नेमण्याबाबत आणि आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकाची पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करता येत नाही. त्यामुळे संगणक चालकाचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने (**Outsourcing**) करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे. तद्नंतर मा. महासभा दि. २०/०३/२०१०, ठराव क्र. ६५ अन्वये मंजुरी दिल्यानुसार संगणक चालकाच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास दि. १८/०८/२०१० रोजी पाठविला होता. परंतु त्यास अद्याप मंजुरी प्राप्त नाही.

१) मा. महासभा दि.२२/१२/२०१०, ठराव क्र.६८ नुसार महापालिकेत मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु.६५००/- तसेच लघुलेखक यांना रु. ७५००/- प्रती महिना या ठोक मानधनावर मा. महासभा दि. २९/०९/२०११, ठराव क्र. ६१ अन्वये संगणक चालक/लघुलेखक यांना दि. ०१/११/२०११ पासुन पूढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ दिलेली आहे. सदरची मुदत वाढ दि. ३०/०९/२०१२ रोजी संपत आहे.

२) महानगरपालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकची पदे मंजूर नाहीत. तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार बाह्य मार्गाने संगणक चालकाचे काम करुन घेण्याचे निर्देश आहेत.

३) सद्यःस्थितीत संगणक चालक/लघुलेखक यांचा पदनिर्मिती प्रस्ताव शासनाजवळ प्रलंबीत असुन शासनाने महानगरपालिकेस दि. २३/०८/२०११ रोजीचे पत्रानुसार संगणक चालक व लघुलेखक यांचे प्रस्तावावर कार्यवाही करणेकरीता महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ अंतीम करुन शासनास पाठविणे आवश्यक आहे असे कळविले आहे.

महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ हे हरकती सुचनांवर सुनावणी झाल्यावर अंतिम मंजुरीसाठी दि. १४/०९/२०१० रोजीच्या मा. महासभेपुढे मान्यतेस्तव ठेवले असता सदर विषय प्रथम गटनेत्याचे बैठकित चर्चा करुन मा. महासभेत घेणेबाबत तत्कालीन मा. महापौर सो., यांनी सुचना दिल्या. त्या नंतर गटनेत्याची मा. महापौर सो., यांनी दोन वेळा बैठका बोलविल्या. परंतु त्या बैठकित अंतिम निर्णय न झाल्यामुळे अद्याप महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यांना मा. महासभेची अंतिम मान्यता मिळालेली नाही. मा. महासभेची अंतिम मान्यता न मिळाल्यामुळे सेवाशर्ती नियम

शासनास पाठविता आलेले नाहीत. मा. महासभेने सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यास मान्यता दिल्यानंतर शासनाचे दि. २३/०८/२०११ चे पत्रावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. सद्यःस्थितीत महानगरपालिकेच्या विविध विभागात ८० संगणक चालक कार्यरत असुन ०३ लघुलेखक सचिव विभागात कार्यरत आहेत. महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१२-१३ मध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामध्ये रु. ७०.०० लाख इतकी तरतूद करणेत आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाचा आवाका पहाता संगणक चालक तसेच लघुलेखक यांना एक दिवसाचा तांत्रीक खंड देऊन **पुढील अकरा महिन्यांकरीता** मुदतवाढ देणेस ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

तसेच ठोक मानधनावरील कार्यरत ८० संगणक चालक व ३ लघुलेखक ह्यांच्या प्रति महा मानधनामध्ये २० टक्के वाढ करण्यांत यावी व लागणारी अतिरीक्त तरतुद सन २०११-१२ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील “आरोग्य व सोयी अनु.०१ स्थायी आस्थापना” या लेखाशिर्षामधून पूर्नविनीयोजीत करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. नगरसेविका सौ. प्रभात पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

१. संबंधीत संगणकचालकांचे (जुने संगणकचालक/नवे संगणकचालक) मानधन एकच असावे.

२. महानगरपालिकेमध्ये जेव्हा पण पदनिर्मिती होईल तेव्हा तेव्हा या कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार व्हावा.

३. सध्या आपल्याकडे मजुर/माळी/ लिपिक इ. जागांसाठी अर्ज मागितले आहेत त्यात ह्या संगणक चालकांनी अर्ज केले आहेत त्यातही त्यांचा अग्रक्रमाने विचार व्हावा.

**मा. महापौर यांनी दिलेले निर्देश**

सर्व संगणक चालक यांना सर्वानुमते दरमहा साडेनऊ हजार रुपये इतके मानधन व लघुलेखक यांना दरमहा साडेदहा हजार इतके मानधन देण्यात यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

४०

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि.१७/१२/२०१२

(दि.७/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र.(२०) मिरा भाईदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, नगरभवन व भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय या इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविणे कामी मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्र. (२३)

सार्वजनिक इमारतींमधील अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करणेचे शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार प्रथम टप्प्यात मिरा भाईदर महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय, नगर भवन व भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रूग्णालय मिरारोड या सार्वजनिक इमारतींच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करण्यात आले आहे. सदर इमारतींमध्ये आवश्यक असलेली अग्निशमन यंत्रणा महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग – ४ मध्ये नमुद केलेली आहे.

सदर कामी कोटेशन मागविले असता, प्राप्त कोटेशन मधील नमुद कामांपैकी अत्यावश्यकच कामे करून घेणेकरिता खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येत आहे.

| मुख्य कार्यालय यंत्रणा बसविणे कामी | | अंदाजित खर्च (रु.) |
|---|---|---|
| १ | Wet hydrant System | 35,00,000/- |
| २ | Sprinkler System | 30,00,000/- |
| | | **65,00,000/-** |
| इंदिरा गांधी रुग्णालय मिरारोड | | |
| १ | Wet hydrant System | 20,00,000/- |
| २ | Fire Extinguishers | 2,00,000/- |
| | | **22,00,000/-** |
| नगरभवन | | |
| १ | Wet hydrant System | 30,00,000/- |
| २ | Fire Extinguishers | 2,00,000/- |
| | | **32,00,000/-** |
| | Total | **1,19,00,000/-** |

उपरोक्त इमारतीमध्ये प्रस्तावित अग्निशमन यंत्रणा उभारण्याकरीता रु. १,१९,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च "आग सुरक्षा निधी" या लेखाशिर्षामधून करण्यास मंजूरी देत आहे. तसेच उक्त तक्त्यात सुचविलेली अग्निशमन यंत्रणा त्या त्या इमारतीत उभारणेकामी महाराष्ट्र शासनाकडून लायसन्स प्राप्त लायसन्स अभिकरणाकडून करून सदरचे काम करून घेणे करीता जाहिर ई-टेंडरिंग पध्दतीने निविदा मागविणेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

मा. महापौर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१४/१२/२०१२

(दि.१/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्रमांक ( २१ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मार्केट इमारतीमधील हद्दीतील गाळ्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ( २४ ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या दहा मार्केट इमारती असून सदर मार्केटमध्ये बसणाऱ्या मासळी विक्रेत्याकडून रू. ३००/- प्रति महीना व मटन विक्रेत्याकडून रू. ६००/- भाडे आकारण्याबाबत मा. स्थायी समिती सभा दि.३०/०६/२००६ ठराव क्र. ४१ अन्वये निर्णय झाला होता. त्यानुसार सर्व संबधिताना रक्कम भरण्याबाबत वेळोवेळी बिले देण्यात आली होती. तथापी बऱ्याच विक्रेत्यांनी सदर भाडे भरलेले नव्हते. तसेच मासळी विक्रेत्याच्या संघाकडून महानगरपालिकेने ठरविलेले दर जास्त असल्याने सदर दर आकारणी दिनांकापासून कमी करावे तसेच बाजाराच्या स्वच्छतेची, साफसफाईची हमी स्वत घेउु असे कळविले होते. त्यानुसार सदर प्रस्तावावर विचार विनिमय करण्याकरीता प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा. महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र. ७० अन्वये सदर मासळी विक्रेत्याकडून कर आकारणी दिनांकापासून रू. २०/- प्रतिमाह बाजारशुल्क / भाडे आकारण्याबाबत निर्णय होउुन मागील सर्व बिले निर्लेखित करण्यास देखिल मान्यता देण्यात आली. सदर मार्केट इमारतीची साफसफाई संबधित विक्रेत्यांनी करून लाईट बिल, पाणीबिल सदर विक्रेत्यांनीच भरावयाची होती.

सदर ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात येउुन संबधित विक्रेत्यांना बिले देण्यात आली. तथापी रू. २०/- प्रतिमाह भाडे देखिल भरण्यात आलेले नसून पाणीबिल व वीज बिल देखिल विक्रेत्यांमार्फत न भरल्याने वीज पूरवठा खंडित करण्यात आला आहे. सर्व मार्केटची दुरावस्था झाल्याने सर्व मार्केट इमारती बाबातचा मा. महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र. ७० रद्द करून सर्व मार्केट लिलावाद्वारे खाजगी ठेकेदाराकडे भाडे वसूलीसाठी दिल्यास विक्रेत्याकडून भाडे वसुल होऊन महानगरपालिकेस वीज बिल, पाणी बिल भरता येऊन आवश्यक दुरूस्त्या करून इमारती सुस्थितीत ठेवता येतील.

सद्यस्थितीत मार्केट इमारतीमध्ये बसणाऱ्या विक्रेत्यांना त्यांच्याकडील थकबाकी भरुन घेऊन प्राध्यान्याने सदर इमारती मध्ये गाळे देण्याबाबत नविन लिलावाच्या निविदा मध्ये अट टाकावी.

तरी सदर मार्केट इमारती योग्य अटीशर्ती ठरवून लिलावाव्दारे खाजगी ठेकेदारास भाडे वसुलीसाठी देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :-** (सही) **अनुमोदक :-** (सही)

ध्रुवकिशोर पाटील जुबेर इनामदार

(सही)
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

५२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १४/१२/२०१२

## (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा)

प्रकरण क्र. २२ :- मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीचे T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR साठी कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल प्रस्ताव मा. नगर विकास विभागास पाठविणेस मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. २५ :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदर विकास नियंत्रण नियमावली T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR बाबत खालील प्रमाणे मंजूर तरतूद केलेली आहे.

(१)

| ORIGINATING ZONE | RECEIVING ZONE |
|---|---|
| I | I |
| II | IV, V-A, VI-A |
| III | IV, VI-A |
| IV | IV, VI |
| V | IV, VI-A |
| V-A | V-A, VI-A |
| VI | VI-A, VI |
| VI-A | VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-B |
| VIII | VIII |

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सूचित केलेल्या खालीलप्रमाणेच्या तक्त्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये ORIGINATING ZONE व RECEIVING ZONE मध्ये फेरबदल करणेकरिता प्रकरण क्र. ५४, ठराव क्र. ५५, दि.११/०२/२०१० रोजीच्या महासभेने मान्यता दिलेली आहे.

| T.D.R. GENERATING SECTOR | T.D.R. RECEIVING SECTOR |
|---|---|
| I | I |
| II-A | IV, II-B |
| II-B | II-B, IV |
| III-A | III-A, IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| III-B | IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| IV | IV, V, V-A, VI, VI-A |
| V | IV, V, V-A, VI, VI-A |
| V-A | IV, V, V-A, VI, VI-A |
| VI | V, VI, VI-A |
| VI-A | V, VI, VI-A |

| | |
|---|---|
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-A, VII-B |
| VIII | VIII |

उपरोक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक वैधानिक कार्यवाही पूर्ण केल्यानंतर सदर प्रस्तावास मा. महासभेने प्रकरण क्र. ४१, ठराव क्र. ४७, दि.२०/०८/२०१० रोजी फेरबदलास अंतिम मंजूरी दिलेली आहे.

तद्नंतर सदरचा प्रस्ताव अंतिम मंजूरीकरिता मा. शासनास पत्र क्र. मनपा/नर/३१५८/२०१०-११, दि.२९/११/२०१० अन्वये सादर केलेला आहे. सदर प्रकरणात सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडील दि.१६/०३/२०११ रोजीच्या पत्रातील त्रुटींची पूर्तता करुन त्याबाबत महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/१५५/२०११-१२, दि.२१/०४/२०११ अन्वये कळविलेले आहे. तद्नंतर मा. शासनास महानगरपालिकेने पूनश्च पत्र क्र. मनपा/नर/१८५८/२०११-१२, दि.१६/०९/२०११ अन्वये विनंती पत्र दिलेले आहे.

सदर प्रकरणात श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या विनंतीपत्रानुसार महानगरपालिकेने यापूर्वी मंजूर विकास योजनेत सेक्टर निहाय फेरबदलाबाबत मा. शासनास सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सेक्टर II चे II-A व II-B असे दोन भाग केलेले असून II-A हा पूर्णतः Congested असून ब-याच प्रमाणात आरक्षण आहेत. तसेच II-B या सेक्टरमध्ये बरीच मोकळी जागा असल्यामुळे व त्या ठिकाणी II-A व II-B चा वापर होवू शकतो. त्यामुळे विकासाचा समतोल साधला जाईल, अशी महानगरपालिकेने कारणमिमांसा नमुद केलेली आहे. या सेक्टर II-A व II-B च्या मधील विभाजन हद्दीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. सेक्टर II-B चे उत्तर हद्दीलगत १८.०० मी. रुंद रस्त्याच्या उत्तरेकडील आणि ३०.०० मी. रुंद रस्ता यामधील मोकळी जागा सेक्टर II-A मध्ये सामाविष्ट केली आहे. सदर जमीन बहुतांशी मोकळी असल्यामुळे ती जागा II-A मधून वगळून सेक्टर II-B या रिसीव्हींग झोनमध्ये समाविष्ट केल्यास तेथे विकासाचा समतोल साधता येईल", याप्रमाणे विनंती केलेली आहे.

श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या दि.१२/०९/२०११ रोजीच्या विनंतीपत्रानुसार शासन नगरविकास विभाग यांचेकडे प्रस्तावित फेरबदलाबाबत दि.१४/०९/२०११ रोजी पत्रव्यवहार केला असता, तद्अनुषंगाने शासनाने दि.२२/०९/२०११ रोजी महानगरपालिका आयुक्त, संबंधीत अधिकारी व इतर अर्जदार यांचे समवेत बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीचे इतिवृत महानगरपालिकेस प्राप्त असुन इतिवृत्तात नमुद करणेत आले आहे कि,

**"अर्जदारांनी / विकासकानी सादर केलेला प्रस्ताव हा महानगरपालिकेचे मंजूर ठराव आणि याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतूदीनुसार प्रसिध्द सूचना यामध्ये समाविष्ट नसल्याने पुन्हा नव्याने प्रसिध्दीकरण करावे लागेल. सदर प्रस्तावाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव सादर केल्यास त्याबाबत नगररचना संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त करुन घेवून गुणवत्तेनुरुप पुढील कार्यवाही शासनामार्फत करण्यात येईल".**

याबाबत आवश्यक ती कार्यवाही सत्वर पूर्ण करण्यात यावी, अशा सुचना प्राप्त आहेत.

तद्अनुषंगाने वरीलप्रमाणे फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक असलेल्या फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस, फेरबदलाच्या सुचना / हरकती घेणे, सुनावणी घेणे व अंतिम मंजूरीसह प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | मेंडोन्सा स्टिवन जॉन | ८ | शर्मा सुनिला सत्येंद्र | निरंक |
| ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ९ | मेहता डिंपल विनोद | |
| १० | डॉ. आसिफ गुलाब शेख | १० | केळुसकर प्रशांत नारायण | |
| ११ | गोविंद हेलन जॉर्जी | ११ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १२ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | लियाकत ग. शेख | १३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १४ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १४ | शरद केशव पाटील | |
| १५ | खण्डेलवाल सुरेश | १५ | मेघना दिपक रावल | |
| १६ | नरेश तुकाराम पाटील | १६ | जैन गिता भरत | |
| १७ | शबनम लियाकत शेख | १७ | जैन रमेश धरमचंद | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १९ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १९ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | भावसार शिल्पा कमलेश | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | वंदना रामदास चक्रे | २२ | जैन सिमा महेंद्र | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २४ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | २४ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २५ | जैन दिनेश तेजराज | |
| २६ | पिसाळ मनिषा नामदेव | २६ | अरोरा दिपिका पंकज | |
| २७ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २७ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २८ | पाटील सुनिता कैलास | २८ | अनिल बाबुराव भोसले | |
| २९ | वेतोसकर राजेश शंकर | २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| ३० | प्रभात प्रकाश पाटील | ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३१ | बगाजी शर्मिला विल्सन | ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३२ | झिनत रऊफ कुरेशी | ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३३ | सिंद्धीक मोहम्मद फरिद कुरेशी | ३३ | तारा विनायक घरत | |
| ३४ | पुजारी कांचना शेखर | ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३५ | काझी रशीदा जमील | ३५ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३६ | इनामदार जुबेर | ३६ | जयमाला किशोर पाटील | |
| ३७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३७ | संदिप मोहन पाटील | |
| ३८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३८ | परमार अनिता भरत | |
| ३९ | डिसा मर्लिन मर्विन | ३९ | पाटील प्रणाली संदिप | |
| ४० | भट दिप्ती शेखर | ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४१ | विराणी रेखा अनिल | ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४२ | सामंत प्रमोद जयराम | ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

६

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १४/१२/२०१२**

(दि. ७/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. :** २३

**ठराव :** २९

**विषय :** इमारतीचे बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डासप्रतिबंधक उपाययोजना उपविधी मंजूर करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत केल्या जाणाऱ्या डास प्रतिबंधक उपाययोजना संदर्भात तयार करण्यात आलेल्या उपविधीवर चर्चा, विचारविनिमय, सुचना, हरकती व दुरुस्ती करणे कामी प्रसिध्द करणेसाठी ही महासभा मंजुरी देत आहे.

सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजूर

मा. महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १४/१२/२०१२
## (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. २४ :-** **बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (Multi Purpose Workers - MPW) संवर्गाची पदे निर्माण करणेबाबत.**

**ठराव क्र. २७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रुग्णांना प्राथमिक वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी सद्या ११ नागरी आरोग्य केंद्र व १ रुग्णालय कार्यरत आहे. या आरोग्य केंद्रांमध्ये देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवा सुविधांपैकी हिवताप रुग्णांचे निदान व उपचार ही एक महत्वाची सेवा आहे. हिवतापाबरोबर डेंग्यु, चिकनगुन्या हेही डासांमुळे उद्‌भणारे गंभीर आजार आहेत. वेगाने होणारे नागरीकरण व त्यामुळे मोठया प्रमाणात होत असलेली बांधकामे, सांडपाण्याचे नाले बांधण्याची कामे तसेच जीवनशैलीतील बदल, पाण्याचे अयोग्य नियोजन, चुकीच्या पद्धतीने पाणी साठवण्याच्या पद्धती इ. मुळे शहरामध्ये डासोत्पत्ती स्थाने प्रचंड प्रमाणावर वाढत आहेत. त्यामुळे हिवताप, डेंग्यु, चिकनगुन्या इ. आजार शहरामध्ये मोठया प्रमाणावर आढळून येत आहेत. सदर आजारांवर नियंत्रण राखण्यासाठी सर्व ताप रूग्णांचे रक्त नमुने घेऊन त्यांना उपचार देणे आवश्यक असते. सद्यस्थितीत रक्तनमुने तपासणीसाठी सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत प्रयोगशाळा तंत्रज्ञांची मदत घेण्यात येते. तपासणीमध्ये दूषित रक्तनमुने आढळलेल्या रुग्णांना आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत 'समूळ उपचार' (Radical Treatment) देण्यात येतात.

त्याचप्रमाणे कार्यक्षेत्रात देखील प्रसविकांमार्फत त्यांच्या गृह भेटीच्या वेळी ताप रुग्णांचे रक्तनमुने घेऊन त्यांना उपचार देण्यात येतात. परंतु, प्रसविकांना त्यांच्याकडे असलेल्या माता व बाल आरोग्य विषयक कामांमुळे संपूर्ण कार्यक्षेत्रातून अतिशय अल्प प्रमाणात रक्तनमुने गोळा करणे शक्य होते. परंतु, राष्ट्रीय किटकजन्यरोग नियंत्रण कार्यक्रम, नागरी हिवताप योजनेनुसार हिवताप प्रतिबंधक योजनांमध्ये डास व डासअळी नियंत्रण या व्यतिरिक्त प्रत्यक्ष लोकसंख्या सर्व्हेक्षण अत्यंत महत्वाचे आहे. याअंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन रुग्णांची विचारपूस करुन आवश्यकतेप्रमाणे ताप रुग्णांचे रक्तनमूने हिवताप निदानासाठी घेतात. तसेच सदर रक्तनमूने तात्काळ प्रयोगशाळेत पाठवून तपासणीचा अहवाल प्राप्त करून दूषित रक्तनमूने आलेल्या रुग्णांना समूळ उपचार देतात. यामुळे हिवताप रुग्णांना तात्काळ उपचार मिळतो. तसेच हिवताप प्रसार थांबविण्यासाठी सदर पध्दतीने केलेली कामे अत्यंत उपयोगी पडतात.

तरी उपरोक्त कामे करण्यासाठी 'बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी' (Multi Purpose Worker) आवश्यक आहेत. शासनपत्र अ.शा. पत्र क्र. तांत्रिक/कक्ष१०/साथरोग/१३०३३-३५/२०११ दि. ३०/०३/२०११, ११/०४/२०११ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेस २०,००० लोकसंख्येस १ या प्रमाणात प्रत्यक्ष सर्व्हेक्षणासाठी किमान ५० आरोग्य कर्मचारी आवश्यक असल्याबाबत कळविले आहे. जनगणना २०११ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या ८.१४ लक्ष आहे. त्यानुसार ४१ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी आवश्यक आहेत. सदर कर्मचारी खालील कामे करतील :

- प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करून संशयित ताप रुग्णांचे रक्तनमूने घेणे.
- रक्तनमूने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविणे.
- अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे समुळ उपचार देणे.
- जलद ताप सर्व्हेक्षण करणे
- कंटेनर सर्व्हेक्षण (डासअळी साठी पाणीसाठे तपासणे)
- कोरडा दिवस पाळणे
- औषध फवारणीचे पर्यवेक्षण करणे
- आरोग्य शिक्षण देणे
- अहवाल तयार करणे
- वेळोवळी सोपविण्यात येणारी कामे करणे

शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी १० टक्के लोकसंख्येचे रक्तनमूने घेणे आवश्यक आहे. याबाबत कर्मचारी नसल्यामूळे हिवतापासाठी अल्प प्रमाणात रक्तनमूने गोळा करण्यात येतात. परंतू हिवताप नियंत्रणासाठी जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत पोहचून त्यांचे रक्तनमूने प्राप्त झाल्यास हिवताप नियंत्रण शक्य

होणार आहे व यासाठी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. शासनाकडे स्थायी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी या पदासाठी सहाव्या वेतन आयोगानुसार रु. ५,२०० - २०,२०० - २,४००/- वेतनश्रेणी लागू आहे. या वेतनश्रेणी नुसार
स्थायी पदांसाठी रु. ७५,३७,४४०/- वेतन खर्च अपेक्षित आहे :

| पद नाम | पद संख्या | वेतन श्रेणी | एकत्रित मासिक वेतन | एकत्रित वार्षिक वेतन खर्च |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | ४१ | ५,२००-२०,२०० ग्रेड पे २,४०० | ६,२८,१२०/- | ७५,३७,४४०/- |

उपरोक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक सुरूवातीस तात्पूरत्या करारतत्वावर व रू. ७०००/- ठोक मासिक मानधनावर केल्यास रु. ३४.४४ लक्ष अपेक्षित आहे.

| पद नाम | पद संख्या | ठोक मासिक मानधन | एकत्रित मासिक मानधन | एकत्रित वार्षिक मानधन |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | ४१ | रु. ७,०००/- | २.८७ लक्ष | रू. ३४.४४ लक्ष |

सदर वेतन खर्च सार्वजनिक आरोग्य विभागात उपलब्ध असलेल्या "आर.सी.एच. फेस-२ वेतन/इतर" या लेखाशिर्षामधून करण्यास मंजूर देण्यात येत आहे.

अशा प्रकारे हिवताप नियंत्रणासाठी ४१ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांच्या पदांचा प्रस्ताव शासनाकडे पदनिर्मितीसाठी पाठविणे व सदर प्रस्ताव शासनाकडून मंजूर होईपर्यंत सदर पदे करारतत्वावर व ठोक मानधनावर भरणेस व त्यासाठी येणाऱ्या वेतन खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्री. शरद पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

सदर बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (Multi Purpose Workers - MPW) संवर्गाची पदे निर्माण करण्यासाठी शासनाकडून मान्यता झाल्यानंतर नेमणूकीची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी मानधनावर असलेल्यांना योग्यतेनुसार परस्पर यांची नियुक्ती करण्यात येऊ नये. नविन भरत्यांची प्रक्रिया पूर्ण करावी अशी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

९८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १४/१२/२०१२

## (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. २५ :-** **भाईंदर (पूर्व) आरक्षण क्रमांक २४६ (मैदान) विकसित करून मुलांना खेळण्यासाठी खुले करणेकरीता खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र. २८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) येथे आरक्षण क्र. २४६, खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र २०.००० चौ. मीटर एवढे असून टी.डी.आर तरतुदीच्या माध्यामातून सदर आरक्षणाची १४४८६.९८ चौ. मीटर एवढी जागा (७२.४३%) महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. सदर आरक्षणाचा विकास करून सदर भागातील रहिवाशी व मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. सदर आरक्षणास कुंपणभिंत बांधून मुरूम व लाल मातीचा भराव करावा लागणार आहे. त्याकरीता रू. ७२,९६,९५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात बगीचे/वाहनतळ/मैदाने/क्रिडा संकुल/इनडोअर गेम विकसित या लेखाशिर्षाखाली १.०० कोटी एवढी तरतुद उपलब्ध आहे. सदर कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच आरक्षण क्र. ३६५ मौजे काशी सर्व्हे क्र. ८७ हिस्सा नं.२ व ५ ही जागा मिरा भाईंदर विकास आरखड्यात खेळाच्या मैदानाकरीता व शाळेकरीता आरक्षीत आहे. सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असून ७/१२ उतारा सुध्दा महानगरपालिकेच्या नावाने झालेला आहे. तसेच सदर जागेत नगररचना विभागाने कम्युनिटी सेंटरचा प्लान मंजूर केलेला असून सदर ठिकाणी कम्युनिटी सेंटर बांधण्याकरीता तसेच जॉगींग ट्रॅक, खेळाचे मैदान व इतर सोयी उपलब्ध करुन देणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ८ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ९ | डॉ. आसिफ गुलाब शेख | ९ | मेहता डिंपल विनोद | निरंक |
| १० | गोविंद हेलन जॉर्जी | १० | केळुसकर प्रशांत नारायण | |
| ११ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | ११ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १२ | लियाकत ग. शेख | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १४ | खण्डेलवाल सुरेश | १४ | शरद केशव पाटील | |
| १५ | नरेश तुकाराम पाटील | १५ | मेघना दिपक रावल | |
| १६ | शबनम लियाकत शेख | १६ | जैन गिता भरत | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | अनिता जयवंत पाटील | १७ | जैन रमेश धरमचंद | |
| १८ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १८ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १९ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | १९ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| २० | भावसार शिल्पा कमलेश | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | वंदना रामदास चक्रे | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | भोईर कमलेश यशवंत | २२ | जैन सिमा महेंद्र | |
| २३ | सुमबंड महरूत्रीसा हारूनरशीद | २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २४ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २४ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २५ | पिसाळ मनिषा नामदेव | २५ | जैन दिनेश तेजराज | |
| २६ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २६ | अरोरा दिपिका पंकज | |
| २७ | पाटील सुनिता कैलास | २७ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २८ | वेतोसकर राजेश शंकर | २८ | अनिल बाबुराव भोसले | |
| २९ | प्रभात प्रकाश पाटील | २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| ३० | बगाजी शर्मिला विल्सन | ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३१ | झिनत रऊफ कुरेशी | ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३२ | सिंद्धीक मोहम्मद फरिद कुरेशी | ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३३ | पुजारी कांचना शेखर | ३३ | तारा विनायक धरत | |
| ३४ | काझी रशीदा जमील | ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३५ | इनामदार जुबेर | ३५ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३६ | जयमाला किशोर पाटील | |
| ३७ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३७ | संदिप मोहन पाटील | |
| ३८ | डिसा मर्लिन मर्विन | ३८ | परमार अनिता भरत | |
| ३९ | भट दिप्ती शेखर | ३९ | पाटील प्रणाली संदिप | |
| ४० | विराणी रेखा अनिल | ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४१ | सामंत प्रमोद जयराम | ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४२ | जाधव मोहन महादेव | ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४३ | भोईर भावना राजू | | | |
| ४४ | भोईर राजू यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.१४/१२/२०१२
(दि. ७/१२/२०१२ रोजीची तहकूब सभा)

**प्रकरण क्र. २६ :- बगीचा/उद्यान आरक्षण क्र. ११७, आरक्षण क्र. २२१ व आरक्षण क्र.१०० येथे Theme Park (Public Park) विकसित करणेबाबत..**

**ठराव क्र. २९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ११७ गोडदेव व आरक्षण क्र. २२१ हे बगीच्यासाठी आरक्षित असून सदर उद्यानाचे क्षेत्रफळ अंदाजित अनुक्रमे १८००० चौ.मी. व १९६७६ चौ.मी. आहे व ते विकसित करण्यासाठी अनुक्रमे मे. समा लॅन्डस्केप आर्किटेक्ट व मे. सराह कन्सल्टन्सी या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

आरक्षण क्र ११७ गोडदेव बगीचा/उद्यानासाठी आरक्षित असून बाजुला असलेल्या तलावाचेही सुशोभिकरण व रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे प्रस्तावित आहे.

<u>आरक्षण क्र. ११७ (१८००० चौ.मी.)</u> थीम पार्क प्राचीन वास्तुशास्त्रातील पंचतत्त्वावर (पृथ्वी, पाणी, वायू, सुर्य आणि आकाश) आधारीत प्रत्येक तत्त्वाच्या घटकांचा त्यांचे स्थान, रंग लक्षात घेऊन त्यांचा पार्कच्या डिझाईनमध्ये समावेश करण्यात आला आहे. सर्वांसाठी आवश्यक गोष्टींची उदा. नागरिकांसाठी माहिती केंद्र, शैक्षणिक फिल्मस् दाखविण्यासाठी व छोट्या कार्यक्रमासाठी एक ॲम्पी थिएटर, खाण्याची छोटी दुकाने, स्वच्छता गृहे, गांडुळ खत प्रकल्प आणि सौरदिवे असणार आहेत. सदर थिम पार्क विकसित करणेकरिता अंदाजीत खर्च रुपये दोन कोटी येणार आहे.

<u>आरक्षण क्र. २२१</u>(१९६७६ चौ.मी.) या जागेस दक्षिण आणि पूर्व या दोन्ही बाजुने रस्ता आहे. त्यात बायो डायव्हर्सिटी पार्क, क्लब हाऊस, ॲम्पीथिएटर, नेट क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, स्केटींग व खेळण्याची साधने, जॉगिंग ट्रॅक आणि सायकलिंग ट्रॅक व लॉन, स्टॉल व कॅफे असेल. त्यासाठी अंदाजित खर्च रुपये दोन कोटी चाळीस लाख येणार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे उद्यानासाठी आरक्षित आरक्षण क्र.११७ व २२१ विकसित करणेस व त्याचबरोबर उद्यानासाठी आरक्षित आरक्षण क्र.१०० (अंदाजित खर्च रु.१.५० कोटी ) या भूखंडावर **Theme Park** विकसित करण्यास उक्त नमुद आरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागारामार्फतच विकसित करण्यास व तसेच भविष्यात वेळोवेळी महानगरपालिकेच्या ताब्यात येणाऱ्या उद्यानासाठी आरक्षित असलेले भूखंड ~~मा. आयुक्त यांचे मान्यतेने~~ विकसित करण्यास अथवा **Theme Park** बनविणेसाठी येणाऱ्या खर्चास मा. महासभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजूर

मा. महापौर

51

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## दि. ०१/१२/२०१२ मा. महासभा सुचना क्र. ०३ यानुसार
## तहकूब मा. महासभा शुक्रवार दि. १४/१२/२०१२

ठराव क्र. ३०

## ।। शोक प्रस्ताव ।।

गेल्या अनेक वर्षापासुन भारतीय शास्त्रीय संगीताला आंतरराष्ट्रीय पातळीवर नवे आयाम मिळवून देणारे जगद्विख्यात सतारवादक भारतरत्न पंडित रविशंकर यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी दि. १२/१२/२०१२ रोजी अमेरिकेत निधन झाले आणि रियाजाची वाट बघत असलेली सतारही कायमची अबोल झाली, त्यांना मनःपुर्वक श्रध्दांजली !

पंडीत रविशंकर यांच्या परिवाराच्या दुःखात आम्ही सर्व सन्मा. पदाधिकारी सहभागी आहोत, असा शोक प्रस्ताव मांडत आहोत.

सूचक : श्री. जूबेर इनामदार

अनुमोदक : श्री. ध्रुवकिशोर पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

महापौर

सौ. कॅटलीन परेरा

मिरा-भाईंदर महानगरपालिका

52

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१३.

**प्रकरण क्र. २७ :-** दि.२८/०८/२०१२ व दि.२५/१०/२०१२, दि.२९/११/२०१२, दि.३०/११/२०१२ (दि. २५/१०/२०१२ व दि. २९/११/२०१२ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३९ :-**

दि.२८/०८/२०१२ व दि.२५/१०/२०१२, दि.२९/११/२०१२, दि.३०/११/२०१२ (दि. २५/१०/२०१२ व दि. २९/११/२०१२ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** श्री ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदन :-** श्री. बर्नाड डिमेलो

**ठराव सर्वानुमते मंजुर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१५/०१/२०१३

प्रकरण क्रमांक :- ( २८ ) सर्बबन रेल्वे युजर्स कंन्सल्टेटीव्ह कमिटी" (Suburban Railway Vser's Consultative Committee) वर मिरा भाईदर महानगरपालिकेमार्फत प्रतनिधी पाठविणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण.

ठराव क्रमाक :- ( ३२ )

रेल्वे प्रशासन व रेल्वे प्रवाशी यांच्या मध्ये समन्वय राहण्याच्या दृष्टीने पश्चिम रेल्वे ची (**Suburban Railway Vser's Consultative Committee**) आहे. सदर समितीवर मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन एक प्रतिनिधी असतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन पाठवयाचा प्रनिनिधी मा.महासभेमार्फत निश्चित करण्यात येतो. यापूर्वी असलेल्या समितीची मुदत दि.३१/१२/२०११ रोजी संपलेली असुन सचिव, सर्बबन रेल्वे युजर्स कंन्सल्टेटीव्ह कमिटी व उप, सी.ओ.एम (कोचींग) यांनी दि.१२/०७/२०१२ रोजी पत्र पाठवून दोन वर्ष मुदतीकरीता (दि.३१/१२/२०१३ पर्यत) गठीत करावयाच्या समिती करीता प्रतिनिधीचे नाव कळविण्याबाबत पत्राने कळविलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत रेल्वे प्रशासनाकडे पाठवावयाचा प्रतिनिधी नेमण्याचे अधिकार मा. महापौर यांना देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानूमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

पिठासन अधिकारी

५५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्र. २९ :-** **भाईंदर (प.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर प्रभाग समिती क्र. ०१ (जुने नगरपरिषद कार्यालय) भाडेकरू करीता बांधलेल्या इमारतीमधील गाळ्यांचा वापराबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ३३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) येथे छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर प्रभाग समिती क्र. ०१ (जुने नगरपरिषद कार्यालय) समोर ग्रामपंचायत काळापासून १८.०० मीटर रूंदीच्या रस्त्यामध्ये दुकानदार भाडेकरू होते. सदर रस्ता रूंदीकरणांतर्गत सदर दुकानदारांना पर्यायी जागा देण्याच्या अटीवर रस्त्यामधील दुकाने/टपऱ्या काढण्यात आल्या. तद्नंतर सदर रस्त्यालगत भाडेकरू करीता १६ गाळ्यांची इमारत बांधण्यात आली. सदर इमारतीमधील गाळ्यांचे वाटप करण्याकरिता भाडे तसेच अनामत रक्कम, अटीशर्ती मा. महासभा दि. २०/११/२००२, प्रकरण क्र. ३२, ठराव क्र. ३८ अन्वये निश्चित करून संबंधित गाळेधारकांना कळविण्यात आले होते. तथापी तद्नंतर सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ प्रकरणांचा निकाल लागलेला असून संबंधित गाळेधारकांना मा. महासभेने ठरविलेले भाडे, अनामत रक्कम व थकित भाडे भरण्याबाबत व भाडे न भरल्याने गाळ्यांचा ताबा परत घेण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ (क) व ८१ (ब) (२) अन्वये कार्यवाही करण्यात आलेली असून थकीत भाडे वसुली व गाळे रिकामी करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर इमारती मधील गाळे रिकामी झाल्यावर सदर गाळे वाटपाबाबत पुढील निर्णय घेणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) अन्वये सदर जागा भाड्याने देण्याची तरतुद आहे. तरी सदर गाळे चालू बाजार भावानुसार लिलाव पद्धतीने भाड्याने देणे किंवा कसे याबाबत विचार विनिमय करून निर्णय होण्यास मा. आयुक्त यांनी महासभेपुढे शिफारस केलेली आहे. प्रशासनाचा सदर गोषवारा पाहता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१) प्रशासनाने यापूर्वीची थकबाकी संबंधित गाळेधारकाकडून एका वर्षात चॉर समान हप्त्यात वसुली करावी. अनामत रक्कम घेण्यात येउ नये.

२) सदर गाळ्यांचे रू. २१/- प्रति चौ. फुट प्रमाणे भाडे होत असल्याने १ एप्रिल २०१३ पासून सदर भाडे भरुन गाळे भाड्याने घेण्यास तयार असल्यास व तसा करारनामा केल्यास त्यांना ३० वर्ष मुदतीसाठी गाळे भाड्याने देण्यात यावेत. दर पाच वर्षांनी १० टक्के भाडे वाढविण्यात यावे व तसा गाळेधारकांसोबत पत्रव्यवहार करण्यात यावा.

३) सदर गाळेधारक भाडे भरण्यास तयार नसल्यास सदर गाळे पोलिस बंदोबस्तात रिकामी करून महानगरपालिकेने जाहिर लिलावाद्वारे गाळे भाड्याने देण्याची कार्यवाही करावी.

४) मा. महासभा दि.२०/११/२०१२ प्रकरण क्र. ३२, ठराव क्र. ३८ मध्ये नमूद गाळेधारक/टपरी धारकांनाच गाळे भाड्याने देण्यात यावे. मा. महासभा दि.२०/११/२००२ प्रकरण क्र. ३२, ठराव क्र. ३८ रद्द करण्यात येत आहे.

५) सदर गाळेधारकांना महानगरपालिकेकडून आवश्यक ती सुविधा देण्यात येईल.

६) सदर गाळेधाराकांना गाळ्याची विक्री करता येणार नाही तसेच भाड्याने देता येणार नाही.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर ईनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. सुहास रकवी ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर (प.) येथील भाडेकरु करीता बांधलेल्या इमारतीमधील एक गाळा हिंदु वैकुंठभूमी या संस्थेस रु. १/- नाममात्र भाड्याने दिले आहे. सदर गाळा देखील करारनामा करुन ३० वर्षे कालावधीसाठी भाड्याने देण्यात यावा.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्र. ३० :- श्री. संजय दोंदे, प्रभाग अधिकारी (सध्या निलंबीत) यांना सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत.**

**ठराव क्र. ३४ :-**

प्रभाग अधिकारी श्री. संजय दोंदे यांना दि. १२/०८/२०१० रोजी लाचेच्या सापळ्यामध्ये रंगेहात पकडल्यामुळे व श्री. संजय दोंदे, ४८ तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी अटकेत असल्याचे पोलीस कार्यालयाकडील प्राप्त पत्राअन्वये कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था/५७२/३१/२०१०-११, दि. २३/०८/२०१० अन्वये त्यांना निलंबीत करण्यात आलेले आहे.

श्री. संजय दोंदे, यांचे निलंबन कार्यवाहीस महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७७, दि. ०१/०२/२०११ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका आधिनियम-१९४९ चे कलम ५३ (३) नुसार नियुक्ती प्राधिकरण या नात्याने निलंबनास मंजुरी देऊन निलंबन कायम केलेले आहे.

श्री. संजय दोंदे, यांना निलंबीत करुन दिर्घ कालावधी (२८ महिने) झालेला आहे. या दरम्यान त्यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेजवळ निलंबन रद्द करुन कामावर घेणेबाबत विनंती अर्ज केले आहेत. तसेच शासनाच्या नगर विकास विभाग, मुंबई, व महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोगाजवळ निलंबन रद्द करुन कामावर घेणेबाबत अर्ज केला होता. त्युनसार शासनाने दि. ०६/१०/२०१२ अन्वये श्री. संजय दोंदे, यांना पूर्नस्थापीत करणे बाबत मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी तात्काळ कार्यवाही करणेस निर्देश दिले. तसेच मा. आयुक्त, पिटासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती/जमाती आयोग, यांनी त्यांचेकडील दि. ०८/११/२०१२ रोजीच्या सुनावणीत श्री. संजय दोंदे, यांच्या प्रलंबीत खटल्यातील निर्णयाचे अधिन राहुन पूर्नस्थापीत करावे.

श्री. संजय दोंदे, यांना सेवेत पूर्नस्थापीत करणे बाबत शासनाचे दि. ०६/१०/२०१२ रोजीचे पत्र व मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग, यांचेकडील दि. ०८/११/२०१२ रोजीच्या सुनावणीचे अनुषंगाने श्री. संजय दोंदे, यांची वेतनश्रेणी रु. ९३००-३४८००, ग्रेड वेतन रु. ४४०० अशी असुन सहाय्यक आयुक्त या पदाचे समकक्ष वेतनश्रेणीत त्यांचे वेतन असल्याने त्यांचे निलंबन संपुष्टात आणुन पूर्नस्थापीत करणे बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५३ अंतर्गत तरतुदीनुसार श्री. संजय दोंदे, यांना मा. न्यायालयातील प्रलंबीत खटल्याच्या निर्णयास अधिन राहुन पूर्नस्थापीत करणेस मान्यता देण्यात येत आहे. मा. आयुक्तांनी अकार्यकारी पदावर विहित जबाबदारी सोपवून हजर करुन घ्यावे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. अशरफ शेख**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

महानगरपालिका आस्थापनेवर श्री. प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग यांचेवर दि. ०९/१२/२०११ रोजी ए.सी.बी. ठाणे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार कार्यवाही केलेली आहे. त्या अनुषंगाने श्री. प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग यांना जा.क्र. मनपा/आस्था/१२७१/२०११-१२, दि. २०/१२/२०११ अन्वये निलंबीत करण्यात आलेले आहे. याकामी नवघर पोलीस स्टेशन, गुन्हा रजिस्टर नंबर, I I ११४/२०११ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१) (ड) सह १३ (२) या गुन्ह्याचे आजपावेत एकंदरीत झाले तपासात यातील आरोपी लोकसेवक श्री. प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग, यांचेवर गुन्हा दाखल झालेला आहे. न्यायालयीन खटल्याच्या अधीन राहून महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन) नियम -१९८१ चे कलम (६८) (१) (ए) (एक) नुसार निलंबनानंतर कर्मचाऱ्यास ७५% उदरनिर्वाह भत्ता देत आहे. अशाप्रकारे ७५% उदरनिर्वाह भत्ता कर्मचारी कामावर न येता देण्यात येत असल्याने महानगरपालिकेस कर्मचाऱ्यांच्या कामाची आवश्यकता व निकड लक्षात घेऊन सहा. आयुक्त दर्जापेक्षा कमी दर्जाच्या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे बाबतीत निर्णय घेणेस मा. आयुक्त सो.,

हे सक्षम प्राधिकारी असल्याने १) श्री. प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता, २) श्री. दशरथ हंडोरे, वरिष्ठ लिपीक, व ३) श्री. गणेश गोडगे, लिपीक यांना मा. न्यायालयीन खटल्याच्या अधीन राहून अकार्यकारी पदावर रुजू करुन घेण्यास मा. आयुक्तांनी आपल्या स्तरावर कार्यावाही करावी अशी मी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मुन्ना सिंग ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सी.एफ.सी. मे श्रीम. सिमा मिश्रा करके थी, उनको ॲडजस्ट किया गया था। तो उनको भी लिया जाए, यह मेरी सुचना है। जो भी नियम मे बैठते है उनको लिया जाए।

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

57

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ३१ )** :- तात्पुरत्या " कनिष्ठ अभियंता" या संवर्गाची १० पदे ठोक मानधनावर भरणेस मंजूरी देणे.

**ठराव क्र.** ( ३५ ) :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात असलेल्या अपूरा कर्मचारी वर्ग पाहता सद्यस्थितीत आयुक्त यांनी केलेल्या कार्यवाहीनूसार पाच कनिष्ठ अभियंता रु. २०,०००/- ठोक मानधनावर एक वर्ष मुदतीकरीता नियुक्ती करण्यात यावे. उर्वरीत पाच कनिष्ठ अभियंता भरण्याकरीता नव्याने जाहीरात देऊन ठोक मानधनावर भरती करावी.

तसेच मनपाच्या आस्थापनेवर तांत्रिक कर्मचाऱ्याची पदे अत्यंत अपूरी असल्याने सदर पदे कायम स्वरुपी निर्माण करण्याकरीता पुढील महासभेत प्रस्ताव सादर करावा.

सुचक :- ध्रुवकिशोर पाटिल        अनुमोदन :- जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

पिठासन अधिकारी

PC1/DK/2012-13/MT2

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्र. ३२ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २००८ मंजूरीबाबत.**

**ठराव क्र. ३६ :-**

शासन परिपत्रक क्र. ठामपा-२००२/८२१/प्र.क्र.८६/नवि-२३, दि. ०२/०७/२००८ अन्वये शासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५७(३) व अधिनियमातील अन्य तरतुदीमध्ये मिळालेल्या शक्तींचा वापर करुन शासनाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये सध्याचे म्हणजेच सेवा प्रवेश नियम-२००५ व तत्संबंधात यापूर्वी अस्तित्वात असलेले ठराव व आदेश यांचे अधिक्रमण करुन शासनाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी नव्याने मिरा-भाईंदर महानगरपालिका सेवा भरती नियम तयार करण्याबाबत महानगरपालिकेने कार्यवाही विहित वेळेत करणे बाबत सुचीत केले होते. त्या आदेशानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ तयार करुन त्यास मा. महासभा दि. १०/१०/२००८, ठराव क्र. ४२ अन्वये मंजूरी दिली. त्या मंजूरीनंतर प्रारुप सेवाशर्ती नियमांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५६ अंतर्गत तरतुदी अन्वये दि. ०७/०७/२००९ रोजी जाहिर वृत्तपत्रात हरकती / सुचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मुदतीत प्राप्त हरकती सुचनांवर तत्कालीन आयुक्तांनी सुनावणी देवून निर्णय दिले.

हकरती / सुचनांवर घेतलेल्या निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ तयार करुन मा. महासभेत ठेवण्यात आले. त्या सेवा भरती नियम-२००८ मधील परिशिष्ट १ ते ४ वर महासभेत विस्तृत विचार विनिमय होवून मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यांना नियम २०१३ असे यापुढे संबोधून मंजूरी देण्यात येत असून शासनास मंजूरीस पाठविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर ईनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. प्रभात पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

कोणत्याही तांत्रिक पदाकरीता पदोन्नती देताना अनुभवासोबत तांत्रिक शैक्षणिक पात्रता ह्याचा जरुर विचार व्हवा. तसेच सदरची शैक्षणिक पात्रता सदर अधिकारी वा कर्मचारी यांनी कधी ग्राह्य केली आहे याचा देखील विचार करण्यात यावा.

म्हणजेच तांत्रिक पदावर कार्यरत असताना म्हणजे रुजू होताना कोणत्याही अधिकारी वा कर्मचाऱ्याकडे त्या पदासाठी सध्याच्या सेवा भरती नियमामध्ये नमुद तांत्रिक शैक्षणिक पात्रता नसल्यास अशा अधिकारी वा कर्मचारी यांना प्राधान्य न देता, संबंधीत विभागात जर एखाद्या अधिकारी वा कर्मचाऱ्याकडे नमूद तांत्रिक शैक्षणिक पात्रता वा तत्सम तांत्रिक शैक्षणिक पात्रता सदर पदावर रुजू होतेवेळी ग्राह्य केलेली असल्यास अशा तांत्रिक अधिकारी वा कर्मचाऱ्यास पदोन्नती करीता प्राधान्य देण्यात यावे. जेणेकरुन सदर तांत्रिक पदावर कोणत्याही अतांत्रिक कर्मचाऱ्याची नेमणूक होणार नाही. (ज्याने केवळ पदोन्नती करीता तांत्रिक पात्रता ग्राह्य केलेली आहे.)

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/०१/२०13

**प्रकरण क्र. ३२ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २००८ मंजूरीबाबत.**

**ठराव क्र. 3६ :-**

शासन परिपत्रक क्र. ठामपा-२००२/८२१/प्र.क्र.८६/नवि-२३, दि. ०२/०७/२००८ अन्वये शासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५७(३) व अधिनियमातील अन्य तरतुदीमध्ये मिळालेल्या शक्तींचा वापर करुन शासनाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये सध्याचे म्हणजेच सेवा प्रवेश नियम-२००५ व तत्संबंधात यापूर्वी अस्तित्वात असलेले ठराव व आदेश यांचे अधिक्रमण करुन शासनाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी नव्याने मिरा-भाईंदर महानगरपालिका सेवा भरती नियम तयार करण्याबाबत महानगरपालिकेने कार्यवाही विहित वेळेत करणे बाबत सुचीत केले होते. त्या आदेशानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ तयार करुन त्यास मा. महासभा दि. १०/१०/२००८, ठराव क्र. ४२ अन्वये मंजूरी दिली. त्या मंजूरीनंतर प्रारुप सेवाशर्ती नियमांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५६ अंतर्गत तरतुदी अन्वये दि. ०७/०७/२००९ रोजी जाहिर वृत्तपत्रात हरकती / सुचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मुदतीत प्राप्त हरकती सुचनांवर तत्कालीन आयुक्तांनी सुनावणी देवून निर्णय दिले.

हकरती / सुचनांवर घेतलेल्या निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ तयार करुन मा. महासभेत ठेवण्यात आले. त्या सेवा भरती नियम-२००८ मधील परिशिष्ट १ ते ४ वर महासभेत विस्तृत विचार विनिमय होवून मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यांना नियम २०१३ असे यापुढे संबोधून मंजूरी देण्यात येत असून शासनास मंजूरीस पाठविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर ईनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. प्रभात पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

कोणत्याही तांत्रिक पदाकरीता पदोन्नती देताना अनुभवासोबत तांत्रिक शैक्षणिक पात्रता ह्याचा जरुर विचार व्हवा. तसेच सदरची शैक्षणिक पात्रता सदर अधिकारी वा कर्मचारी यांनी कधी ग्राह्य केली आहे याचा देखील विचार करण्यात यावा.

म्हणजेच तांत्रिक पदावर कार्यरत असताना म्हणजे रुजू होताना कोणत्याही अधिकारी वा कर्मचाऱ्याकडे त्या पदासाठी सध्याच्या सेवा भरती नियमामध्ये नमुद तांत्रिक शैक्षणिक पात्रता नसल्यास अशा अधिकारी वा कर्मचारी यांना प्राधान्य न देता, संबंधीत विभागात जर एखाद्या अधिकारी वा कर्मचाऱ्याकडे नमूद तांत्रिक शैक्षणिक पात्रता वा तत्सम तांत्रिक शैक्षणिक पात्रता सदर पदावर रुजू होतेवेळी ग्राह्य केलेली असल्यास अशा तांत्रिक अधिकारी वा कर्मचाऱ्यास पदोन्नती करीता प्राधान्य देण्यात यावे. जेणेकरुन सदर तांत्रिक पदावर कोणत्याही अतांत्रिक कर्मचाऱ्याची नेमणूक होणार नाही. (ज्याने केवळ पदोन्नती करीता तांत्रिक पात्रता ग्राह्य केलेली आहे.)

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

प्रकरण क्र. : 33

ठराव क्र.: ३८

**विषय : करारतत्वावरील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या ठोक मानधनात वाढ करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय तसेच नागरी आरोग्य केंद्र, उपकेंद्र चालविली जातात. तसेच परिसरातील नागरिकांना सवलतीच्या दरात डायलिसिस सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी डायलिसिस केंद्र चालविले जाते. रूग्णालय, आरोग्य केंद्र, उपकेंद्र तसेच डायलिसिस केंद्रासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे वेळोवेळी मा. महासभेच्या मान्यतेने निर्माण करण्यात आलेली आहेत व पदमंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आलेली आहेत. तसेच शासनाची मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करारतत्वावर ठोक मानधनावर भरावयास मा. महासभेने मंजुरी दिलेली आहे. सदर पदासाठी मंजूर असलेले मासिक ठोक मानधन अतिशय अपुरे असल्याने वारंवार भरतीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन, मनपाच्या संकेत स्थळावर प्रसिध्दी देऊनही वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. सदर पदे रिक्त राहिल्याने गुणात्मक व संख्यात्मक रित्या वैद्यकीय सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे ठोक मानधन वाढविण्याची आवश्यकता आहे. तसेच रूग्णालय, आरोग्य केंद्र व उपकेंद्र येथील समान पदांना निरनिराळे ठोक मानधन मंजूर असल्यामुळे त्यामध्ये एकसमानता आणणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे वैद्यकीय सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने व कमी मानधानावर वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी मिळत नसल्याने सदर पदावर कर्मचारी उपलब्ध होण्यासाठी सदर पदांचे वेतन सोबतच्या तक्त्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | स्थायी पदाची वेतन श्रेणी | स्थायी पदाचे सुरूवातीचे वेतन (अंदाजित) | मनपा तर्फे सद्यस्थितीत देण्यात येणारे/मंजूर ठोक मानधन | प्रस्तावित ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | १५६००-३९१००-५४०० | ४७८०० | २५,०००/- | ३८,०००/- |
| २ | अधिपरिचारीका/परिचारिका | ९३००-३४८००-४२०० | २६२७५ | १२,०००/- | २०,०००/- |
| ३ | प्रसविका | ५२००-२०२००-२४०० | १९२७५ | ७,५००/- | १२,०००/- |
| ४ | डायलिसिस तंत्रज्ञ | ९३००-३४८००-४२०० | २६२७५ | - | १५,०००/- |
| ५ | औषध निर्माण अधिकारी | ५२००-२०२००-२८०० | २२५५२ | ६,०००/- | १२,०००/- |
| ६ | शस्त्रक्रियागृह सहाय्यक | ४४४०-७४४०-१३०० | ११९५० | ६०००/- | ९,०००/- |

उपरोक्त प्रस्तावित ठोक मानधनास ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :

अनुमोदक :

उपरोक्त प्रस्तावामध्ये खालीलप्रमाणे सूचना स्वीकारण्यात यावी.

वैद्यकीय विभागा अंतर्गत कार्यरत खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांनाही ठोक मानधनात वाढ देण्यात यावी.

| पदाचे नाव | मनपातर्फे सद्य:स्थितीत देण्यात येणारे ठोक मानधन | प्रस्तावित ठोक मानधन |
|---|---|---|
| लेखापाल | ८०००/- | १४०००/- |
| डेटा एन्ट्री ऑपरेटर | ८०००/- | (१३०००/-) 14000 |
| शिपाई | ४०००/- | ७०००/- |

सुचक :

श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :

श्री. जुबेर इनामदार

मा. महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्र. ३४ :-** **अतिरिक्त ५० द.ल.ली. मिरा भाईंदर पाणी पुरवठा योजना उर्वरित कामे पूर्ण करणेबाबत.**

**ठराव क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर शहरासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत पुर्ण ठेव तत्वावर अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेस शासनाने पापुयो/१०९८/प्र.क्र.०३/पापु१८, दि. ३१/०३/१९९७ रोजी रु. ११०६४.४० लक्ष एवढया रक्कमेस प्रशासकीय मंजूरी दिलेली होती.

योजनेतील पुर्ण झालेली कामे टप्प्याटप्प्याने मिरा भाईंदर मनपास हस्तांतरीत करण्यांत आलेला आहेत. योजनेमधील उर्वरित १ उंच जलकुंभ, ७ साठवण टाकी व १ एम.बी.आर. दुरुस्ती इत्यादी कामे गेल्या १० वर्षापासून अद्याप अपूर्ण आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदरची कामे पूर्ण करणेबाबत वारंवार पाठपुरावा करण्यांत आलेला असून सदर कामाबाबत मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे दालनात दि. १९/०५/२०१० रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकी दरम्यान ५० द.ल.ली. योजनेतील अपुर्ण कामे मजीप्राने तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतु अदयापावेतो सदरची कामे पूर्ण झालेली नाहीत. अधिक्षक अभियंता मजीप्रा ठाणे यांनी सदरची कामे निधी उपलब्ध नसल्याने मिरा भाईंदर मनपाने करणे सोईचे होईल असे कळविले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदरची अपूर्ण कामे व निधी मनपास वर्ग करणेबाबत दि. ०३/०३/२०११ व दि. १३/०९/२०१२ रोजीच्या पत्रान्वये मजीप्रास कळविले आहे. मुख्य अभियंता मजीप्रा, ठाणे यांनी मा. सदस्य सचिव, मजीप्रा, मुंबई यांना दि. ०६/०६/२०१२ रोजीच्या पत्रान्वये निधी व उर्वरित कामे मजीप्रामार्फत मनपाकडे हस्तांतरीत करणे बाबत कळविले आहे. दि.२०/१०/२०१२ रोजी मुख्य अभियंता, मजीप्रा यांच्या समवेत मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या दालनात ५० द.ल.ली. योजनेतील उर्वरित कामे मनपास हस्तांतरीत करणे बाबत बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकी दरम्यान योजनेवरील शिल्लक निधी रु.३.०३ कोटी व कामाचे कागदपत्रे मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यांची कार्यवाही लवकरात लवकर करण्याचे मान्य केलेले आहे.

योजनेवरती आजपावेतो रु. १००.७७ कोटी एवढा खर्च झालेला असून रु. ३,०२,९९,०००/- एवढे शासकीय अनुदान शिल्लक आहे.

वस्तुस्थिती पाहता व शहरातील पाणी टंचाई लक्षात घेता वरील कामे आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने करणे आवश्यक आहे. त्यामधील खालील कामे व अर्धवट राहिलेली कमला पार्क, सुदामा नगर व सिल्व्हर पार्क ही कामे पहिल्या टप्यात तातडीने हाती घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | क्षमता (द.ल.ली.) |
|---|---|---|
| १ | सर्व्हे नं. ७७७ (राई-मुर्धे) येथील उंच सलोह जलकुंभ | १.०० |
| २ | डोंगरी येथील साठवण टाकी | ०.९० |
| ३ | डोंगरी येथे एम.बी.आर. बांधणे | ०.७६ |

सदर कामांत करिता अंदाजित रु. ३.२० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी सन २०१२-१३ या वार्षिक अंदाजपत्रकात **'५० द.ल.ली. पाणी पुरवठा योजना पूर्ण करणे'** या लेखाशिर्षका खाली रु. ९.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेतील उर्वरित कामे मजीप्रा कडून हस्तांतरीत करुन घेण्यास व मनपामार्फत नव्याने निविदा मागवून निविदा मंजुरीकरिता मा. महासभेस सादर करुन घेण्यास व त्याकरिता येणारा खर्च रु. ३.२० कोटीस मा. महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. बर्नड डिमेला ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

उत्तन येथे पाली व पातान परिसरात नविन जलकुंभ बांधून त्यात अतिरिक्त होणाऱ्या ५० एम.एल.डी. पाण्यातून पाणी पुरवठा करण्यात यावा.

**ठराव सुचनेसह सार्वनूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्र. ३५ :- मालमत्तेची मलनि:सारण जोडणी (Seawerage Property Connection) महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेतील Sewer line ला जोडणी करणेबाबत.**

**ठराव क्र. ३९ :-**

मिरा भाईंदर शहराकरिता केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नवसन अभियान अंतर्गत भुयारी गटार प्रकल्प मंजुर आहे. या भुयारी प्रकल्पाअंतर्गत मलवाहिनी टाकण्याचे कामे व मलनि:सारण केंद्राची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामे पूर्णत्वास जाणे पूर्वी शहरातील अपार्टमेंट व सोसायटीमधून येणारे Sewar ची जोडणी महानगरपालिकेच्या मलवाहिनीस जोडणे आवश्यक आहे. अस्तित्वात असलेल्या रोडमध्ये विद्युत केबल, पाण्याची पाईपलाईन, टेलिफोन केबल इत्यादी असल्याने सदर जोडणीची कामे सोसायटीने सोसायटीच्या स्वखर्चाने इमारतीच्या गेटपर्यंत करण्यात येवून पुढील सोसायटीचे गेट ते महानगरपालिकेच्या सिवर लाईन मॅनहोल पर्यंतची कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येतील. मालमत्तेची मलनि:सारण जोडणी **Seawerage Property Connection** महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेतील Sewer line ला जोडणी करणे बाबतचा ठरावास मा. स्थायी समिती सभा दि.०१/०२/२०१२ प्रकरण क्र.११५ ठराव क्र. ९९ अन्वये मंजुरी दिलेली असून सदरचा ठराव अंतिम मंजुरीसाठी मा. महासभेपुढे ठेवण्यास शिफारस आहे. सोबत मा. स्थायी समिती सभेच्या ठरावाची प्रत जोडण्यात येत आहे.

सदर जोडणीची कामे महापालिकेच्या अभियंता यांचे देखरेखे खाली करणे बंधनकारक राहिल. त्यानुसार ४" ते ६" व्यासाच्या जोडणी रू. २५,०००/- व ६" व्यासापासून पुढील जोडणीस रू. ५०,०००/- एवढा शुल्क भरणा करणे आवश्यक आहे. तसेच वैयक्तिक जोडणीस रू. १५,०००/- व गावठाणातील घरांना (१००० स्क्वे. फुट. बिल्टअप पर्यंत) रू. २०००/- शुल्क भरणे आवश्यक आहे. या शुल्कामध्ये रस्ता खोदाई, रस्ता दुरूस्ती व लागणारे साहित्य यांचा समावेश आहे. सोसायटी धारकांनी सोसायटी अंतर्गत मलवाहिनी जोडण्याचा विहीत नमुन्यातील अर्ज महापालिकेस सादर करणे आवश्यक असून सादर केलेल्या अर्जाची छाननी करून कार्यक्षेत्रावरती मनपाच्या अभियंताद्वारे पाहणी करून अंतर्गत मलवाहिनी संकल्पचित्रास महानगरपालिकेमार्फत मान्यता देण्यात येईल व त्यानुसार काम करणे बंधनकारक राहील. मा. स्थायी समितीच्या निर्णयास अंतिम मंजुरी मिळण्यास शिफारस आहे. भुयारी गटार योजने अंतर्गत एकूण १० झोन असुन त्यापैकी काही झोन पुर्णत्वास आलेल्या आहेत व योजना कार्यान्वयीत करण्याकरिता **Seawerage Property Connection** ची जोडणी **Sewer line** ला होणे आवश्यक आहे. त्यास्तव **Seawerage Property Connection** चा सविस्तर DPR रू. २२.२१ कोटीचा सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात येवून मान्यतेकरिता केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. तसेच सदर **Seawerage Property Connection** चे काम करून घेण्याच्या कामाचा खर्चाची तरतुद सन २०१२-१३ अर्थसंकल्पात करण्यात

आलेली आहे. त्याअनुषंगाने **Seawerage Property Connection** चा प्रस्ताव चालू दरसुचीनुसार (२०११-१२) सुधारीत करण्यात आलेला असून प्रस्तावाची किंमत रू. ३८.९९ कोटी एवढी येत आहे. सद्यस्थितीत भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर असून टप्प्याटप्प्याने **Seawerage Property Connection** करणे आवश्यक असून पहिल्या टप्प्या अंतर्गत झोन क्र. २,४,५,६अ,६सी व झोन ७ मधील **Seawerage Property Connection** करणेची कामे हाती घेण्यात येणार असून त्याकरिता रू.२२.४५ कोटीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास प्रशासकिय मान्यता मिळणेस व त्याकरिता येणारा खर्च रू. २२.४५ कोटीस व निविदा मागविण्यास तसेच निविदा मंजुरीसाठी मा. महासभेत सादर करण्यास मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील **अनुमोदन :-** श्री. ध्रुवे इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**पिठासिन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(61)

३६

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा**

**दि. १५/०१/२०१३**

**प्रकरण क्र.३६ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त २० द.ल.लि. पाणी पुरवठा होणेबाबत.**

**ठराव क्र. ४० :-**

वरील विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस अतिरिक्त ३० द.ल.ली. पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होणेबाबत वेळोवेळी मंत्रालयीन स्तरावरील बैठक आयोजित करण्यात आलेल्या होत्या. दि.२३/११/२०११ रोजी मा. सुनिल तटकरे, मंत्री जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत १० द.ल.लि. पाणी तातडीने देण्याचे निर्देश मऔविम ला देण्यात आलेल्या होत्या. तद्नंतर मा. मंत्री जलसंपदा यांच्या दालनात दि.१६/०३/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत २० द.ल.ली. पाणी असे एकूण ३०द.ल.ली. अतिरिक्त पाणी पुरवठा मंजुर केला आहे. तसेच या धर्तीवर मा. मंत्री, नारायणराव राणे साहेब, उद्योग व बंदरे यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेस २० द.ल.ली. पाणी पुरवठा तातडीने सुरू करणेबाबत दि.१९/०३/२०११ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास निर्देश दिलेले होते.

सदर २० द.ल.ली. पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरून साकेत (ठाणे) येथे एक महिन्याच्या चाचणी कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपाची नळजोडणी देण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि.०४/१२/२०१२ रोजी मंजुरी दिलेली आहे. सदर २० द.ल.ली. पाणी पुरवठा प्रायोगिक तत्वावर घेणेकरिता साकेत येथे तात्पुरत्या स्वरूपात बुस्टींग पंपगृह बांधणे आवश्यक असून सदर कामासाठी रू.३.१९ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

सदर कामासाठी सन २०१२-१३ या वार्षिक अंदाजपत्रकात "नवीन अतिरिक्त पाणी पुरवठा" या लेखाशिर्षका खाली रू. ९.७२ कोटी एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. वाढीव २० द.ल.ली. पाणी घेण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात बुस्टींग पंपगृह बांधणे अत्यावश्यक आहे.

सदर रू. ३.१९ कोटी प्रस्तावास मंजुरी मिळण्यास तसेच निविदा मागविण्यास व निविदा मंजुरीकरिता मा. महासभेस सादर करण्यास हि मा. महासभा मंजुरी देत आहे. उमा छारा म्हणत आहे

सुचक :- श्री. जुबेर इनामदार

अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ३७ )** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. ( ४१ )** :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या खालील मालमत्ता भाडयाने देण्याबाबत महानगरपालिकेस अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्तावित जागा हया संस्थानी सार्वजनिक वापराकरीता वापरण्यास मागितलेल्या असून त्यामधून कोणताही वाणीज्य वापर करण्याचा उद्देश नाही. सदर मालमत्ता खालील वार्षिक रकमेस भाडयाने देण्यात यावी.

| अ.क्र. | ठिकाण | मोजमाप | वार्षिक भाडे | संस्थेचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | धारावी समाजमंदीर | ८०.३६ चौ.मीटर | रु. १८००/- | श्री. धारावी देवी मंदीर ट्रस्ट, धारावी |
| २ | राई व्यायाम शाळा | ७६.२८चौ.मीटर | रु. ६०००/- | लिटील मास्टर मंडळ, राई |
| ३ | भाईंदर (प) आंबेडकर नगर समाज मंदीर (व्यायाम शाळा) | ४३.१३ चौ.मीटर | रु ~~६०००/-~~ 1800/- | मिरा-भाईंदर कुस्तीगीर संघ, भाईंदर |
| ४ | घोडबंदर समाज मंदीर | ६६.१५ चौ.मीटर | रु. १८००/- | एकता मित्र मंडळ घोडबंदर |
| ५ | भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटी, योगध्यान शेड | १०९.५४ चौ.मीटर | र. १८००/- | योगध्यानधारणा फाउंडेशन भाईंदर (पूर्व) |
| ६ | घोडबंदर जुनी शाळा इमारत | ८३.१५ चौ.मीटर | रु. ~~३०००/-~~ 1800/- | शिक्षण उत्तेजक मंडळ घोडबंदर |
| ७ | पेणकरपाडा शिवमंदिर जवळील समाजमंदिर | ३१.२२ चौ.मीटर | रु. १८००/- | शिवमंदिर कमीटी पेणकरपाडा |
| ८ | मिरारोड साईबाबानगर समाजमंदीर | ८०.९२ चौ.मीटर | रु. १८००/- | प्रबोधन प्रतिष्ठान मिरारोड |
| ९ | मिरारोड गोकुळ व्हीलेज, व्यायामशाळा | ४४.११ चौ.मीटर | रु. ६०००/- | शिवसमर्थ क्रिडा मंडळ |
| १० | भाईंदर (प) बेकरीलेन समाज मंदीर | ६०.००चौ.मीटर | रु. १८००/- | मे. सिध्दीविनायक चॅरीटेबल ट्रस्ट, भाईंदर (प) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | भाईंदर (पूर्व) नवघर स्मशानजवळील व्यायामशाळा | २७.७५ चौ.मीटर | रु. ६०००/- | मे. जयभवानी प्रतिष्ठान, नवघर |
| १२ | स्व. क्विटंन कोरीया व्यायामशाळा डोंगरी | १०२.२० चौ.मीटर | रु. ६०००/- | डोंगरी गांव मंडळ, डोंगरी |
| १३ | पाली समाज मंदीर पाली | ६९.९२ चौ.मीटर | रु. १८००/- | पाली गांव जमात, पाली |

वरील मालमत्ता ५ वर्ष मुदतीकरीता प्रस्तावित वार्षिक भाडे आकारून भाडयाने देणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर मालमत्ता एखादया संस्थेने भाडयाने न घेतल्यास इतर इच्छूक संस्थेस भाडयाने देण्यात यावी. वीजबील, पाणीबील, किरकोळ दुरुस्ती सदर संस्थेनी स्वखर्चाने करावी. सदर संस्थासोबत योग्य अटीशर्तीचा करारनामा करण्यात यावा. तसेच महानगरपालिकेच्या इतर मालमत्ता देखिल संस्थानी भाडयाने मागितल्यास भाडे ठरवून सदर मालमत्ता भाडयाने देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेस देण्यात येत आहेत.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदन :-** श्री. कुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PC1/DK/2012-13/MT1

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्र. ३८ :-** वाहन वाहनचालकासह व इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देवून निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४२ :-**

वाहन वाहनचालकासह व इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेणेकरीता रु. ६० लाख आर्थिक व प्रशासकीय मंजुरीकरीता मी ठराव मांडत आहे. जोपर्यंत नवीन ठेकेदार येत नाही तोपर्यंत जुन्या ठेकेदाराला मुदतवाढ देण्यासाठी मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

६९

२९

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा सभा दि.१५/०१/२०१३**

**प्रकरण क्र. :- ३९**

**ठराव क्र. :- ७३**

**विषय :- घनकचरा व्यवस्थापन उपविधीनुसार दंड वसुली करणेबाबत.**

घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजनकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनेच्या उपविधी तयार करून मा. महासभेची अंतिम मंजूरी घेवून शासनास पाठविलेले आहे. घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २००० व मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ यांचा आधार घेवून घनकचरा व्यवस्थापनेची उपविधी तयार केलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेला शहरातील घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजनाकरीता मिरा भाईंदर स्वच्छता व आरोग्य उपविधी २०१० उपविधी तरतुदीचे उल्लंघन करणा-यावर दंडात्मक कारवाई करणे पुर्वी माजी सैनिकांनी याबाबत नागरीकांमध्ये पोस्टर्स, बॅनर्स, हॅन्डबिल तसेच लाऊडस स्पीकर व इतर माध्यमातून वरील उपविधीबाबत एक महिना कालावधी करीता जनजागृती करावे.

तसेच दोषी व्यक्तींना उपविधीमधील तरतुदीचा भंग झाल्याबाबत प्रथम समज द्यावी व यानंतरही वारंवार असेच कृत्य घडल्यास याबाबत छायाचित्र काढून त्यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. गोषवा-यातील अटीशर्तीनुसार माजी सैनिक कल्याणकारी संस्थेमार्फत मिरा भाईंदर स्वच्छता व आरोग्य उपविधी २०१० मधील तरतुदीचा भंग करणा-या दोषी व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करणे करीता ~~एक वर्ष~~ कालावधी करीता महापालिका क्षेत्रात राबविणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

~~सदर संस्थेने समाधानकारक काम न केल्यास अन्य संस्थेचा विचार मा. महासभेसमोर मंजुरी करीता सादर करावा. असा ठराव मांडत आहे.~~

सुचक :- अनुमोदक :-

श्री. ध्रुवकिशोर पाटील ठराव सर्वानुमते मंजुर श्री. कुबेर ज्ञायवार

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्रमांक** (४०) :- विकास कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्रमांक** ( ४४) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) येथे पोलिस स्टेशन ते नगरभवन समोरून जुन्या रेल्वे फाटकापर्यंत (एम.टी.एन.एल. कार्यालय) जाणारा १८.०० मीटर डी.पी. रस्ता असून सदर रस्त्यालगत नगरभवन बाजूचे गटार व फुटपाथचे काम करण्यात आलेले आहे. तथापी पोलिस स्टेशन समोरून भाईंदर शॉपींग सेंटर ते एम.टी.एन.एल रेल्वे फाटकापर्यंत असलेली लहान गटारातून पाण्याचा निचरा होत नसल्याने सदर भागात पाणी साचते. सदर गटार बांधून त्यावर स्लॅब टाकून फुटपाथ तयार करणे करीता रू. १,११,८०,४००/- एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील      **अनुमोदन :-** श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

**पिठासन अधिकारी**

७१

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्रमांक :- (४१) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नेटवर्किंग करीता खाजगी कंपनीस महानगरपालिकांच्या जागेत ॲटींना पोल उभारण्यास जागा भाड्याने उपलब्ध करून देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक** ( ४५ ) :-

सदर प्रस्तावानुसार ॲटींना पोल उभारल्यास रेडीएशन होणार आहे काय? तसेच इतर महानगरपालिकेने कशा प्रकारे परवानग्या दिल्या आहेत? याबाबत सविस्तर माहिती घेऊन पुढील महासभेपुढे प्रस्ताव सादर करावा.

**सुचक :-** श्री. बर्नार्ड डिमेलो

**अनुमोदन :-** श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

**पिठासन अधिकारी**

४२ 72

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

## महासभा

ठराव दि.१५/७ /२०१३

प्रकरण क्र. ४२ ~~विषय~~ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अपंग व्यक्तीसाठी अपंग कल्याण योजना राबविण्याबाबत.

ठराव क्र. ४६

मिरा भाईंदर महनगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये "अंध व अपंग कल्याण" या लेखाशिर्षकाखाली रु.८७,४५,८३६ इतकी रक्कम शिल्लक आहे. तरी सन २०१२-१३ या वर्षापासुन मिरा भाईंदर क्षेत्रातील अपंग व्यक्तीसाठी खालीलप्रमाणे योजना राबविण्याचे आहे.

१) **योजनेचे नांव** :- शासन परिपत्रक क्र. - न्यायाप्र/२०११/प्र.क्र/सुधार - ३ यानुसार महानगरपालिकेमधील आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ यामध्ये काम करणाऱ्या अपंग कर्मचाऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार लागणारे साहित्य/उपकरणे वाटप

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) मनपा आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये अपंग व्यक्ती कार्यरत असावी.

२) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला

३) महानगरपालिकेमध्ये काम करत असलेल्याचा दाखला किंवा नेमणूक पत्र.

२) **अंपग व्यक्तींना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण :-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | अपंग व्यक्तींना त्यांच्या सोईनुसार प्रशिक्षण देवून त्यांना कार्यक्षम बनविणे. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे वास्तव असल्याचा दाखला.<br>२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला<br>३) जन्म दाखला.<br>४) शिधापत्रकाची सत्यपत्र<br>५) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र. |

३) अपंग व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरविणे -

| | |
|---|---|
| योजनेचा उद्देश - | अपंग व्यक्तींना त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिव्यंग, कर्णबधीर, अंध व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरवून त्यांना स्वावलंबी बनविणे. |
| कार्यक्षेत्र | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| योजनेच्या अटीशर्ती | १) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे वास्तव असल्याचा दाखला.<br>२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला<br>३) जन्म दाखला.<br>४) शिधापत्रकाची सत्यपत्र<br>५) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र. |

४) अपंग व्यक्तींना ओळखपत्र वाटप –

| | |
|---|---|
| योजनेचा उद्देश - | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना ओळखपत्र देवून त्यांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील अपंग कल्याण योजनेचा लाभ घेता येईल. |
| कार्यक्षेत्र | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| योजनेच्या अटीशर्ती | १) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे वास्तव असल्याचा दाखला.<br>२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला<br>३) जन्म दाखला.<br>४) शिधापत्रकाची सत्यपत्र<br>५) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र. |

५) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अपंग विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.

शिष्यवृत्ती :-

| शिक्षण | प्रवास | पुस्तके | शैक्षणीक फी | एकूण रु. (वार्षिक) |
|---|---|---|---|---|
| १ ते ४ | ८०० | २०० | १५०० | २५०० |
| ५ ते ७ | १२०० | ४०० | २४०० | ४००० |
| ८ ते १० | १४०० | १००० | ३६०० | ६००० |
| ११ ते १२ | १००० | १००० | ६००० | ८००० |
| १२ ते पदवी | १००० | १००० | ८००० | १०,००० |

**योजनेच्या अटीशर्ती :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ३ वर्षाचे वास्तव्याचा दाखला पाहिजे.

२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला.

३) जन्म दाखला.

४) शिधापत्रकेची सत्यप्रत.

५) अर्जदाराने मागील शैक्षणिक वर्षात शिक्षण पूर्ण केलेले असावे, सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. किंवा नविन प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश अर्जाची सत्यप्रत जोडावी.

६) शैक्षणिक फी संबधी मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/कॉलेजमध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.

७) अर्जा सोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.

८) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजुर करण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

तरी सन २०१२-१३ या वर्षापासुन सदर योजना राबविण्यासाठी प्रशासकिय व आर्थिक मान्यतेस हि सभा मंजुरी देत आहे.

**सूचक** — श्री. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदन** — श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्र. ४३ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोबाईल टॉवर्स / यंत्रणा बसविणेबाबतचे सुधारीत धोरण निश्चित करणेबाबत.**

**ठराव क्र. ४७ :-**

मिरा-भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मोबाईल टॉवर उभे करणेकरिता दि.१०/१०/२००८ रोजीच्या मा. महासभा, ठराव क्र. ५० अन्वये धोरण निश्चित करणेत आलेले आहे. शुल्क निश्चित केलेले धोरण खालीलप्रमाणे आहे.

(१) परवानगीसाठी आकारण्यात येणारे छाननी शुल्क रु.८००/-
(२) सुरक्षा अनामत रक्कम रु.२५,०००/- (परतावा पात्र / Refundable)
(३) परवाना शुल्क प्रति वर्ष रु.१५,०००/- व जेव्हा पासून मोबाईल यंत्रणा उभारणेत आलेली आहे, तेव्हा पासून परवाना शुल्क (मागिल फरक) प्रति वर्ष रु.१५,०००/- भरणेत यावे.
(४) मोबाईल टॉवर / ॲन्टेना उभारणीकरिता शुल्क आकारण्यात येणार नाही.
(५) तात्पूरत्या केबिनचे बांधकामाकरिता परवानगी घेतेवेळी शीघ्र सिध्द गणकातील (Ready Reckoner) निवासी दरानुसार प्रति चौ.मी. एकदाच आकारणी करणे, तसेच नुतनीकरण करणे बंधनकारक राहील.
(६) विना परवाना केलेल्या कामाकरिता आकारावयाचे दंडात्मक शुल्क रु.१०,०००/-
(७) परवानगी / नुतनीकरणाचा कालावधी एक वर्षाकरिता राहील.

महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या मोबाईल टॉवर्सबाबत आढावा घेतला असता, सुमारे ४०० मोबाईल टॉवर्स आहेत. यापैकी परवानगी घेतलेले २२४ व उर्वरीत १७६ विनापरवानगी उभारणेत आलेले आहे. विनापरवानगी उभारणेत आलेले मोबाईल टॉवर, विद्युत पुरवठा बंद करणे व मोबाईल टॉवर्स निष्कासीत करणे याप्रमाणे कारवाई सुरु आहे.

मोबाईल टॉवर्स कंपनीधारकांनी अर्ज केला आहे, परंतू बांधकाम परवानगी मिळालेली नाही, शुल्क मान्य नसलेबाबत, विद्युत पुरवठा बंद करु नये, टॉवर्सवर महानगरपालिकेने कारवाई करु नये याबाबत मा. उच्च न्यायालयात प्रकरणे दाखल होत असतात. त्याअनुषंगाने मोबाईल टॉवर्सच्या शुल्काबाबत सुधारीत धोरण निश्चित करणे आवश्यक झालेले आहे.

मा. महासभेच्या ठराव क्र. ५०, दि.१०/१०/२००८ नुसार प्रचलित असलेले धोरण हे सर्वसाधारण नवी मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर निश्चित करण्यात आलेले आहे. दरम्यान नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल कंपन्यांनी मा. न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणाच्या / निकालाच्या अनुषंगाने मंजूर धोरणातील शिग्रसिध्दगणकाच्या आधारे आकारण्यात येणारे कॅबिनच्या बांधकामाचे शुल्क (प्रिमीयम) वगळून उर्वरीत शुल्क आकारणेत येत आहे.

मा. शासनाने शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१०/१९७५/प्र.क्र.२४१७/१०/नवि-१३, दि२६/०७/२०११ अन्वये मोबाईल टॉवर्सबाबत राज्यातील सर्व महानगरपालिकेसाठी सर्वकष धोरणाचे प्रारुप प्रसिध्द केलेले

आहे. सदर धोरण प्रारुप असून अंतिम झालेले नाही. सदर प्रारुप धोरणात सादर करावयाच्या कागदपत्रात महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड (M.P.C.B.) यांचेकडील मोबाईल यंत्रणेस पुरविण्यात येणा-या जनित्र (Generator) च्या अनुषंगाने निर्माण होणा-या ध्वनी व वायु प्रदुषण (Noise & Smoke) साठी नाहरकत दाखला सादर करणे सामाविष्ठ आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रचलित धोरणास सुमारे ४ वर्षाचा कालावधी झालेला आहे. सबब वरिल परिस्थितीत वाढीव दरासह मिरा भाईंदर महानगरपालिकेत मोबाईल टॉवर्ससाठीच्या नियमाकूल / परवानगीकरिता आकारावयाचे शुल्क / मार्गदर्शन (Guidelines) खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>आकारावयाचे शुल्क खालीलप्रमाणे</u>**

| | | |
|---|---|---|
| १) छाननी शुल्क | - | रु.८००/- |
| २) सुरक्षा अनामत | - | रु.५०,०००/- |
| ३) परवानगी शुल्क | - | रु.२०,०००/- |
| ४) विना परवानगी उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवर्सचे दंडनिय शुल्क | - | रु. ५०,०००/- |
| ५) नुतनीकरण शुल्क | - | (अ) रु.२०,०००/-(मुदत संपल्यावर १ महिन्यापर्यंत)<br>(ब) रु.२०,०००/- अ रु.१,०००/- प्रति महिना<br>(१ महिन्यानंतर १ वर्षापर्यंत) |

**<u>सादर करावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे</u>**

१) टेलिकॉम कंपनीसाठी भारत सरकारने दिलेल्या परवानगीची प्रत
२) इमारत मालकाचे / सोसायटीचे नाहरकत प्रमाणपत्र.
३) इमारत मालक / हौ. सोसायटी व मोबाईल कंपनी यांचे दरम्यानच्या करारनाम्याची नोंदणीकृत प्रत.
३) स्ट्रक्चरल इंजिनिअर कडील स्टॅबिलीटी सर्टीफिकेट. तसेच प्रत्येक तीन वर्षानंतर स्टॅबिलीटी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
४) वास्तुविशारदांचे नोंदणी प्रमाणपत्र व नेमणूक पत्र.
५) स्थळदर्शक नकाशा (Location Plan) प्रस्तावित बांधकामाचा नकाशा (Plan of the proposed work)
६) टेलिकॉम कंपनी व सदर इमारत मालक / सोसायटी यांचे सदर केबिन टेलिकम्युनिकेशनचा वापर बंद झाल्यावर काढून टाकण्यासंबंधीचे हमीपत्र-१.
७) कंपनीकडून वापर बंद झाल्यानंतर कॅबिन काढून टाकणेबाबतचे मोबाईल कंपनी व संबंधीत मालक / को.ऑ.हौ.सो.लि. यांचे संयुक्त हमीपत्र-२
८) महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड (M.P.C.B.) यांचेकडील नाहरकत दाखला. तसेच निर्माण होणा-या रेडिएशनबाबत संबंधीत सक्षम प्राधिकरणाचे नाहरकत प्रमाणपत्र. तसेच रेडिएशनबाबत मान्यताप्राप्त संस्थेकडून वार्षिक ऑडीट करणे.
९) शाळा, कॉलेज, हॉस्पीटल यावर टॉवर अनुज्ञेन होणार नाही.
१०) आवश्यक प्रकरणात "महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट" (MCZMA) यांचेकडील नाहरकत प्रमाणपत्र.

तसेच शाळा, कॉलेज, हॉस्पीटल या इमारतीवर यापूर्वी लावण्यात आलेले मोबाईल टॉवर्स यापुढे चालु ठेवण्यात येवू नये. या इमारतीवरील टॉवर बंद करण्याची कार्यवाही महानगरपालिकेने करावी.

उपरोक्त धोरणास महासभा मंजूरी देत आहे. शासनाचे धोरण अंतिम ठरल्यानंतर तसेच मा. न्यायालयाने आदेश दिल्यानंतर सदरच्या धोरणात आवश्यकतेनुसार बदल करण्यासाठी प्रस्ताव महासभेपुढे मंजूरीसाठी सादर करण्यात यावा. तसेच महानगरपालिका क्षेत्रात नवीन मोबाईल टॉवर्सना परवानगीकरिता महासभेची मंजूरी असणे आवश्यक आहे, याप्रमाणे कार्यवाहीस ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर ईनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

उपरोक्त विषयाला मंजूरी देताना मा. आयुक्तांना ह्या बाबतच्या परवानग्या देण्याचे अधिकार देण्यात यावेत आणि दर सहा महिन्यांनी त्याची माहिती मा. महासभेपुढे ठेवण्यात यावी

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/०७/२०१३

78

**प्रकरण क्र.४४ :- आरक्षण क्र १००, भाईंदर (प.) येथे Theme Park (Public Park) विकसित करणेबाबत.**

**ठराव क्र.४८ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईदर (प.) ओव्हर ब्रीजजवळ मौजे भाईदर सर्वे क्र. ६८५, हिस्सा क्र. ३, आरक्षण क्र. १०० हे बगीच्यासाठी आरक्षीत असुन सदर बगीच्याचे क्षेत्रफळ अंदाजित ६५००० चौ. फुट आहे. भाईदर (प.) येथे कोणत्याही प्रकारचे Theme Park विकसित करण्यात आलेले नाही. सदर ठिकाणी Theme Park विकसित केल्यास मनपा क्षेत्रातील नागरिकांना मनोरंजनाकरिता चांगले ठिकाण मिळणार आहे.

Theme Park चे मुख्य आकर्षण सदर ठिकाणी सर्व वयोगटाच्या नागरिकांकरिता वेगवेगळ्या प्रकारची खेळण्याची साधने असणार असुन त्यामध्ये स्कायस्विंगर (Sky Swinger), मिनी ट्रेन (Mini Train), आक्टोपस राईड (Octopus Ride), मिनी पायरेट शिप (Mini Pirate Ship), कारॉसेल (Carousel Animal Swinger), डॅशिंग कार्स (Dashing Car), वॉटर राईड्स इक्विपमेंट (Water Rides & Slides) आणि स्लाईड्स (Slides) इत्यादी इक्विपमेंट असणार असुन सदर इक्विपमेंटचा उपयोग फॅमिली राईड्स (Family Rides), किड्डि राईड्स (Kiddies Rides), अॅडल्ट राईड्स (Adult Rides) इत्यादींना होणार असुन त्यामध्ये वॉकिंग ट्रॅक ही असणार असुन त्याच्या सभोवताली लॉन, शोभिवंत फुलझाडे लावून सुशोभिकरण करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त मुले आणि कुटूंबासाठी इंटरअॅक्टिव्ह खेळाची साधने असतील. सदर ठिकाणी छोटेसे रेस्टॉरंट ही असणार असुन Theme Park विकसित झाल्यास दररोज साधारणपणे ३५० ते ४०० नागरिक त्याचा दररोज लाभ घेतील अशी अपेक्षा आहे.

तरी उपरोक्त ठिकाणी Theme Park विकसित करणेकामी अंदाजित रु. २.२५ (रुपये दोन कोटी पंचवीस लाख फक्त) ते रु. २.५० (रुपये दोन कोटी पन्नास लाख फक्त) कोटीपर्यंत खर्च येणार आहे. सदरचा खर्च २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात **"उद्याने / दुभाजक सुशोभिकरण करणे व म्युझिक सिस्टम बसविणे"** या लेखाशिर्षका खाली असलेल्या रु. ६,७५,००,०००/- (रुपये सहा कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) तरतुदीमधून खर्च करण्यात येणार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे उद्यानासाठी आरक्षित असलेले आरक्षण क्र. १०० येथे Theme Park विकसित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास तसेच पुढील कार्यवाही करणेस मा. महासभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटिल

**अनुमोदक :-** श्री. ध्रुवे इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**मा. महापौर**

79

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/०१/२०13

**प्रकरण क्र. ४५ :-** मिरा भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याकरीता चर्चा करुन महासभेमध्ये निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. ४९ :-**

मा. महापौरांच्या आदेशाने सदरचा विषय पुढच्या मा. महासभेत घेण्याचे ठरले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्र. ४६ :-** सन्मा. सदस्या अन्सेला मेंडोन्सा परेरा यांचा दिनांक ०९/०१/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महिला व बालकल्याण समितीच्या योजना राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या कामकाजाबाबत अधिकार व कर्तव्य समितीला देणेबाबत.

**ठराव क्र. ५० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. ३०/११/२०१२ (दि. २५/१०/२०१२ व दि. २९/११/२०१२ रोजीची तहकुब सभा) ठराव क्र. ६ अन्वये, मा. महिला बालकल्याण समिती गठीत करण्यात आलेली आहे. मा. महिला व बालकल्याण समिती द्वारे शहरातील महिला, अपंग व्यक्ती तसेच बालकांसाठी शासनाकडून जाहिर झालेल्या अतिमहत्वाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. महिला व बालकल्याण समितीद्वारे राबविल्या जाणाऱ्या विविध योजना तसेच उपक्रमासाठी सद्यस्थितीत मा. महासभेपुढे विषय घेऊन प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेण्यात येते. यामुळे एखादया प्रस्तावावर तत्काळ निर्णय घ्यावयाचा असल्यास महिला व बालकल्याण समितीपुढे निर्णय घेता येत नाही तसेच काही योजना, उपक्रमांसाठी शासनाकडून वेळ मर्यादा घालून दिलेली असते. अशा योजना, उपक्रमांवर त्वरीत निर्णय घेणे आवश्यक असते. मा. महासभेपुढे मान्यता घेणेच्या प्रक्रियेमुळे महत्वाच्या योजना, उपक्रम राबविणेसाठी तत्काळ निर्णय न होता विलंब होत आहे. करीता मा. महिला व बालकल्याण समितीस प्रशासकीय व आर्थिक मान्यतेचे संपूर्ण अधिकार दिल्यास समितीच्या निगडित प्रस्तावांवर तत्काळ निर्णय होऊन योजना, उपक्रम विनाविलंब राबविले जातील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, चे प्रकरण २ नियम ३०(२) नुसार महानगरपालिकेस, ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील अशी तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार मा. महिला व बालकल्याण समिती निगडीत सर्व प्रस्ताव यापुढे प्रशासकीय व आर्थिक मान्यतेसाठी मा. महासभेपुढे न घेता, मा. महिला व बालकल्याण समितीमध्ये घेणेचे संपुर्ण अधिकार ही मा. महासभा प्रदान करीत आहे.

**सुचक :- श्रीम. असेन्ला मेडोंन्सा-परेरा** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा बुधवार दि. २०/०२/२०१३

**अभिनंदन ठराव क्र. ५९ :-**

मिरा भाईदर शहराकरिता मागील तीन महिन्यापासून लागू केलेली १४ टक्के पाणी कपातीमुळे शहरातील नागरिकांना ७२ तासांवर पाणीपुरवठा होत होता यामुळे शहरातील नागरिक अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे त्रस्त होते. ह्या विषयाचे गांभिर्य लक्षात घेता मा. महापौर श्रीम. कॅटलीन परेरा, मा. खासदार श्री. संजीवजी नाईक व मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डान्सा ह्यांनी मा. ना. श्री सुनिल तटकरे, जलसंपदा मंत्री ह्यांना सदर पाणी कपात रद्द करणेबाबत पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केला त्या अनुषंगाने मा. जलसंपदा मंत्री ह्यांनी दि.०५/०२/२०१३ रोजी मंत्रालयातील आपल्या दालनात स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावून मिरा भाईदर शहरातील लागू केलेली पाणी कपात रद्द करण्याचे आदेश दिले. सदर बैठकीत मा. महापौर श्रीम. कॅटलीन परेरा, मा. खासदार श्री. संजीवजी नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसैन, मा. आयुक्त श्री. सुरेश काकाणी, सभागृहनेते श्री. ध्रुवकिशोर पाटील, माजी नगरसेवक श्री. भगवती शर्मा व स्टेम प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व जलसंपदा विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मा. ना. श्री. सुनिल तटकरे, जलसंपदा मंत्री ह्यांनी मिरा भाईदर शहराकरिता लागू केलेली १४ टक्के पाणी कपात रद्द केल्यामुळे शहरातील नागरिकांना दिलासा मिळालेला आहे. मिरा भाईदर शहराकरिता लागू केलेली पाणी कपात रद्द केल्यामुळे मा. जलसंपदा मंत्री मा. ना. श्री. सुनिल तटकरे ह्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांच्या अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे.

मिरा भाईदर शहरातील नागरिक श्री. ब्रम्हदेव राम पडीत ह्यांना आपल्या केंद्र सरकार तर्फे पद्मश्री पुरस्कार देण्यात आला त्याबद्दल त्यांच्यासुद्धा अभिनंदनाचा ठराव मांडतो.

मिरा भाईदर शहरामधील हिशोब चार्टर्ड अकाऊन्टतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या क्रिकेट टूर्नामेंटमध्ये मिरा भाईंदर शहरातील डॉक्टर, वकिल, चार्टर्ड अकाऊन्टंट आणि नगरसेवक ह्या सर्वांच्या क्रिकेट मॅच होतात त्या मॅचमध्ये सतत तीन वर्षे आपल्या नगरसेवक संघाने फायनल मारल्यामुळे त्या नगरसेवक संघाच्या अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील. अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ गजानन पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

पिठासिन अधिकारी,
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. ०६/०२/२०१३ मा. महासभा सुचना क्र. ०६ यानुसार
## मा. महासभा बुधवार दि. २०/०२/२०१३

## ।। अभिनंदन ठराव ।।

ठराव क्र. ५२

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा मा. श्रीम. सोनियाजी गांधी, उपाध्यक्ष मा. श्री. राहुलजी गांधी, प्रदेशाध्यक्ष मा. श्री. माणिकरावजी ठाकरे तसेच महाराष्ट्रांचे मुख्यमंत्री मा. श्री. पृथ्वीराजजी चव्हाण यांच्या आशिर्वादाने तसेच राज्याचे सर्व पक्षाचे जेष्ठ नेते, विधान सभेच्या सर्व पक्षीय आमदारांच्या ~~प्रयत्नाने~~ सहकार्याने ह्या शहराचे माजी उपमहापौर **मा. श्री. मुझफ्फर हुसेन साहेब** यांना पुर्नःश्च विधान परिषदेचे सदस्य (आमदार) म्हणून बिनविरोध निवडून दिले. संपूर्ण शहराच्या व सभागृहाच्या वतीने मिरा भाईंदर शहराच्या विकासाच्या चळवळीला वेग देणारे **मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन साहेब** यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सूचक : श्री. राजेश वेतोसकर** (सही)    **अनुमोदक :** (सही)

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

(सही)

**महापौर**

**सौ. कॅटलीन परेरा**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा बुधवार दि.२०/०२/२०१३

अभिनंदन ठराव क्र. ५३ :-

राई, मुर्धा, मोर्वा ह्या बस सेवेमध्ये आठ रुपये प्रमाणे केलेली भाडेवाढ कमी करुन सहा रुपये प्रमाणे केली त्याबद्दल मा. महापौरांचे अभिनंदन करतो.

सुचक :- संदीप पाटील अनुमोदक :- प्रविण पाटील

ठराव वाचून सर्वानुमते मंजुर

ठराव वाचुन कायम करण्यात आला.

पिठासीन अधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२०१३

**अभिनदन ठराव क्र. ५४ :-**

मिरा भाईंदर शहरात भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष जिल्हाप्रमुख म्हणून श्री. नरेंद्र मेहता यांनी जो कारभार पाहिला होता. त्या कालावधीत त्यांनी ०९ चे २९ नगरसेवक करुन दिले. त्यांचा हा जो सतत कार्यरत कारभार व्यवस्थित चालला, त्याचेच प्रतिक म्हणून व मान म्हणून त्यांना पुनःश्च जिल्हाध्यक्ष या पदावर नेमण्यात आले. म्हणून मी त्यांचा अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

85

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२०१३

**प्रकरण क्र. ४७ :-** दि. ०१/१२/२०१२ व दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.५५ :-

दि. ०१/१२/२०१२ व दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. [illegible]

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२०१३

**प्रकरण क्र. ४८ :-** श्रीम. सिमा जैन यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनाम दिल्याने रिक्त झालेल्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे.

ठराव क्र. ५६

मा. महासभा सुचना क्र. ०६, दि. ०६/०२/२०१३ विषयपत्रिकेवरील प्रकरण क्र. ४८ नुसार उर्वरीत कालावधीसाठी डॉ. श्री. रमेश जैन यांची रिक्त झालेल्या जागेवर नेमणुक करावी ही विनंती भारतीय जनता पार्टीचे मा. गटनेता श्री. शरद केशव पाटील यांनी केलेली आहे. भारतीय जनता पक्षाचे मा. गटनेता यांनी मा. स्थायी समिती सदस्यपदी नेमणुक होणेकरीता श्री. रमेश धरमचंद जैन यांच्या नावाची शिफारस केलेली आहे. तरी श्री. रमेश धरमचंद जैन यांची मा. स्थायी समिती सदस्यपदी नेमणुक करण्यात येत आहे.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

८९ 87

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा बुधवार दि. २०/०२/२०१३

**प्रकरण क्र. ८९ : मिरा भाईदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याकरीता चर्चा करुन महासभेमध्ये चर्चा करुन महासभेमध्ये निर्णय घेणेबाबत.**

**ठराव क्र.:- ( ५७ )**

मिरा-भाईदर शहराचे भौगोलिक क्षेत्र ७९.०० चौ. कि.मी. असून २५ (२४) टक्के रहिवास क्षेत्रे व ७५ टक्के इतर आहे. शहराची लोकसंख्या आजमितीस १२ लाखापर्यंत पोहोचलेली आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्याही वाढलेली आहे. सन २००८ मा. महासभा दि. १०/०४/२००८ प्र.क्र. ०३ ठराव क्र. ०३ अन्वये मा. आयुक्तांना प्राधिकृत केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून शहरामध्ये २३ ठिकाणी नवीन वाहनतळ **"पे अँन्ड पार्क"** च्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. मा. स्थायी समिती दि. ०५/०१/२०१३ ठराव क्र. ०४ अन्वये सदरची निविदा प्रक्रिया रद्द करण्यांत आली व सदर विषय मा. महासभेसमोर घेण्याचे सुचित करण्यांत आले.

मिरा-भाईदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याची गरज व महापालिकेला होणा-या आर्थिक फायद्याच्या दृष्टीकोनातुन [illegible] प्रशासनाने [illegible] प्रस्तावित केलेल्या २३ ठिकाणांमधून व इतर खाली उल्लेखलेल्या जागी सदरची कार्यवाही करावी.

१. गोल्डन नेस्ट सर्कल पोलीस चौकी ते इंदलोक पोलीस चौकी
२. स्मशान रोड ते इंद्रलोक, न्यू गोल्डन नेस्ट
३. दिपक हॉस्पीटल ते सेव्हन स्क्वेअर ॲकेडमी
४. शिवार गार्डन ते सरदार पटेल हायस्कुल
५. मॅडोना हॉटेल ते रामदेव पार्क
६. कन्नकिया रोड
७. एस.के. स्टोन समोर लतिफ पार्क गृहसंकुल ते डोंगरी झोपडपट्टी
८. जि.सी.सी.क्लब ते विद्यानगरी हाऊसिंग सोसायटी
९. झंकार पासुन ते आरएनए
१०. प्लेझंट पार्क ते एमआयडीसी
११. सृष्टी ते रॉयल कॉलेज रोड
१२. शितल नगर ते जाँगीड सर्कल (रस्त्याच्या एका बाजुला)
१३. एस.के.स्टोन ते शितल नगर सर्कल (गीता नगर संकुलाच्या लगत असलेला रस्ता)
१४. मिरा रोड ब्रम्हकुमारी सर्कल ते पुनम कॉम्पलेक्स मुख्य रस्ता
१५. मिरा रोड स्टेशन शांती शॉपींग सेंटर समोर स्काय वॉक खाली
१६. भाईदर(पुर्व) जेसल पार्क रेल्वे समांतर शिवसेना शाखेच्या बाजुचा रस्ता
१७. शिवाजी पुतळा ते गोल्डन नेस्ट सर्कल रस्त्याच्या दोन्ही बाजुला
१८. शहरामध्ये महापालिकेचा आरक्षीत भूखंड जागा उपलब्ध असल्यास

तसेच भाईंदर (पश्चिम) रेल्वे स्टेशन जवळ, स्काय वॉक खाली वाहनतळ ठेका पध्दतीने चालविण्यासाठी मे. सुशिला ट्रेडींग कंपनी यांची निविदा एक वर्षाकरीता स्विकारण्यास ही मा. महासभा मान्यता देत आहे व यापूढे निविदा काढताना निविदेमध्ये टाकण्यांत येणा-या अटीशर्तीमधून सदरच्या कामाकरीता अनुभवाची अट काढून टाकावी ज्यामुळे जास्त लोकांना ठेका स्पर्धामध्ये सहभागी होता येईल व तद्नंतर याखेरीज वाहनतळ उभारण्याची जागा उपलब्ध असल्यास प्रशासनाने मा. महासभेमध्ये प्रस्तावित करुन मान्यताप्राप्त करावे व नामकरण झालेल्या प्रत्येक रस्त्याला दिशादर्शक / नो एन्ट्री, नो पार्कींग, वन-वे व इतर आवश्यक फलक ठिकठिकाणी शहरामध्ये लावण्यात यावेत, असा मी ठराव मांडत आहे.

**सूचक : श्री. जूबेर इनामदार**

**अनुमोदक :**
श्री. ध्रुवकिशोर पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**महापौर**
**सौ. कॅटलीन परेरा**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

५०

८९

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२०१३

**प्रकरण क्र. ५०** :- श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांना महानगरपालिका सेवेतून कमी/बडतर्फ करणेबाबत...

**ठराव क्र. ५८ :-**

सहाय्यक नगररचनाकार श्री. भारत जगताप यांची कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आस्था/४४०/२९८८/२००३-०४ दि.११/०७/२००३ रोजीच्या आदेशांन्वये सरळ सेवा निवडीद्वारे सहाय्यक तथा बिल्डिंग इन्स्पेक्टर या पदावर नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था/१५२३/१८२०/२००६-०७ दि.०२/१२/२००६ अन्वये श्री. भारत जगताप यांना सहाय्यक नगररचनाकार या पदावर पदोन्नती देण्यात आली.

सहाय्यक तथा बिल्डिंग इन्स्पेक्टर या पदावर सरळ सेवेने नियुक्ती होण्यासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक अर्हता ही महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील ३ वर्षाची पदवीका/पदवी उत्तीर्ण आवश्यक होती आणि त्या पृष्ठर्थ श्री. भारत जगताप यांनी ३ वर्षाची पदवीका उत्तीर्ण झाल्याबाबत गुणपत्रिकेची छायांकित प्रत सादर केली होती.

दि.०५/०५/२००३ रोजीच्या मुलाखतीच्या पत्रामध्ये मुद्दा क्र.२ अन्वये शैक्षणिक पात्रतेबाबत मूळ दाखला आणणेबाबत नमूद करण्यात आलेले आहे आणि तसेच दि.११/०७/२००३ रोजीच्या नियुक्ती आदेशातील अट क्र.३ अन्वये शैक्षणिक अर्हतेची मूळ प्रमाणपत्रे दाखल करण्याचे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानंतर श्री. भारत जगताप यांना दि.२८/०१/२०१० रोजीच्या पत्रांन्वये कागदपत्र/प्रमाणपत्राच्या मूळप्रती मागणी करण्यात आली होती असे दि.०१/०२/२०१० रोजीच्या श्री. भारत जगताप यांचे प्राप्त लेखी निवेदनावरुन दिसून येते.

शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना दि.०६/०६/२०१२ रोजीच्या लेखी पत्राद्वारे लेखी कळविण्यात आले होते, परंतु कार्यरत १५ अधिकारी/कर्मचारी यांच्यापैकी श्री. भारत जगताप यांचे वगळता इतर १४ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा शैक्षणिक अर्हता पडताळणी अहवाल प्राप्त झालेला आहे.

सबब, श्री. भारत जगताप यांना कार्यालयीन नोटीस क्र. मनपा/आस्था/११२६/२०१२-१३ दि.१२/१२/२०१२ अन्वये शैक्षणिक अर्हता मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र ७ दिवसाचे आत दाखल करणेबाबत लेखी कळविण्यात आलेले आहे. अन्यथा आपले दि.११/०७/२००३ रोजीचे मूळ नियुक्तीचे आदेश रद्द करुन सेवेतून कमी करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. तरी सुद्धा श्री. भारत जगताप यांनी शैक्षणिक अर्हता मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र दाखल केलेले नाहीत.

सर जे.जे. रुग्णालय, मुंबई वैद्यकीय मंडळाचे दि.२०/१२/२०१२ रोजीच्या प्रमाणपत्रानुसार श्री.भारत जगताप हे पुढील सेवा करणेस पुर्णपणे व कायमस्वरुपी अपात्र असल्याचे कळविले आहे.

[सबब, श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांची सहाय्यक तथा बिल्डिंग इनस्पेक्टर या पदावर दि.११/०७/२००३ रोजीच्या आदेशान्वये केलेली नियुक्ती रद्द करुन कार्यालयाचे क्रं.मनपा/आस्था/१२०७/२०१२-१३ दि.२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशान्वये श्री. भारत जगताप यांना महानगरपालिका सेवेतून तात्काळ बडतर्फ/सेवेतून कमी करण्यात आले आहे.]

श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांची वेतनश्रेणी ही सहाय्यक आयुक्त पदाच्या वेतन श्रेणीशी समान असल्यामुळे नियुक्ती प्राधिकरण म्हणून मा. सर्वसाधारण महासभेची आवश्यकता आहे.

तरी वर नमूद केलेल्या कारणास्तव श्री. भारत जगताप यांना सेवेतून कमी करणे/बडतर्फ करणे दि.२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशानुसार केलेल्या कारवाईस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटिल

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम केला आहे.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२०१३

**प्रकरण क्र. ५७** :- राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानरगपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत...

**ठराव क्र.५९** :-

नागरी पोलीस ठाण्यासाठी मंजूर व निर्माण करण्यात येणाऱ्या पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्त्याचा खर्च शासनाकडे आगाऊ जमा करणेबाबत शासनाचे प्रारुप मसुदा ठरावामध्ये नमुद करण्यात आले आहे. तरी वेतन व भत्त्यावर दरमहा ढोबळ व अंदाजे किती खर्च अपेक्षीत आहे. याची परिगनणा करुन तसेच नियुक्त करण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कामकाजावर महानगरपालिकेचे प्रशासकीय नियंत्रणावर शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात यावे. तद्नंतर सदरचा विषय मा. महासभेस फेर सादर करण्यात यावा.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा बुधवार दि. २०/०२/२०१३

**दुःखवटा ठराव क्र. ६० :-**

मिरा भाईंदर शहरातील नगरसेविका श्रीम. वंदना मंगेश पाटील तसेच शिक्षण समिती सदस्य श्री. मंगेश पाटील यांचे वडील श्री. आत्माराम भाऊराव पाटील, नगरसेवक श्री. शरद केशव पाटील यांच्या मातोश्री श्रीम. मथुरा केशव पाटील व भाईंदर सेकंडरी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. प्रेमा शंकर चित्रा१मॅडम यांचे निधन झालेले आहे. तरी हे सभागृह त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी असून त्यांच्या आत्म्यास चिरःशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

तसेच परहित सेवा संघ ट्रस्टचे ट्रस्टी श्री. रामगोपाल शर्मा यांचेही दुःखद निधन झालेले आहे व माजी विधानसभा अध्यक्ष, शिवसेनेचे जेष्ठ नेते श्री. दत्ताजी नलावडे यांचाही स्वर्गवास झालेला असून त्यांच्या आत्म्यास चिरःशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना करत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील. अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी.

ठराव सर्वानुमते मंजुर

ठराव वाचून कायम करण्यात आला.

पिठासिन अधिकारी,

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२०१३

**प्रकरण क्र. ५२ :-** दि. १५/०१/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६७ :-**

दि. १५/०१/२०१३ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटिल

अनुमोदन :- श्री जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. २०/०३/२०१३

## मा. महापौरांचे निर्देश

द इलेक्ट्रीसिटी ॲक्ट २००३ च्या कलम ४३ नुसार जर एखाद्या व्यक्तीने व्यक्ती स्वतःच्या मालकी जमिनीत अथवा झोपडपट्ट्यांमधील बांधलेल्या स्वतःच्या घरांमध्ये जर कोणी विजेची मागणी केली तर एका महिन्यामध्ये वीजेची पूर्तता करुन देणे बंधनकारक आहे आणि हा कायदा केंद्र शासनाने केलेला आहे. करिता ह्या कायदयानुसार मा. आयुक्तांनी कार्यवाही करावी.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

95

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

महासभा

ठराव दि.२०/०३/२०१३

**प्रकरण क्र.- ५३ महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण करणेकामी आलेल्या निविदा मंजुर बाबत.**

**ठराव क्र.** — ६२

महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याबाबत वर्तमान पत्रामध्ये ऑन लाईन जाहिरातीनुसार एकुण सहा निविदा आल्या आहेत.

तरी बालाजी प्रसार ॲण्ड समाजकल्याण संस्था यांचे दर कमी आहेत पण बालाजी प्रसार ॲण्ड समाजकल्याण संस्थेच्या अध्यक्ष्या व वैभवलक्ष्मी महिला व बालके विकास गटाच्या अध्यक्षा या स्नेहल पवार आहेत. शिक्षण विभागाने वैभवलक्ष्मी महिला व बालके विकास गटाला काळया यादीत टाकलेले आहे. तसेच त्याच्या कामाबद्दल बऱ्याचश्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्या अन्वये सदर बालाजी प्रसार ॲण्ड समाजकल्याण संस्थेच्या निविदा फेटाळण्यात येत आहे.

तरी शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००५ प्र.क्र.१५६/०५/नवि२० दिनांक ३० डिसेंबर २००६ मंत्रालय मुंबई याअन्वये मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी शासकिय व अशासकिय संस्थामार्फत प्रशिक्षण देण्याचे नमुद आहे.

तसेच यापुढे महिला व बालकल्याण समिती अंतर्गत पुढीलप्रमाणे प्रशिक्षणासाठी ब्युटीपार्लर,टायपिंग, शिवणकाम, वाहनचालक प्रशिक्षण (महिला/पुरुष), एम.एस.सी.आय.टी. (MS-CIT) इत्यादी प्रशिक्षण देणेबाबतचा दोन वर्षाचा अनुभव असलेल्या शासकिय व निमशासकिय मान्यताप्राप्त संस्थेमार्फत कागदपत्रासह अर्ज मागविण्यास व महिला बालकल्याण समितीच्या स्तरावर कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक — श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन — श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

F:\pravina\Mahila Bal Kalyan Vibhag\Tharav\E.doc

आयुक्त दालन
आवक क्र.: C32
दिनांक: 12/02/06

उप आयुक्त (मु.)
आवक क्र.: 2083
दिनांक: 14/02/07.

**महानगरपालिका व नगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती यामध्ये महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना**

# महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५/प्र.क्र.१५६/०५/नवि-२०**

**मंत्रालय, मुंबई ४०००३२.**

**दि. ३० डिसेंबर, २००६**

**वाचा :** १) शासन पत्र क्र.जीईएन-१०९३/३२५/प्र.क्र.२४/नवि-३२, दि. १७ एप्रिल. १९९३.
२) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र जीईएन-१०९३/११९८/नवि-१४, दि. १४ जुलै, १९९३.

**प्रस्तावना :-** शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम,१९६५ मधील कलम ६२, ६३, व ६५ मध्ये सन १९९२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीमुळे प्रत्येक "अ" व "ब" वर्ग नगरपरिषदेने महिला व बालकल्याण समितीची स्थापना करावी, असे बंधन घालण्यात आले. तसेच "क" वर्ग नगरपरिषदांना या समितीची स्थापना करता येईल, अशी तरतूद कलम ६५ मध्ये करण्यात आली. या समितीने करावयाची कामे क्रमांक जीईएन /३२५/प्र.क्र.२४/३२,दिनांक १७.४.९३ अन्वये परिपत्रकात प्रस्तुत करण्यात आली आहेत. सदर परिपत्रकीय पत्रातील कामाची यादी सूचक असून परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही. त्यामध्ये कालमानानुसार बदललेली परिस्थिती, स्थानिक गरजा लक्षात घेवून यादीमध्ये बदल करणे, वाढ करणे, वगळणे आवश्यक ठरणार आहे आणि महिला व बालके यांच्या कल्याणासाठी योजना राबविणे हे मुख्य ध्येय व धोरण लक्षात घेऊन यादीत आवश्यक फेरबदल करण्यास नगरपालिका सक्षम असतील असे दिनांक १४ जुलै १९९३ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. महिला व बालकल्याण कार्यक्रमामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना/कार्यक्रमांमध्ये बदल/सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिला व बालकल्याण समितीने नव्याने खालील योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय : -** राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद/ नगरपंचायती यामध्ये महिलांच्या विविध योजना राबविण्याकरिता महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन पत्र व शासन निर्णयान्वये सर्व महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायती यांना कळविण्यात आले होते. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना/ कार्यक्रम कालबाह्य झाल्यामुळे त्यामध्ये बदल / सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बहुतेक महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती मध्ये अशा योजनांसाठी अत्यल्प तरतुद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रितीने अंमलबजावणी होत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायती क्षेत्रात महिला व बालकल्याण समित्यांनी खालील योजना राबविण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

**१) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण -** शासकिय किंवा अशासकिय संस्थांमार्फत काही तांत्रिक / व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. अशा संस्थामधून खालील प्रकारच्या प्रशिक्षणासाठी योजना राबवाव्यात. उदा. व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, पब्लिक स्पिकींग, आत्मविश्वास निर्माण, बालवाडी शिक्षिका, गवंडी , सुतारकाम , प्लंबर प्रशिक्षण, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती ( टी.व्ही., रेडीओ, मिक्सर, इस्त्री, टोस्टर इ., मोबाईल दुरुस्ती, संगणक दुरुस्ती, म्युझिक सिस्टम दुरुस्ती) वाहन दुरुस्ती, शिलाई काम, एम्ब्राईडरी, मसाल्याचे पदार्थ व इ. खाद्य प्रदार्थ तयार करणे, सौंदर्य प्रसाधनांचे प्रशिक्षण , केटरींग, बेकींग विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, घरगुती कामकाजाचे प्रशिक्षण ( Full time domestic help), शासकिय व अशासकिय नोकरीसाठी प्रशिक्षण उदा. महिला हवालदार, ड्रायव्हर व कंडक्टर, विमा एजंट, रिसेप्शनिस्ट, लघुलेखन/टंकलेखन, सेल्स गर्ल, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, वृध्दांची देखभाल, लहान मुलांची देखभाल, फिजीओथेरेपी प्रशिक्षण, पॅकेजिंग, फुड प्रोसेसिंग, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, कचऱ्यापासून खत निर्मिती, गांडूळ खत, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन, शोभिवंत फुलझाडांची लागवड व विक्री, औषधी वनस्पतींचे उत्पादन इ., १४ वर्षे वय किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या मुलींना व शाळेतून गळती झालेल्या मुलींना अशा व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी सदर योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रति लाभार्थी रु.५०००/- पर्यंत प्रशिक्षणाचे शुल्क ( Fees) भरण्यांची तरतुद राहील. प्रशिक्षण शुल्काच्या रकमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्याने स्वतः भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा असावा. शुल्क भरण्याचे नियम व प्रक्रिया संबंधित महानगरपालिका / नगरपारिषद / नगरपंचायती यांनी ठरवावी.

**२) लहान मुलांसाठी पाळणाघर चालविणे /पाळणाघर चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना आर्थिक मदत करणे वा साहित्य पुरविणे** - काही नागरी क्षेत्रात बालवाडया चालविण्यात येतात. परंतु बहुतेक ठिकाणी सहा महिने ते तीन वर्षे या वयोगटातील मुलांची काळजी घेण्यासाठी पाळणाघर उपलब्ध नसते. नोकरी करणाऱ्या माता, झोपडपट्टीतील कामावर जाणाऱ्या मातांच्या सोईसाठी तसेच त्यांच्या अनुपस्थितीत लहान मुलांची काळजी घेण्यासाठी व त्यांना योग्य आहार मिळण्यासाठी सदर योजना प्रस्तावित आहे. मुलांची काळजी घेणाऱ्या आया यांचे मानधन व लहान मुलांच्या आहारावर ( उदा. दूध, केळी, अंडी ) या योजनेतून खर्च करण्यात यावा. शक्यतो या योजनेतून जागेच्या भाडयावर खर्च करण्यात येऊ नये. किमान पाच मुलांसाठी एक आया असावी. पाळणाघर किमान तीन तास दररोज चालविण्यात यावे. मुलांच्या आहारावर प्रत्येकी रु .२ ते ४ प्रति दिन प्रति मूल खर्च करण्यात यावा. पाळणाघरात स्वच्छ शौचालय असावे. दूध व आहार शिजविण्याची व्यवस्था असावी. मुलांना खेळण्यासाठी पुरेशी जागा असावी. आयांचे मानधन स्थानिक दराप्रमाणे परंतु जास्तीत जास्त रु.१०००/- दरमहा ठरविण्यात यावे.

३) **बालवाडीतील महिला लोकप्रतिनिधींसाठी कामकाजाबद्दल व योजनेबद्दल प्रशिक्षण सहल आयोजित करणे** महानगरपालिका/ नगरपारिषद / नगरपंचायती क्षेत्रातून निवडून आलेल्या महिला नगरसेविकांना महिला व बालकांच्या योजनांच्या अभ्यासासाठी प्रशिक्षण सहल आयोजित करण्यात यावी.शक्य तो ज्या ठिकाणी चांगल्या योजना राबविण्यात येत आहेत त्या क्षेत्रास भेट देण्यात यावी. तसेच पंचायत राज संस्थांच्या कामकाजाबद्दल , महिला लोकप्रतिनिधींच्या अधिकार व कर्तव्याबद्दल, विविध

६ ३ ९८

शासकिय योजना, कार्यालयीन कामकाज इ. बद्दल प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. या योजनेवर प्रति लाभार्थी दरमहा जास्तीत जास्त रु.२०००/- खर्च करण्यात यावा.

४) **दारिद्रय रेषेखालील मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण थांबविण्यासाठी प्रोत्साहन अनुदान** - इ. ८ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या दारिद्रय रेषेखालील किंवा झोपडपट्टीतील मुलींना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान/ दैनिक भत्ता देण्यात यावा. महानगरपालिका/ नगरपालिका /नगरपंचायती यांनी त्यांच्या स्वत:च्या आर्थिक परिस्थितीनुसार सदर रक्कम ठरवावी.

५) **इयत्ता १० ते १२ वी च्या परिक्षेत नगरपालिका/महानगरपालिका हद्दीतील मुलींमध्ये सर्वा जास्त गुण मिळालेल्या विद्यार्थीनींचा गौरव करणे.**

६) **मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरीक विकासासाठी प्रशिक्षण योजना** - या योजनेमध्ये मुलींना कुंफू-कराटे, योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे. कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिक दृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. योजनेतून प्रशिक्षकाच्या मानधनावर साधारणपणे प्रति लाभार्थी दरमहा रु. ३०० पर्यंत खर्च करण्यात यावा. स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर दर स्थानिक दरांच्या तुलनेत ठरविण्यात यावेत. उदा. जर एखादया नगरपरिषदेत रु.३००/- प्रति लाभार्थी दरमहा असे दर ठरविण्यात आले व जर एखादया ज्युडो प्रशिक्षकाने आठ मुलींच्या गटाला प्रशिक्षण दिले, तर त्या प्रशिक्षकाला प्रति लाभार्थी रु.३००/- प्रमाणे ३०० x ८ मुली = रु.२४००/- दरमहा मानधन प्राप्त होईल. प्रशिक्षण सत्र किमान तीन महिन्यांचे असावे व ते स्थानिक शाळा व महाविद्यालये यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात यावे.

७) **महिलांसाठी योगा व प्राणायामचे प्रशिक्षण-** गरीब महिलांसाठी मोफत प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षकाच्या मानधनावर प्रति लाभार्थी रु.३००/- दरमहा खर्चाची मर्यादा ठेवण्यात यावी. मात्र जागेची व्यवस्था स्वत: करावी.

८) **मुलींच्या शाळेत विविध क्रिडा सुविधा निर्माण करणे** - मुलींना शाळेत जास्तीत जास्त खेळाचे साहित्य उपलब्ध व्हावे यादृष्टीने व्हॉली बॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस इ. चे मैदान (कोर्ट ) तयार करणे . नेटस्/ टेबलांची सुविधा पुरविणे, रॅकेटस् व बॉल खरेदी करणे. या योजनेवर संबंधित महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायती यांनी स्वत:च्या आर्थिक परिस्थितीनुसार खर्च करावा.

९) **बालोद्याने व महिलांसाठी क्रीडा केंद्रे उभारावीत.**

१०) **महिला व मुलांसाठी विवि स्पर्धाचे आयोजन करणे व त्याद्वारे त्यांच्या कलागुणांनी प्रोत्साहन देणे**

११) **गरजू महिलांसाठी वसतीगृहे** - ज्या महिलांना काही घरगुती अडचणींमुळे तातडीने, तात्पुरत्या स्वरुपात किंवा काही कालावधीसाठी आश्रयाची गरज आहे, अशा महिलांची तातडीची गरज पूर्ण करण्यासाठी सदर योजना राबविण्यात यावी. या योजनेतील सर्वसाधारण रहिवाशी क्षेत्रात किंवा एखादया घरातही सदर वसतीगृह चालविले जाऊ शकते. उदा. एखादया घरात तीन शयनकक्ष ( Bedroom) असल्यास तेथे सहा महिलांसाठी वसतीगृह चालविले जाऊ शकते. सदर वसतीगृहात स्वतंत्र स्वच्छतागृह व स्वयंपाकघर असणे आवश्यक आहे. महिलांबरोबर त्यांची लहान मुलेही राहू शकतील. महिलांनी त्यांच्या

मुलींसाठी किंवा गळती झालेल्या मुलींसाठी दर आठवडयाला एक वर्ग ( तसेच मुलांसाठी स्वतंत्र वर्ग ) भरविण्यात यावेत. प्रत्येक वर्ग १ ते २ तासाचा असावा. बाहेरील तज्ञांना व डॉक्टरांना, मनोवैज्ञानिकांना सदर सत्र घेण्यासाठी निमंत्रीत करण्यात यावे त्यांना प्रत्येक सत्रासाठी साधारणपणे रु.२०० ते ४०० मानधन देण्यात यावे.

या प्रशिक्षणात मुलींसाठी साधारणतः खालील बाबींचा समावेश असावा.

अ) स्त्रियांच्या मासिक पाळीचे शास्त्र व उद्देश.

ब) मासिक पाळीच्या काळात आरोग्यविषयक घ्यावयाच्या काळजीची आवश्यकता.

क) मासिक पाळीसंदर्भातील गैरसमज. उदा. मासिक पाळीच्या काळात स्त्रिया अशुध्द असतात आणि त्यांना इतरांपासून व स्वयंपाक घरापासून वेगळे ठेवणे.

ड) गर्भधारणेचे शास्त्र, सर्वसाधारण कुटुंब नियोजनाची साधने.

इ) बालविवाहामुळे आरोग्यास होणारे दुष्परिणाम.

फ) लैंगिक छळ, त्यापासून स्वसंरक्षण कसे करावे, कोणाची मदत घ्यावी. अशा परिस्थितीत हेल्पलाईनचा उपयोग करणे.

व) एड्स नियंत्रण.

या संदर्भात युनिसेफने तसेच मुंबई महानगरपालिकेने चांगले मार्गदर्शक पुस्तक प्रसिध्द केले आहे ,त्याच प्रकारच्या पुस्तिका तयार करुन वापरणे.

मुलांसाठी स्वतंत्र विषय निश्चित करावे. उदा. शरीर शास्त्र, विकास, एड्स, मुली/ स्त्रियांबरोबर कसे वागावे, लैंगिक रोगांबद्दल गैरसमज व अंधश्रध्दा इ.

**१६) महिला व मुलांचे आरोग्य तपासण्यासाठी वेळोवेळी आरोग्य शिबीर आयोजित करणे.**

**१७) मागासवर्गातील प्रभागात व झोपडपट्टीमध्ये विशेष स्वच्छता अभियान राबविणे.**

**१८) नगरपरिषदेच्या आणि महानगरपालिकेच्या शाळेच्या आवारात प्रसाधनगृहे बांधणे**

**१९) नगरपालिका जर प्रसूतीगृह व बालवाडया चालवित असतील तर त्यांचे कार्यान्वियन व पोष्टीक आहार पुरविणे. त्यांना मोफत गणवेश व पुस्तके पुरविणे**

**२०) महिला स्वयंसेवी संस्थांनी समाजाच्या हिताच्या दृष्टीने पाठविलेल्या संस्थांना आर्थिक मदत करणे.**

**२१) शहरांमधील ज्या महिलांनी एखादया क्षेत्रात उत्कृष्ट काम केले असल्यास त्यांचा गौरव करणे.**

**२२) सुवर्ण जयंती शहरी स्वयंरोजगार योजनेअंतर्गत येणारी कामे**

**२३) महिलांना कायदेशीर/ विधीविषयक सल्ला देणे** - बहुतेक मुलींना व महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांबद्दल माहिती नसते तसेच महिलांसंबंधी विविध कायदयांची कल्पना नसते. विशेषतः हुंडाविषयक कायदे, स्त्रीधन, मालमत्ता अधिकार, वारसा हक्क, लग्न, घटस्फोट, पोटगीविषयक कायदे, बलात्कार विषयक कायदयातील तरतुदी , लग्नानतरचे अधिकार; त्यामुळे सदर विषयावर महाविद्यालय व इतर ठिकाणी मुली व महिलांसाठी लेक्चर ठेवण्यात यावे व यासाठी महिला वकिलांची नेमणूक करावी व त्यांना योजनेतून मानधन देण्यात यावे ( रु. २०० ते ४०० प्रति लेक्चर या आर्थिक मर्यादेपर्यंत )

पृ-५
100



२४) महिला स्वयंसेवी संस्थांनी समाजाच्या हिताच्या दृष्टीने पाठविलेल्या संस्थानां आर्थिक मदत करणे

२५) महिला व बालकांसाठी खास वाचनालय सुरु करणे

२६) महिलांसाठी सांस्कृतिक सभागृह बांधणे.

२७) सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी प्रसाधनगृहे बांधणे

२८) पोलिओग्रस्त मुलांना अत्यावश्यक साहित्य पुरविणे

२९) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील महिला व १० वर्षाच्या आतील मुले यांच्यामध्ये दृष्टीदोष असल्यास उपचारासाठी आर्थिक मदत करणे व मोफत चष्मे पुरविणे.

उपरोक्त योजनांपैकी उपयुक्त योजना निवडण्याचा अधिकार महिला व बालकल्याण समितीला राहील. मात्र **वर्ष अखेरीस वस्तूंची खरेदी व वाटप करण्याच्या योजनेवर भर न देता वर्षभर चालू राहतील अशा प्रशिक्षणाशी संबंधीत योजनांच्याच अंमलबजावणीवर भर देण्यात यावा.**

शासनाने मान्य केलेल्या वरील योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करुन राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकाच्या आयुक्तांना रहातील. तथापि नगरपरिषद/ नगरपंचायती यांचे मुख्याधिकाऱ्यांना वरील शासनमान्य योजनांपैकी फक्त रु. १० लाख प्रति योजना या आर्थिक मर्यादेपर्यंत योजनेस मान्यता देणे व योजना राबविण्याचे अधिकार रहातील. रु. १० लाखाच्या वर एखादया योजनेची आर्थिक मर्यादा येत असल्यास त्यासाठी आयुक्त, महिला व बालविकास , पुणे यांची मान्यता घेण्यात यावी. मान्य योजनेपैकी कोणतीही रु.१० लाखाच्या आतील योजना राबविण्याचे अधिकार मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती यांना रहातील. मात्र वरील मान्य केलेल्या योजनांव्यतिरिक्त एखादी नवीन योजना घ्यावयाची असेल किंवा विद्यमान योजनेच्या नियम व अटींमध्ये बदल करावयाचे असल्यास त्यांनी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. योजनेच्या अंमलबजावणी व नियत्रणासाठी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे हे नियंत्रण अधिकारी असतील व जिल्हास्तरावर जिल्हा व महिला बालविकास अधिकारी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

महानगरपालिका, आयुक्त / नगरपालिका/नगरपंचायती मुख्याधिकारी यांनी प्रत्येक वर्षाच्या सुरवातीपासूनच योजना राबविण्याचा कार्यक्रम तयार करण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

मो. कृ. पुराडउपाध्ये

**( मो. कृ पुराडउपाध्ये )**
**उपसचिव ,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
सचिव,महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
आयुक्त तथा संचालक,नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी,मुंबई - २५

H 1637 (800-1-07) 3

७)

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगरपालिका प्रशासन (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती (सर्व)
विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती, नवि-२०

H 1837 3

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. ~~स्थायी समिती सभा~~ दि. २०/०३/२०१३
महासभा

**प्रकरण क्रमांक ( ५४ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतागृहाचे संचलन, देखभाल व दुरूस्ती करणाऱ्या वस्ती पातळीवरील संस्था (सीबीओ) व महानगरपालिकेने नियुक्त केलेले ठेकेदार यांना ठराविक रक्कम अदा करणेस मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ( ६३ ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जी स्वच्छतागृहे एम.एम.आर.डी.ए च्या निधितून बांधण्यात आलेली आहेत. अशी स्वच्छतागृहाची उर्वरीत कामे व दुरुस्ती कामे संबंधित ठेकेदाराकडून एका महिन्यात पूर्ण करुन घेण्यात यावीत. तद्नंतर त्यांचे देयके प्रदान करण्यात यावीत. जर ठेकेदारांनी एका महिन्याच्या आत स्वखर्चाने स्वच्छता गृहाची दुरुस्ती न केल्यास त्यांच्या रक्कमेतून मनपा मार्फत सदर दुरुस्ती कामे करुन घेण्यात यावीत. दुरुस्ती कामे पूर्ण होईपर्यंत सदर ठेकेदारांना देयक प्रदान करु नये. ज्या झोपडपट्टीत मनपाची स्वतः ची शौचालये आहेत त्याची साफसफाई करणाऱ्या संस्थाना देखिल अनुदान देण्यात यावे. निर्मल अभियान व इतर स्वच्छतागृहाचे देखभाल व दुरुस्ती करीता सदर संस्थानी रु. ३५/- प्रति कुटुंब दर आकारावेत. मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०१३ ठराव क्र. ३९ नुसार कार्यवाही करण्यास ही सभा अंतिम मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

~~सभापती~~
~~स्थायी समिती~~
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC3/ 12-13/DK/ ST/31

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०३/२०१३

**प्रकरण क्र.५५ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ)अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)**

**ठराव क्र.६४:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या हद्दीत प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे व लोकप्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या लोकाभिमुख ध्येय धोरणानुसार प्रभागांचा विकास व्हावा म्हणून महानगरपालिकेने उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

कलम २९(अ) अन्वये प्रभाग समित्यांची रचना करणेविषयी असलेल्या तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८.१४ लाख असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. सदर प्रभाग समिती रचना प्रस्तावित करताना प्रामुख्याने भौगोलिक रचना, नैसर्गिक हद्दी, मुख्य रस्ते ह्यांचा विचार करुन करण्यात आल्या आहेत. मिरा भाईंदर शहराचे पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवेमुळे दोन भागात विभाजन झालेले आहे. भाईंदर (प.) भागात दोन प्रभाग समित्या व भाईंदर (पू.) व मिरारोड भागातील भौगोलिक क्षेत्र व नैसर्गिक हद्द यांचा विचार करुन चार प्रभाग समित्यांची रचना प्रस्तावित करण्यात आलेली आहे. निवडणूक प्रभागाची हद्द आणि क्षेत्र संलग्नता विचारात घेऊन खालील प्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) १ | १, २३, २४, २५, २६, २७, २८ | ७ |
| २ | भाईंदर (प.) २ | २, १८, १९, २०, २१, २२, २९ | ७ |
| ३ | भाईंदर (पू.) ३ | ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १२ | ८ |
| ४ | भाईंदर (पू.) ४ | १०, ११, १३, १४, १५, १६, १७, | ७ |
| ५ | मिरारोड (पू.) ५ | ३०, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९ | ९ |
| ६ | मिरारोड (पू.) ६ | ३१, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७ | ९ |
| **एकूण** | **६** | **४७** | **४७** |

वरील प्रमाणे प्रभाग समित्यांच्या भौगोलिक रचनेस ही मा. महासभा मान्यता देत आहे.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदक :-** श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

106

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ५६ )** :- भाईंदर (पश्चिम) नेहरूनगर, शास्त्रीनगर, गणेश देवलनगर, क्रांतीनगर भागात जाण्यासाठी १८.०० मीटर रूंदीचा रस्ता विकास आराखड्यात दर्शविणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्यास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ( ६५ ) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) येथे प्रभाग समिती क्र. १ कार्यालयामागे "शास्त्रीनगर" व "नेहरूनगर", "गणेशदेवल नगर" व "क्रांतीनगर" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वस्ता आहेत. सदर वस्त्याकडे जाण्यासाठी कॉंक्रीटच्या ३.०० मीटर रूंदीपर्यंतच्या पायवाटा आहे. सदर पायवाट अरुंद असल्याने तेथे तिन चाकी व चार चाकी वाहने जाऊ शकत नाही. त्यामुळे आजारी, वृध्द इत्यादी व्यक्तिंना तसेच स्थानिकांना लागणाऱ्या दैनंदिन वापराच्या साहित्यासह १ ते १.५० कि. मीटर पर्यंत चालत जावे लागते, त्यामुळे त्यांची गैरसोय होते.

सबब, भाईंदर (प.) मोतीनगर येथे चर्च मागून १८.०० मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यात येत आहे. सर्व्हे क्र. ३४२ (जुना सर्व्हे क्र. ७२२), सर्व्हे क्रमांक ३२८ (जुना सर्व्हे क्र. ७२३) सर्व्हे क्रमांक ३७८ (जुना सर्व्हे क्र. ७६४) या जागेतुन जाणारा सदर प्रस्तावित रस्ता विकास आराखड्यात दर्शविल्यास व आवश्यक प्रक्रिया पुर्ण करुन तयार केल्यास त्याभागातील रहिवाशांची गैरसोय दूर होणार आहे.

सबब सदर १८.०० मीटर रूंदीचा विकास रस्ता विकास आराखड्यात दर्शविण्यासाठी व मंजूर विकास योजनेची अंमलबजावणी सहजपणे व कालमर्यादेत होण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक असलेली सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतिम प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना देण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- अशोक तिवारी
श्री. अशोक तिवारी

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०३/२०१३

**प्रकरण क्र. ५७ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर रस्त्यालगत वापरात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्र. ६६ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास योजनेतील मौजे घोडबंदर, स.क्र. १८७/१,२पै.,८पै.,९, १९३/४१,४५पै. ही जागा नाविकास विभाग, (डोंगराळ भाग) ने सामाविष्ट असून ६०.०० मी. रुंद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने भागशः बाधीत होत आहे. प्राप्त सि.आर.झेड. नकाशानुसार प्रस्तावित जागा सि.आर.झेड. ने बाधीत होत नाही.

मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नाविकास क्षेत्रात वाणिज्य वापर व आय.टी. पार्क वापरासाठी तरतूद नाही. सदर जागेमध्ये वाणिज्य वापर / आय.टी. पार्कच्या बांधकामासाठी वाढीव चटईक्षेत्रासह परवानगी मिळणेबाबत मे. रचना डिझाईन कन्सलटंट यांचेमार्फत दि.१६/०१/२००८ अन्वये प्रस्ताव सादर केलेला होता. तथापि, मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत वाणिज्य वापर व आय.टी. पार्क वापर वाढीव चटईक्षेत्रासह अनुज्ञेय नसल्याने सदरचा प्रस्ताव मा. शासनाची मान्यता / मार्गदर्शन मिळणेसाठी पत्र क्र. मनपा/नर/४४०१/२००७-०८, दि.२७/०२/२००८ अन्वये सादर केलेला होता. तथापि, मा. शासनाने सदरचा प्रस्ताव पत्र क्र. टिपीएस-१२०८/४६९/प्र.क्र.३/०९/नवि-१२, दि.३०/०१/२००९ अन्वये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे अर्जदारांची विनंती मान्य करता येणार नाही. मात्र परिसरातील विकास क्षमतेनुसार महानगरपालिकेस विभाग बदलाबाबत कार्यवाही केल्यास निर्णय घेता येईल, असे कळविलेले आहे.

**प्रस्तावित जागेचे ७/१२ उतान्यानुसार खालील प्रमाणे क्षेत्र आहे.**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | ७/१२ धारक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | १८७/१ | मे. थायो फार्मा व कमलाबाई कैलास दाधिया | ५१०.०० |
| २ | १९३/४५ | मे. थायो फार्मा व कमलाबाई कैलास दाधिया | १५२.०० |
| ३ | १९३/४१ | मे. थायो फार्मा व कमलाबाई कैलास दाधिया | १११६.०० |
| ४ | १८७/२अ | जॉन बावनीस कैसर नरीस | ३८०.०० |
| ५ | १८७/२ब | थायो फार्मा चे भागीदार | ६८०.०० |
| ६ | १८७/८अे | थायो फार्मा चे भागीदार | ५७०.०० |
| ७ | १८७/९अ | थायो फार्मा चे भागीदार | ३९०.०० |
| ८ | १९३/४५क | नॅशनल हायवे | ३००.०० |
| ९ | १८७/८ब | नॅशनल हायवे | ५४०.०० |

वरील प्रमाणे ४६३८ चौ. साठी जागा प्रस्तावित केलेली असून त्यापैकी ८४०.०० चौ. मी. जागा ७/१२ उतान्यावर **"नॅशनल हायवे"** नोंद आहे. उर्वरित ३७९८.०० चौ.मी. खाजगी मालकीची आहे.

मे. थायो फार्मा, मुंबई यांनी दि.१०/०३/२०११ अन्वयेच्या पत्रान्वये मा. शासनाच्या निर्देशानुसार सदर जागेबाबत महानगरपालिकेने पुढील कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे. तद्अनुषंगाने सदरच्या विषयास मा. महासभेने प्रकरण क्र. २७, ठराव क्र. २८, दि.३०/०५/२०११ (दि.०३/०९/२०१२) अन्वये मंजूरी दिलेली आहे.

तद्अनुषंगाने प्रस्तावित फेरबदलाबाबत हरकती वजा सूचना मागविणेकरिता अधिसूचना दैनिक लोकसत्ता (मराठी) व दैनिक फ्रि प्रेस जरर्नल (इंग्रजी) या वृत्तपत्रात दि.१२/०९/२०१२ रोजी प्रसिध्द करणेत आली असून मा. राजपत्रात गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर ११-१७, २०१२ याप्रमाणे प्रसिध्द करणेत आलेली आहे. प्रसिध्द अधिसूचनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेस कोणतेही हरकत वजा सूचना प्राप्त झालेली नाही.

दि.३०/०५/२०११, ठराव क्र. २८, प्रकरण क्र. २७ नुसार वरीलप्रमाणेच्या फेरबदलाबाबत मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. सुचना हरकती निरंक आहेत. त्यामुळे प्रस्तावित फेरबदल प्रस्तावास ही महासभा अंतिम मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२०१३

**प्रकरण क्रमांक** ( ५८ ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत "जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र" या संबंधी धोरण निश्चित करणेबाबत.

ठराव क्रमांक ( ६७ ) :-

**१) विरंगुळा केंद्र :-**

विरंगुळा केंद्र म्हणजे मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या व ६० वर्षावरील वयोगटातील नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य विषयक हित जपले जावे यासाठी व दिवसाच्या ठराविक कालावधीसाठी वापरात आणण्यासाठी महानगरपालिका किंवा स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने निर्माण करण्यात आलेले वा येणारे केंद्र.

**२) विरंगुळा केंद्राचे बांधकाम :-**

**अ)** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदीनुसार विशेषतः "बगीचा" किंवा "करमणूकीची मैदाने" (आर.जी) यासाठी आरक्षित असलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेवर एकूण भूखंड क्षेत्राच्या तुलनेत १०% पेक्षा अधिक असणार नाही तथापी किमान ५०० चौ.फुट बांधकाम उपलब्ध होऊ शकेल अशा ठिकाणी विरंगुळा केंद्राचे बांधकाम करता येईल.

**ब)** सर्वसाधारणपणे दोन विरंगुळा केंद्रात किमान २ किमी अंतर असावे.

**३) विरंगुळा केंद्रात उपलब्ध करण्यात येणाऱ्या सोयी :-**

अ) विरंगुळा केंद्रामध्ये खालील गोष्टी उपलब्ध करुन देण्यात येतील.

| | |
|---|---|
| बैठे खेळ | : बुध्दिबळ -०२, कॅरम |
| मनोरंजनाकरीता | : दुरदर्शन संच -०१, वृत्तपत्रे -०३, |
| साहित्य | : कपाट (मोठे) -०१, सेमी एक्झिक्युटीव्ह खुर्ची -०१, टेबल -०१, प्लास्टीक खुर्ची -५०, |
| वैद्यकिय साहित्य | : वजन मोजणी यंत्र -०१, वाफ घेण्याचे इलेक्ट्रीक भांडे (Steamer) -०१, शेकण्याची इलेक्ट्रीक बॅग -०१ इ. साहित्य. |

ब) उद्यानातील पाणी व विद्युत जोडणीमधून विरंगुळा केंद्राकरीता पाणी जोडणी व विद्युत जोडणी देता येईल.

क) सदर विरंगुळा केंद्र सुरु ठेवण्याची वेळ सकाळी ७.०० ते १०.०० व संध्याकाळी ५.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत असेल. अपवादात्मक परिस्थितीत वेळेत फेरबदल करण्याचा अधिकार संबंधित संस्थेस राहील.

**४) विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी वितरीत करण्याची कार्यपध्दती :-**

अ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) व (इ) मधील तरतूदीनुसार महानगरपालिकेने विकसित केलेली विरंगुळा केंद्रे नोंदणीकृत ज्येष्ठ नागरिकांच्या स्थानिक संस्थाना जास्तीत जास्त तीन वर्षाच्या कालावधीकरीता देता येतील.

ब) सदर विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी देताना, विरंगुळा क्षेत्राच्या ५०० मीटर परीघात वास्तव्यास असणाऱ्या जेष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

क) सदरची कार्यवाही महानगरपालिकेच्या धोरणानुसार अर्ज मागवून करण्यात येईल.

ड) सदर विरंगुळा केंद्र वितरीत करण्याबाबत आयुक्तांचा अधिकार अंतिम असेल.

५) **विरंगुळा केंद्रांच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक अटी व शर्ती :-**

सदर विरंगुळा केंद्र व्यवस्थापनासाठी खालील प्रमाणे अटीशर्ती प्रस्तावित करण्यात येत असून त्याबाबत संबंधित संस्थाना रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक असेल.

१) विरंगुळा केंद्राचा व्यवस्थापन कालावधी, सदर केंद्र वितरीत केल्याच्या दिनांकापासून तीन वर्ष असेल.

२) विरंगुळा केंद्र व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेस सदर केंद्र इतर व्यक्ति/ संस्था/ आस्थापना इत्यादींना हस्तांतरीत करता येणार नाही.

३) विरंगुळा केंद्र हे केवळ ज्येष्ठ नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातून त्यांचे सामाजिक सांस्कृतिक, आरोग्य विषयक इत्यादी हित साधले जातील यासाठीच वापरणे अपेक्षित आहे. याव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी त्याचा वापर करावयाचा झाल्यास त्याबाबत आयुक्त यांची लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

४) सदर विरंगुळा केंद्रात परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना, कोणताही भेदभाव न करता प्राथम्याने प्रवेश असेल व सदर प्रवेश निशुल्क असेल.

५) विरंगुळा केंद्र इमारतीच्या संरचनेत (Structure) महानगरपालिकेच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही, जर संरचनेत काही बदल करण्यात आल्यास सदर विरंगुळा केंद्राचा व्यवस्थापन करारपत्र रद्द करून ते महानगरपालिका ताब्यात घेईल व इमारतीचे/केंद्राचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधीत व्यवस्थापन संस्थेकडून करुन घेण्यात येईल.

६) विरंगुळा केंद्राची देखभाल,देखरेख व संरक्षण खर्च व्यवस्थापन संस्थेने करणे आवश्यक असेल.

७) मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे विरंगुळा केंद्रात पुरविण्यात आलेले साहित्य व फर्निचर यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी व्यवस्थापन संस्थेची राहील.

८) व्यवस्थापक संस्थेला टिव्हिचे केबल कनेक्शन व त्याचे भाडे तसेच महापालिकेचे इतर चार्जेस, अन्य कर, सरकारी कर स्वतंत्रपणे अदा करावे लागतील व देयके अदा केल्याच्या पावतीची छायांकित प्रत वेळोवेळी महापालिकेस उपलब्ध करुन द्यावी लागेल.

९) विरंगुळा केंद्राकरीता संस्थेस महापालिकेकडून कोणतेही अनुदान, कर्मचारी इत्यादी उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. सदरच्या बाबी संस्थेने स्वखर्चाने उपलब्ध करावयाच्या आहेत.

१०) व्यवस्थापन संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेमध्ये सामावून घेतले जाणार नाही व तसा कोणताही हक्क सदर कर्मचाऱ्यांना असणार नाही. सदर कर्मचाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. त्यातून कोणतेही कायदेशीर, आर्थिक इत्यादी वाद निर्माण झाल्यास त्या संस्था स्वखर्चाने स्वतःच्या जबाबदारीवर दूर करेल. महानगरपालिकेला अशा वादाची झळ लागू देणार नाही.

११) विरंगुळा केंद्र इमारतीची महापालिकेस गरज भासल्यास संबंधीत संस्थेस सदरचे केंद्राची इमारत महापालिकेस तात्काळ उपलब्ध करुन द्यावी लागेल.

१२) दिलेल्या इमारतीच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ व सुशोभित ठेवावा लागेल.

१३) महापालिकेसोबत संबंधीत संस्थेने केलेल्या या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यास महानगरपालिका करारनाम्याची मुदत पूर्ण होण्यापूर्वी, अथवा महापालिकेस वाटेल त्या वेळी कोणतेही कारण न देता केव्हाही विरंगुळा केंद्राचा ताबा काढून घेता येईल.

१४) कोणत्याही कारणास्तव सदर केंद्राचे व्यवस्थापक सोडावयाचे झाल्यास त्याबाबत ३० दिवस अगोदर महापालिकेस लेखी कळवून जागा सुस्थितीत ताब्यात देणे आवश्यक असेल.

१५) विरंगुळा केंद्राची संपूर्ण मालकी महानगरपालिकेची राहील. या मालमत्तेवर महापालिके व्यतिरिक्त इतर कोणाचाही अधिकार राहणार नाही.

१६) सदर विरंगुळा केंद्रात व्यवस्थापन संस्थांव्दारे कोणत्याही कार्यक्रमाकरीता शुल्क, प्रवेश फी, इत्यादी जमा करीत असल्यास त्या कार्यक्रमासाठी महापालिकेमार्फत फी/शुल्क/भाडे आकारण्यात येईल व त्यासाठी संबंधित उप आयुक्त (मुख्यालय) यांची लेखी परवानगी आवश्यक असेल.

१७) सदर विरंगुळा केंद्रात मनोरंजनासाठी तसेच आरोग्य विषयक कार्यक्रमांचे आयोजन करता येईल.

१८) विरंगुळा केंद्राच्या बाबतीत कोणताही वाद झाल्यास आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

वरील प्रमाणे धोरण निश्चित करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC3/12-13/DK/S1-32

# मिरा भाईंदर महानगरपालिका

१६७/१५

## मा. महासभा दि. ३०/१२/२०११

**प्रकरण क्र. ८३ :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालमत्ता (समाज मंदिरे, हॉल, मैदाने, मंगल कार्यालय) भाड्याने देणेबाबत सुधारीत दरांना मान्यता देणे.

**ठराव क्र. ८७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची खालील प्रमाणे मालमत्ता आहे.

| अ. क्र. | मालमत्ता | सध्याचे दर | प्रस्तावित दर (प्रति दिन) | मा.महासभा दि.३०/१२/२०११ अन्वये मंजुर केलेले नवीन दर |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर – १६ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| २ | भाईंदर (पुर्व) खारीगाव हॉल – ०१ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल – ०१ | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १००००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. १५००/- प्रति दिन |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. ८/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट | रु. १०/- प्रति युनीट |
| | व्हीडीयो शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनीट | रु. ३००/- प्रति युनीट | रु. १००/- प्रति युनीट |
| | खुर्ची भाडे | रु. २.५०/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५.००/- प्रति नग |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. १५०/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. ५००/- | रु. ३००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. १०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय/महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/ स्नेह संमेलन | रु. १००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. १,०००/- प्रति दिन |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क (अन्य संस्था) | रु. १०/- प्रति युनीट<br>रु. १००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १०/- प्रति युनीट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति दिन | रु. १०/- प्रति युनीट<br>रु. १००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (नवघर शाळा/आरक्षण क्र. १७०) | | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा<br>ब) खाजगी संस्थाचे कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात)<br>क) पूजा / लग्न कार्यक्रम (सुट्टीच्या दिवसात) | रु. १००/- प्रति दिन (२०० मी. x २०० मी.<br>रु. १०००/- प्रति दिन<br>रु. ३०००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन<br>रु. ५०००/- प्रति दिन<br>रु. १००००/-प्रति दिन | रु. १००/- प्रति दिन (२०० मी. x २०० मी.<br>रु. १०००/- प्रति दिन<br>रु. ३०००/- प्रति दिन |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. २५०/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात. | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता)<br>ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव)<br>क) गेट /कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था)<br>ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. १.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ०.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. २५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. ३.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. १.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ८००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन | रु. १.००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ०.५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. २५०/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन<br>रु. ५००/- प्रति चौ.फुट/ प्रति दिन |

वरील प्रमाणे मा.महासभेने नवीन मंजुर केलेल्या दरास ही मा.महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- डॉ. आसिफ शेख** **अनुमोदन :- श्री. शरद पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | तिवारी दिव्या अशोक | १ | गोहिल शानु जोरावरसिंग | निरंक |
| २ | वैती नर्मदा यशवंत | २ | पाटील उमाताई शाम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | पाटील जयंत महादेव | ३ | नलावडे दिनेश दगडू | |
| ४ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ४ | वेतोस्कर राजेश शंकर | |
| ५ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५ | सुनिता कैलास पाटील | |
| ६ | पाटील मिलन गोविंदराव | ६ | पाटील प्रभात प्रकाश | |
| ७ | फॅरो ग्रिटा स्टीफन | ७ | सावळे निर्मला बाबुराव | |
| ८ | आसिफ गुलाब शेख | ८ | शशिकांत जगन्नाथ भोईर | |
| ९ | हेलन जॉर्जी गोविंद | ९ | सुनिता शशिकांत भोईर | |
| १० | बर्नड आल्बर्ट डिमेलो | १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | |
| ११ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | |
| १२ | प्रकाश पांडुरंग ठाकुर | १२ | सपार उमा विश्वनाथ | |
| १३ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | १३ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | |
| १४ | राजेंद्र भंवरलाल जैन | १४ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | |
| १५ | शर्मा भगवती तुगनचंद | १५ | मुंज वासुदेव भास्कर | |
| १६ | पाटील वंदना मंगेश | १६ | शेख नुर मोहम्मद अेहमद | |
| १७ | चक्रे वंदना रामदास | १७ | शफीक अहमद सादत खान | |
| १८ | माळी हेमा रविंद्र | १८ | प्रमोद जयराम सामंत | |
| १९ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | १९ | मर्लिन मर्विन डिसा | |
| २० | अनिता जयवंत पाटील | २० | विजया हेमचंद्र वैती | |
| २१ | टेरी पॉल परेरा | २१ | ठाकुर कल्पना हरीहर | |
| २२ | मेहता नरेंद्र लालचंद्र | २२ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | |
| २३ | वर्षा गिरधर भानुशाली | २३ | मोदी चंद्रकांत भिकालाल | |
| २४ | राजु यशवंत भोईर | २४ | भट दिप्ती शेखर | |
| २५ | जाधव मोहन महादेव | २५ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | |
| २६ | सिंह मदन उदितनारायण | २६ | अनिल दिवाकर सावंत | |
| २७ | म्हात्रे कल्पना महेश | २७ | शेख सलिम दाऊद | |
| २८ | पाटील शरद केशव | २८ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | |
| २९ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ३० | बाविघर सिसिलीया विजय | ३० | मिलन वसंत म्हात्रे | |
| ३१ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | ३१ | नयना गजानन म्हात्रे | |
| ३२ | पाडे स्नेहा शैलेश | | | |
| ३३ | दुबे रामनारायण सदानंद | | | |
| ३४ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३५ | पाटील प्रविण मोरेश्वर | | | |
| ३६ | पाटील अनंत रामचंद्र | | | |
| ३७ | पालांडे प्रशांत भगवंतराव | | | |
| ३८ | पाटील संध्या प्रफुल्ल | | | |
| ३९ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४० | व्यास सुधा वासुदेव | | | |
| ४१ | धनेश परशुराम पाटील | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२०/०३/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ५९ ):-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेची उर्वरीत मैदाने, उद्याने व लग्न कार्य हॉल मा. महासभेने ठरविलेल्या भाड्याने देणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक** ( ६८ )

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा दि. ३०/१२/२०११ ठराव क्र. ८७ अन्वये ठरावात नमूद केल्यानूसार समाजमंदिर, खारीगांव, विनायक नगर हॉल, नगरभवन मंगल कार्यालय, सुभाषचंद्र बोस मैदान, नवघर शाळा व मिरारोड हजरतआला मैदान, शाळा इमारतीमधील वर्ग मंजूर केलेल्या दरानूसार कार्यक्रमाकरीता भाड्याने उपलब्ध करून देण्यास मान्यता दिलेली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध भागात मैदाने असून भाईंदर (पूर्व) रामनगर येथील राष्ट्रसंत श्री परमसागर सुरीजी इमारत व मिरारोड (पूर्व) जांगीड इन्क्लेव्ह येथील कै. विलासराव दगडोजीराव देशमूख इमारतीमधील हॉल देखिल लग्न व इतर कार्याकरीता भाड्याने उपलब्ध करून द्यावयाचे आहेत.

तरी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने/ अ.क्र.६ नुसार तसेच हॉल लग्न कार्य व इतर कार्यक्रमाकरीता अ.क्र. ०४ नुसार मा. महासभा दि. ३०/१२/२०११ ठराव क्र. ८७ अन्वये ठरविलेल्या दरानूसार भाड्याने उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अ नूसार मैदानाच्या वापरा व्यतिरीक्त वापराकरीता वर्षातील जास्तीत जास्त ३० दिवसासाठी उपलब्ध करून देण्याबाबत बंधनाचे पालन करावे. लग्न कार्याकरीता कोणतीही मैदाने भाड्याने देण्यात येऊ नयेत. महानगरपालिका क्षेत्रातील पाणपोई बंद पडल्या असून अशा पाणपोई खाजगी संस्थानी स्वखर्चाने चालविण्याची मागणी केल्यास अशा पाणपोई सदर संस्थाना नामपात्र भाडयाने करारनामा करुन ५ वर्ष मुदतीसाठी देण्यास मा.आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**सुचक** :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदन** :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२०१३

**प्रकरण क्रमांक** ( ६० ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत वाहतुक नियंत्रण करणे कामी वाहतुक विभागाच्या मदतीसाठी महानगरपालिकेमार्फत ट्राफिक वॉर्डन जवान नेमणेस मान्यता देणे.

**ठराव क्रमांक** ( ६९ ) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत वाहतूक नियंत्रण शाखा, ठाणे ग्रामिण यांच्या विनंती वरून महानगरपालिकेमार्फत मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावरील वाहतूक नियंत्रण करणे कामी ५० ट्राफिन वॉर्डन पुरविण्यात येत होते. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वाहतुक विभागाकडे अत्यंत अपूरा कर्मचारी वर्ग असल्याने महानगरपालिकेमार्फत ट्रफिक वॉर्डने उपलब्ध करुन देण्याबाबत वाहतुक शाखे मार्फत सातत्याने पाठपूरवठा करण्यात येत आहे. तरी महानगरपालिकेमार्फत ५० ट्राफिक वॉर्डन उपलब्ध करुन दिल्यास त्याचा फायदा मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक व्यवस्था सुरक्षित होण्याकरीता होईल. ५० ट्राफिक वॉर्डन करीता महीन्यास रु. ५,४०,०००/- एवढा खर्च येईल. सदर खर्च भागविण्यासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. ५०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात यावी. सदर ट्राफिक वॉर्डन नेमण्यासाठी अशाप्रकारे मनुष्यबळ पुरवठा करण्याऱ्या संस्थाकडून निविदाव्दारे दर मागविण्यात यावेत. तसेच एक वर्ष कालावधी करीता करारनामा करण्यात यावा. सदर ट्राफिक वॉर्डन हे वाहतुक विभागाच्या नियत्रंणा खाली काम करतील. तथापी सदर ट्राफिक वॉर्डन हे फक्त मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातच काम करतील, त्यांना अन्य ठिकाणी अथवा अन्य कार्यक्रमांकरीता वाहतुक विभागास हलविता येणार नाही तसेच ट्राफीक वॉर्डन यांनी फक्त वाहतुकीचे नियंत्रणाचेच काम करावे, वाहनांची कोणत्याही प्रकारची तपासणी, कागदपत्र तपासणी करू नये अंश्या अटी ठेवाव्यात. तरी ५० ट्राफिक वॉर्डन जवान वाहतुक विभागास उपलब्ध करण्याकरीता व येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदन** :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०३/२०१३

**प्रकरण क्र. ६१ :-** मिरा भाईंदर महानरपालिका क्षेत्रात नेटवर्किंग करीता खाजगी कंपनीस महानगरपालिकेच्या जागेत अँटीना पोल उभारण्यास ज़ागा भाड्याने उपलब्ध करुन देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**सदरचा विषय मा. महापौरांच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

112

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०३/२०१३

**प्रकरण क्र. ६६ :-** सन्मा. सदस्य मदन उदितनारायण सिंह यांचा दिनांक १५/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत लोकांच्या सेवेसाठी महानगरपालिका तर्फे उपलब्ध असलेली रुग्णवाहिका तसेच शववाहिनीचे मध्यवर्ती केंद्र सुरु करणेबाबत.

**ठराव क्र.७० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शहरवासियांकरीता महानगरपालिकेमार्फत रुग्णवाहिका व शववाहिनीची सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यापूर्वी रुग्णवाहिका व शववाहिनी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयामार्फत नागरीकांच्या आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्यात येत होत्या. परंतु, शहराच्या टोकावर राहणाऱ्या नागरीकांना मुख्य कार्यालयामध्ये येऊन रुग्णवाहिका किंवा शववाहिनी उपलब्ध करुन घेणे खुप अडचणीचे व वेळखाऊ होते. करीता नागरीकांच्या मागणीनुसार रुग्णवाहिका व शववाहिनी प्रभाग समिती निहाय ठेवण्यात आलेली आहेत. जर पुनःश्च रुग्णवाहिका व शववाहिनी मुख्य कार्यालयामध्ये एकत्रितरित्या ठेवल्यास नागरीकांची गैरसोय होणार आहे. करिता सद्यस्थितीत रुग्णवाहिका व शववाहिनी ज्या तऱ्हेने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत त्याचप्रमाणे यापुढे देखील प्रभाग समिती निहाय उपलब्ध करुन देण्यात याव्यात. यामध्ये कोणताही बदल करु नये असा मी ठराव मांडत आहे. तसेच Telephone नं. देण्यात यावेत व त्याची प्रसिद्धी करावी.

सुचक :- (सही)          अनुमोदक :- (सही)

ठराव सर्वानुमते मंजूर

(सही)

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

113

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२०/०३/२०१३

**प्रकरण क्र. ६७ :- महानगरपालिका हद्दीतील एकाच इमारतीमधील सर्व सदनिकांना एक समान दराने कर आकारणी करणे बाबत.**

ठराव क्र. ७९

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील एकाच इमारतीमधील सदनिका/दुकाने यांना वेगवेगळया दराने कर आकारणी झालली होती. करीता एकाच इमारतीमधील सदनिका/दुकाने यांना समान दराने कर आकारणी करणेबाबत मा. महासभा दि. २०/०३/२०१० प्रकरण क्र. ६३ ठराव क्र. ६६ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. तरी अजूनही बऱ्याच जुन्या इमारतींना समान दराने कर आकारणी झालेली नाही. वास्तविक पाहता पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने आजपावेतो सर्व जून्या इमारतींना समान दराने कर आाकरणी होणे अपेक्षित होते.

ज्या जुन्या इमारतींना समान दराने कर आकाराणी झालेली नाही त्या सर्व इमारतींना समान दराने कर आकारणी करणेकरीता शहरात सर्व ठिकाणी या बाबतची जाहिरात करुन नागरीकांचे अर्ज प्राप्त करुन घेणेकामी ६ महिन्यांची मुदतदेणेत यावी व त्याप्रमाणे समान दर कर आकरणी करणेची कार्यवाही करणेत यावी असा मी ठराव मांडीत आहे.

सुचक :- रवि व्यास

अनुमोदन :- ध्रुवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २६/०३/२०१३

प्रकरण क्र. ६२ वृक्षप्राधिकरण समितीने मंजूर केलेले सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत (मा. स्थायी समिती सभा दि. ७.३.२०१३ ची तहकुब सभा दि. ११.३.२०१३ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. ४७ ठराव क्र. ४३)

**ठराव क्र. ७२**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक विचारात घेवून मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये काही दुरूस्त्या/फेरबदल करून मा. स्थायी समितीने मंजुर केलेले अंदाजपत्रक स्विकारून आजची ही मा. विशेष महासभा अंदाजपत्रकास मंजुरी देत आहे.

आकडे लाखात

| तपशिल | 2012-13 (सुधारित अंदाज) | 2013-14 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 251.00 | 223.16 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तातंरण | 819.47 | 1470.34 |
| एकूण खर्च | 1070.47 | 1693.50 |

सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-

**महापौर**

मिरा भाईंदर महानगरपालिका



114

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २६/०३/२०१३

**प्रकरण क्र.** ६३ शिक्षण मंडळ समितीने मंजूर केलेले सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत (मा. स्थायी समिती सभा दि. ७.३.२०१३ ची तहकुब सभा दि. ११.३.२०१३ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. ४८ ठराव क्र. ४४)

**ठराव क्र. ७३**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सन २०१२-१३ सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये चर्चा करुन काही दुरुस्त्या सुचविल्याप्रमाणे मा स्थायी समितीने मंजुर केलेले अंदाजपत्रक स्विकारुन यास मा. विशेष महासभा मंजुरी देत आहे.

**आकडे लाखात**

| तपशिल | 2012-13 (सुधारित अंदाज) | 2013-14 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 500.00 | 1294.56 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तातंरण | 646.60 | 782.22 |
| एकूण खर्च | 1146.60 | 2076.78 |

सूचक :- श्री. बर्नड डिमेलो

ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २६/०३/२०१३

प्रकरण क्र. - ६४ परिवहन सेवेचे सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत
(मा. स्थायी समिती सभा दि. ७.३.२०१३ ची तहकुब सभा दि. ११.३.२०१३ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. ४९ ठराव क्र. ४५)

ठराव क्र. – ७४

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१२-१३ सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मा. स्थायी समितीने मंजुर केलेले सुधारित व मूळ अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. विशेष महासभा सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मंजुरी देत आहे.

(आकडे लाखात)

| तपशिल | 2012-13 (सुधारित अंदाज) | 2013-14 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" एकूण जमा | 1065.02 | 853.30 |
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" एकूण खर्च | 1041.50 | 834.56 |
| अखेरची शिल्लक | 23.52 | 18.74 |

सूचक :- श्री. बर्नड डिमेलो

**ठराव सर्वानुमते मंजूर**

अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

सही/-

**महापौर**

मिरा भाईंदर महानगरपालिका



116

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २६/०३/२०१३

**प्रकरण क्र.:- ६५** सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ'अ'+"क"+"अग्निशमन"+"महिला व बालकल्याण"+"अंध वअपंग"+ "JNNURM" + "P" अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ७.३.२०१३ ची तहकुब सभा दि. ११.३.२०१३ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. ५० ठराव क्र. ४६)

**ठराव क्र.:- ७५**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मा. आयुक्त सो. यांनी सादर केलेल्या मुळ अंदाजपत्रकात काही दुरूस्त्या करून मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकातील प्रभाग निधीमधून सोसायटयांसाठी नविन डस्बीन खरेदी करणे, तसेच मा. नगरसेवकांसाठी संगणक विभागामार्फत टॅब खरेदी करणे या सुचनेसह सुधारित व मूळ अंदाजपत्रकात सुधारणा करून सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. विशेष महासभा मंजुरी देत आहे.

**सन २०१२-१३ चे सुधारित अंदाज व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक** (आकडे लाखात)

| तपशिल | 2012-13 (सुधारित अंदाज) | 2013-14 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक "अ"+"क"+"अग्निशमन"+ "महिला व बालकल्याण"+ "अंध व अपंग"+ "JNNURM" + "P" = **एकूण जमा** | 77722.69 | 109501.04 |
| अंदाजपत्रक "अ"+"क"+"अग्निशमन"+ "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" = **एकूण खर्च** | 69447.85 | 109482.79 |
| **अखेरची शिल्लक** | 8274.84 | 18.25 |

सूचक – श्री. ध्रुवकिशोर पाटील — **ठराव सर्वानुमते मंजूर** — **अनुमोदक – श्री. जुबेर इनामदार**

सही/-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**



117